# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

## // महासभा बैठकीचे कार्यवृत्त //

**सभा क्रं. - ३९** **दि. ०७/०७/२०२२**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.०७/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.महाजन जयश्री सुनिल यांचे अध्यक्षतेखाली प्रत्यक्ष उपस्थितीने झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करून खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.महाजन जयश्री सुनिल, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| पाटील कुलभुषण विरभान, उपमहापौर | पाटील सचिन भिमराव | ढेकळे सदाशिव गणपत |
| जोहरे प्रिया मधुकर | चौधरी मनोज सुरेश | महाजन सुनिल सुपडु |
| नेरकर सरीता अनंत | भोईटे लताबाई रणजीत | नाईक प्रशांत सुरेश |
| पोकळे दिलीप बबनराव | पाटील प्रतिभा सुधीर | बालाणी भगतराम रावलमल |
| खान रुकसानाबी गबलु | पाटील चंद्रशेखर शिवाजी | अत्तरदे रजनी प्रकाश |
| सोनवणे कांचन विकास | देशमुख प्रतिभा गजानन | काळे रेश्मा कुंदन |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | पाटील विजय पुंडलिक | आहुजा मनोज नारायणदास |
| शिंदे गायत्री उत्तम | बारी शोभा दिनकर | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| बाविस्कर किशोर रमेश | शेख हसीनाबी शरिफ | सोनार रंजना विजय |
| सपकाळे मिना धुडकु | भिल पार्वताबाई दामु | खडके सुनिल वामनराव |
| कोळी दत्तात्रय देवराम | पाटील उषा संतोष | खडके विश्वनाथ सुरेश |
| कोल्हे प्रविण रामदास | कोल्हे सिंधु विजय | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| सनकत चेतन गणेश | कोल्हे ललीत विजय | देशमुख सुन्नाबी राजु |
| चौधरी चेतना किशोर | बरडे नितीन मनोहर | शेख सैईदा युसुफ |
| सोनवणे मुकुंदा भागवत | बेंडाळे उज्वला मोहन | सोनवणे निता मंगलसिंग |
| भंगाळे विष्णु रामदास | राणे गायत्री इंद्रजित | सोनवणे विक्रम किसन |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | जोशी अनंत हरिश्चंद्र | भापसे जिजाबाई आण्णासाहेब |
| काळे अमित पांडुरंग | तायडे सुरेखा नितीन | **स्विकृत सदस्य** |
| चौधरी मंगला संजय | चव्हाण ज्योती बाळासाहेब | कैलास नारायण सोनवणे |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | मराठे जितेंद्र भगवान | विशाल राधेशाम त्रिपाठी |
| सोनवणे धीरज मुरलीधर | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | राजेंद्र नारायण मराठे |
| काळे दिपमाला मनोज | पाटील रेखा चुडामण | महेश रतन चौधरी |
| सोनवणे अश्विन शांताराम | सोनवणे सुरेखा सुदाम | |

सदर सभेस मा.आयुक्त, डॉ.विद्या गायकवाड, मा.अतिरीक्त आयुक्त श्री.शाम गोसावी, नगरसचिव, श्री.सुनिल गोराणे, मा.उपायुक्त श्री.प्रशांत पाटील, मुख्यलेखाधिकारी, श्री.चंद्रकांत वानखेडे, नगररचनाकार, श्री.अशोक करवंदे, शहर अभियंता श्री.एम.जी.गिरगावकर तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**सभेच्या सुरूवातीस वंदेमातरम ने सुरूवात करण्यात आली.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा.सदस्य कापसे मयुर चंद्रकांत, पाटील राजेंद्र झिपरु , तसेच सन्मा.सदस्या सपकाळे रंजना भरत, सोनवणे राखी शामकांत, भोळे सिमा सुरेश, कापसे प्रतिभा चंद्रकांत यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी महोदया यांनी मंजूर केलेले आहेत.

**(नगरसचिव यांनी श्रध्दांजलीच्या प्रस्तावांना वाचायला सुरुवात केली.)**

**नगरसचिव :-** सर्व सभागृहाला विनंती करतो की, सर्वांनी दोन मिनीट श्रध्दांजलीसाठी उभे राहायचे आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८३८ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | नेरकर सरीता अनंत | १) शहरातील जळगांव कुंभार समाज जिल्हाध्यक्ष श्री.चंद्रशेखर कडू कापडे यांच्या मातोश्री स्व.विमलबाई कडू कापडे, २) शहरातील प्र.क्र.१ मधील संचालक, ग.स.सोसायटी श्री.मनोज माळी यांचे वडील स्व.अर्जुनराव शिवराम माळी यांचे दु:खद निधनाबद्दल. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**(नगरसचिव यांनी अभिनंदनाच्या प्रस्तावांना वाचायला सुरुवात केली.)**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८३९ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | १.कोल्हे ललित विजयराव<br>२.दारकुंडे नवनाथ विश्वनाथ<br>३.चव्हाण ज्योती बाळासाहेब<br>४.नेरकर सरीता अनंत<br>५.आहुजा मनोज नारायणदास | १)मा.ना.श्री.एकनाथरावजी शिंदे साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदी निवड झाल्याबद्दल २) मा.ना.श्री.देवेंद्रजी फडवणीस साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री पदी निवड झाल्याबद्दल ३) मा.ना.श्री.एकनाथरावजी खडसे साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या विधान परिषदेच्या सदस्य पदी निवड झाल्याबद्दल जळगांव शहर महानगरपालिकेतर्फे हार्दीक अभिनंदन. |
| २. | ॲड हाडा शुचिता अतुलसिंह | १)मा.ना.श्री.एकनाथरावजी शिंदे साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदी निवड झाल्याबद्दल २) मा.ना.श्री.देवेंद्रजी फडवणीस साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री पदी निवड झाल्याबद्दल ३) भारतीय जनता पक्षाच्या वतीने श्रीमती द्रौपदी मुर्मु यांना राष्ट्रपती पदाचे उमेदवार घोषित केल्याबद्दल भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री.जे.पी.नड्डाजी व मा.पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदीजी यांचे हार्दीक अभिनंदन. |
| ३. | १.सोनार रंजना विजय<br>२.काळे दिपमाला मनोज<br>३.काळे रेश्मा कुंदन<br>४.सनकत चेतन गणेश | १)मा.ना.श्री.एकनाथरावजी शिंदे साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदी निवड झाल्याबद्दल २) मा.ना.श्री.देवेंद्रजी फडवणीस साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री पदी निवड झाल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ४. | काळे दिपमाला मनोज | वार्ड क्रं.७ मधील कु.श्रध्दा जितेंद्र दांडगे एस.सी.सी.परीक्षा मार्च २०२२ या परीक्षेत जळगांव जिल्हयातून ९९.४०% मार्क मिळवून प्रथम आलेबद्दल तसेच इतर सर्व विदयार्थ्यांचे हार्दीक अभिनंदन. |
| ५. | १.काळे रेश्मा कुंदन<br>२.सनकत चेतन गणेश | जळगांव शहराच्या माजी महापौर व विदयमान नगरसेविका सौ.सिमाताई सुरेश भोळे यांचा आज दि.०७/०७/२०२२ रोजी वाढदिवस असल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने वरील सर्व पदाधिकारी व विदयार्थी यांचे हे सभागृह अभिनंदन करीत असुन उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहोत.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करण्यात यावी.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** प्रश्न उत्तरांचा तास आता घ्यायचा की, विषय झाल्यानंतर घ्यायचा.

**मा.महापौर :-** आपण अगोदर अजंडयावरील सगळे विषय घेऊ मग नंतर आपण प्रश्न उत्तराचा तास घेऊ.

**श्री.भगत बालाणी :-** मी पण एक अभिनंदनाचा ठराव मांडतो, आता अनेकांनी पत्र देऊन, वैक्तीगत ज्यांचे नांव पुकारलेले आहे, बाकीचे राहिलेले काही पत्र दिले नाही. तर मी सगळया सभागृहाच्या वतीने अभिनंदनाचा ठराव मांडतो, गेल्या अडीच वर्षापासुन महाराष्ट्राची जनता जी आवर्जुन एक नैसर्गीक युतीची वाट पाहत होती. त्या नैसर्गीक युतीचे आदरणीय मुख्यमंत्री श्री.एकनाथरावजी शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब, यांचा मी सभागृहाच्या वतीने अभिनंदनाचा ठराव मांडतो, आणि आपले जळगांव चे आमदार श्री.एकनाथराव खडसे यांची विधान परिषदेवर निवड झाली त्यांचा सुध्दा सभागृहाच्यावतीने मी अभिनंदनाचा ठराव मांडतो, दुसरा विषय म्हणजे मागील सरकारने जे काही ठराव केलेले होते. त्याच सरकार काय करेल त्याच्यात मला पडायचे नाही. आपण छोटे लोकं आहे. मोठया लोकांचा तो विषय आहे. त्या सरकारच्या या सरकारने शिंदे आणि फडणवीस सरकारने औरंगाबादचे संभाजीनगर आणि उस्मानाबादचे धाराशिव नगर हे जे नाव कायम ठेवले याबाबत शिंदे साहेबांचे आणि फडणवीस सरकारचे अभिनंदन करतो, आणि आशा बाळगतो की, शिंदे साहेब, फडणवीस साहेब, आपल्या जिल्ह्याचे श्री.गिरीषभाऊ महाजन, जिल्ह्याचे गुलाबभाऊ पाटील, राजुमामा भोळे, उन्मेशदादा या सगळयांकडुन, नितीनभाऊ राहिलेले काम सगळे तुमच्या सल्लेने तुमच्या पॉझिटीव्ह थिंकींगमुळे, जळगांवची जी कामे राहिलेली आहे सगळी ते मार्गी लागो अशी मी शुभेच्छा देतो आणि या सरकारचे पुनश्च: अभिनंदन करतो, आज माजी महापौर सिमाताई भोळे यांचा वाढदिवस आहे. त्यांचाही या सर्व सभागृहाच्या वतीने अभिनंदन करतो. जयहिंद जय महाराष्ट्र.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** भगतभाईंनी जो प्रस्ताव मांडला अभिनंदनाचा त्याला माझे अनुमोदन आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** कशाला आपण भांडण करतात, तेथे पाहिले की, एकमेकांची तारीफ करत होते ते, सगळयांची तारीफ केली. हा चांगला तो चांगला सगळयांची तारीफ केली त्याठिकाणी.

**श्री.सुनिल महाजन :-** आप्पा आपले ८ महिने प्रेशरमध्ये गेले.

**श्री.कैलास सोनवणे :-** आपण बोलतो, पाची बोटं सारखे नसतात, पण खातांना सारखे होतात. महापौरताई मागच्या मिटींगचा आपला ७ व्या वेतनाचा विषय पेंडींग आहे. माहिती घेतली मी. तर त्यामध्ये काही वेगवेगळया समित्या केल्या होत्या कर्मचाऱ्यांचे. आपण ते दवाखाना विभाग, बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, पाणी पुरवठा विभाग, सामान्य प्रशासन आणि इतर काही विभाग असे सहा हेड करुन त्या कर्मचाऱ्यांचे कागदपत्र त्यांनी तपासले, त्याच्यामध्ये काय पेंडींग राहिले आहे याचा तपास घेतला असता, बांधकाम विभागाचे सगळे कामे तेथे पेंडींग राहिलेले आहे. त्याचे जे कर्मचारी आहे चेक करणारे मनोज रामचंद्र शर्मा, महेंद्र सुकदेव पाटील आणि अनिल गोरख चौरसिया, या तिन लोकांनी काहीच काम केलेले नाही. म्हणुन तेव्हापासुन आपल्याला ७ वा वेतन आयोग लागु केले. मी जेव्हा पाठपुरावा करायला गेलो आस्थापना विभागामध्ये तर त्यांनी या तिघांना नोटीस काढली, कारणे दाखवा नोटीस की, ते काम का करत नाही. अजुन ७ वा वेतन आयोग अजुन किती दिवस पेंडींग राहु देणार तुम्ही. आणि त्यानंतर त्यांनी जो खुलासा दिलेला आहे. तर तो आस्थापनाचा जो कर्मचारी आहे. कार्यसन लिपीक तो कागदपत्र देत नाही. त्याच्यामुळे हे काम पेंडींग पडलेले आहे. तर माझी आपणास विनंती आहे की, मॅडम,आपण त्याच्यावर कार्यवाही करायला पाहिजे. जे योग्य असेल ती कार्यवाही त्या लिपीकावर करा तुम्ही. ते तपासा आणि मला प्रशासनाकडुन उत्तर पाहिजे तुम्ही ७ वा वेतन केव्हा लागु करत आहे. माझ्या मते तुम्ही या जुलैच्या पगारात सुध्दा देऊ शकता ७ वा वेतन कर्मचाऱ्यांना मला तुमच्याकडुन उत्तर पाहिजे.

**श्री.सुनिल महाजन** :- सर्वांनाच लावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** सगळयांनाच, आपली मागणी काय आहे. सगळयांना लावा, सगळयांना लावायला जर तुम्हाला अडचणीचे वाटत असेल. तर त्यांची अडचण दुर करण्याचा प्रयत्न करा. जर त्याला विलंब लागत असेल तर यांना अडकुन ठेवु नका, जे क्लियर आहे त्यांना लावा. आणि त्यांच्यासाठी ही प्रयत्न करा, त्यांना ही लागणार आहे. त्यांना फरकासह पैसे भेटणार आहे. परंतु लवकर लावा. आणि मला माहिती द्यावी मॅडमांनी.

**मा.महापौर :-** प्रश्नांची चर्चा सविस्तर करु.

**श्री.कैलास सोनवणे :-** आता हा जो विषय आहे मागच्या मिटींग मधलाच आहे. आज पत्र दिलेले आहे त्यांनी मला, मी पत्र पण दिलेले होते आस्थापनाने, मला आज पत्र दिले मिटींगच्या दिवशी.

**मा.महापौर :-** आयुक्त मॅडम आपण याचा खुलासा सादर करावा.

**श्री. चंद्रकांत वानखेडे,मुलेअ** :- ७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने मी जो अढावा घेतलेला आहे. आपले जवळ जवळ महापालिकेचे १६०० कर्मचारी आहे. त्याच्यापैकी ७२५ कर्मचारी आहे त्यांच्यावर ऑडीटचे मुद्दे उपस्थित झालेले आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** टोटल कर्मचारी किती सांगितले साहेब ?

**श्री. चंद्रकांत वानखेडे,मुलेअ** :- १६०० कर्मचारी.

**श्री.कैलास सोनवणे :-** त्यापैकी किती व्यालिड आहे.

**श्री. चंद्रकांत वानखेडे,मुलेअ** :- ७२५ सोडुन आपल्याकडे ९०० कर्मचारी आहे. ९०० कर्मचाऱ्यांचा ७ व्या वेतन आयोगाचा आदेश ठेवला आहे. त्याची बिले तपासणीचे काम सुरु आहे. फक्त बांधकाम विभागातील जे ३०० कर्मचारी आहे. तर त्यांचे काम बाकी आहे. त्याचा मी वेळोवळी आढावा घेतलेला आहे. तर याच्यामध्ये जे काही स्टेटमेंट तपासणी झालेली आहे. त्याच्या अनुषंगाने जी समिती नेमलेली आहे. मी आणि प्रशांत पाटील साहेब, ती एक एक प्रत तपासुन झालेली आहे. ती आम्ही व्हेरीफाय करु. त्याच्यावर स्वाक्षरी केल्यानंतर त्यांच्या ५ प्रति तयार करायचे आहे. आणि त्याच्या नोंदी सेवापुस्तकात घेतल्या आहे. आणि त्याच्यानंतर आपला जो पगारचा जो सॉफ्टवेअर आहे. त्या सॉफ्टवेअर मध्ये संबंधीतांबद्दल दुरुस्ती करुन घ्यायची आहे. आता जो आहे त्याचा स्ट्रक्चर बदलेला आहे. आता आमचे काम सुरु आहे. पुर्वीप्रमाणे जी वेतनवाढ आहे त्यात बदल करावा लागेल. तर ऑगस्ट पेड इन सप्टेंबर.

**श्री.कैलास सोनवणे :-** सप्टेंबरचा विषयच येत नाही.

**श्री. चंद्रकांत वानखेडे,मुलेअ** :- ऑगस्ट पेड इन सप्टेंबर, या देय्यकात आमचा ७ वा वेतन द्यायचा प्रयत्न आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** कार्यवाहीच काय? कर्मचाऱ्यांवर ज्यानी विलंब केला त्याच्या कार्यवाहीच काय ?

**श्री. चंद्रकांत वानखेडे,मुलेअ** :- आप्पा साहेब त्यांनी जे सांगितलेले आहे की आम्हाला कर्मचारीनेच माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही, ज्यांनी कामामध्ये कसुरी केलेली आहे त्यांचे काय ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** जाणुन बुजुन ज्यांनी कामामध्ये दिरंगाई केली ना, त्याच्यावर प्रशासन कार्यवाही करेल ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** हे सगळे माझे जातीचे किंवा नात्यातले किंवा कोणी नाही कर्मचारी, सगळया प्रकारचे कर्मचारी या ठिकाणी आहे.

**श्री. चंद्रकांत वानखेडे,मुलेअ** :- जाणिवपुर्वक जर केले असेल तर ताबडतोब कार्यवाही करु

**श्री.कैलास सोनवणे :-** शर्मा आहे का येथे, कुठे गेले शर्मा, किती वेळा गेले तुम्ही तेथे.

**श्री.मनोज शर्मा :-** ८ ते १० वेळा,

**श्री.कैलास सोनवणे :-** दिले का त्यांनी तुम्हाला कागदपत्र.

**श्री.मनोज शर्मा :-** नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** त्यांना आपण नोटीस काढली होती, यांनी असे उत्तर तुम्हाला दिलेले आहे. मग तुम्ही कार्यवाही का करत नाही त्या कर्मचाऱ्यावर.

**श्री. चंद्रकांत वानखेडे,मुलेअ** :- त्यांनी जरी दिले नाही. तर बाकीचे जे कार्यासन होते त्यांच्याकडे तर पुर्ण होतं ना काम करायला. ते घ्यायचे होते ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** संबंध बांधकामाचा त्यांच्याकडे आहे ना. तुम्ही वाचवता कशासाठी आहे त्याला. कार्यवाही का नाही करत आहे सांगा मला.

**श्री. चंद्रकांत वानखेडे,मुलेअ** :- त्यानी जर हेतुपुर्वक माहिती दिली नसेल तर कार्यवाही नक्की केली जाईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** ८-१० वेळी जर हे जाऊन आले तर हे हेतुपुर्वक नाही होत का ? ८-१० वेळा जाऊन आले हे हेतुपुर्वक नाही का ?

**श्री. चंद्रकांत वानखेडे,मुलेअ** :- बघुन घेतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** कार्यवाही करावी अशी माझी नम्र विनंती आहे तुम्हाला.

**श्री.सुनिल महाजन :-** तपासणी करुन घ्या.

**नगरसचिव :-** नुकतेच श्री.एम.जी. गिरगावकर साहेब हे जळगांव महानगरपालिकेत शहर अभियंता म्हणुन रुजु झालेले आहेत. गिरगावकर साहेबांनी या पुर्वी वसई-विरार महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका, भिवंडी

महानगरपालिका तसेच मंत्रालयामध्ये सुध्दा त्यांनी ४ वर्ष काम केलेले आहे. गिरगावकर साहेबांचे या सर्व सन्मा.सभागृहातर्फे अभिनंदन आहे.

**श्री.एम.जी. गिरगावकर, शहर अभियंता :-** सन्मा.महापौर, आदरणीय उपमहापौर, मा.आयुक्त, सर्व सन्मा.सदस्य आणि सभागृह, मी एम.जी.पी.ला शहर अभियंता म्हणुन होतो. यापुर्वी वसई-विरार महानगरपालिकेत शहर अभियंता म्हणुन होतो. त्यापुर्वी उल्हासनगर महानगरपालिकेत शहर अभियंता म्हणुन होतो. आणि भिवंडी मध्ये पण होतो. आणि मंत्रालयमध्ये ४ वर्ष काम केलेले आहे. मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.आयुक्त, स्थानिक आमदार राजुमामा भोळे व सन्मा.सदस्य यांचे सुचनेनुसार आणि मार्गदर्शन व सहकार्यानुसार शहरातील जे काही बांधकाम पाणी पुरवठा जे काही विषय असतील. त्यांचा निपटारा करण्याचा प्रयत्न करेल.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करण्यात यावी.

**नगरसचिव :-** सभा क्र.३९

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** नगरसचिव साहेबांनी परिचय करुन दिला. सरांनी सुध्दा आपल्या बद्दल सभागृहाला माहिती दिलेली आहे. गिरगावकर साहेब सर्व सभागृहाच्या वतीने मी तुमचे स्वागत करते. शहर अभियंता हे सगळयात महत्वाचा पद आहे आम्हा सगळया लोकप्रतिनिधींच्या दृष्टीने बघितले तर. कारण आमच्या सगळयाच समस्यांचे मुळ शहर अभियंता या पदावर कार्य करणारे व्यक्ती, तुम्ही मनावर जर घेतले तर सगळया समस्यांचा निपटारा इमिजिएट होऊ शकतो. आम्ही वारंवार या पुढे तुमच्याकडे समस्या घेऊन येणारच आहे. आज सगळयांच्या वतीने स्वागत करते. नंतर आपण समस्यांबद्दल बोलु या. आणि आम्हाला अपेक्षा आहे जळगांव शहराचे चित्र आपण या पदाचा कार्यभार घेतल्यामुळे बदललेले दिसेल अशी आशा करते.धन्यवाद.

**नगरसचिव :- विषय क्रं:- १**) दि.३०/०५/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- इतिवृत्त कायम करणेत यावा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** तुम्ही विषयपत्रिकेत पहिले प्रश्न-उत्तराचा तास दिलेला आहे. त्याच्यानंतर विषयपत्रिका सुरु होईल ना. ४४ चे प्रश्न.

**श्री.अश्विन सोनवणे :-** ४४ चे प्रश्न आलेले नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ४४ चे प्रश्न.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रश्न उत्तराचा तास घेतलेला नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** घेतलेला आहे. विषयपत्रिकेत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही. नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** बघा तुम्ही वरती, प्रशासकीय प्रस्ताव जे आहे त्याच्यावरती.

**श्री.सुनिल महाजन :-** ठिक आहे ते नंतर घेऊ आपण.

**मा.महापौर :-** घेऊ ना आपण नंतर, प्रश्नउत्तराचा तास आपण अगोदर घेणार होतो ते नंतर घेऊ.

**नगरसचिव :-** विषय क्र.०१

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**श्री.सुनिल महाजन :-** अनुमोदन आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** विषय क्र.०१ मागच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे. मला एक लक्षात आणुन द्यायचे आहे प्रशासनाच्या व मा.विरोधीपक्ष नेत्यांच्या, महापौरताईच्या. मागच्या वेळेला सभेला मी हजर नव्हती. माझा रजेचा अर्ज होता पण माझ्या माहिती प्रमाणे जो ठराव क्र.८३६ झालेला होता.लुले साहेबांसंदर्भातला, त्या वेळेला श्री.अरविंद भोसले साहेबांच्या विषयाबद्दलची चर्चा येथे चालली होती. मला वाटते विशालभाऊंनी ती चर्चा केलेली होती. तुम्ही आणि महापौरताईंनी आश्वासन दिलेले होते की बघु. पुढच्या महासभेमध्ये त्यांचा प्रस्ताव आणु या. पण तो आणलेला दिसत नाही. तर हे असा दुजाभाव योग्य नाही. झाल्या पाहिजे ह्या गोष्टी.

**श्री.सुनिल महाजन :-** घेऊ ना पुढच्या महासभेत मा विषय राहुन गेला असेल.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** मागच्या वेळेस पण तुम्ही सांगितले होते सुनिलभाऊ पण मी लक्षात आणुन देत आहे की, हे झाले पाहिजे. जो शब्द आपण दिलेला आहे त्याचे पालन झाले पाहिजे. याची नोंद घ्या ताई. पुढच्या सभेमध्ये तरी तो विषय येऊ द्या.

**मा.महापौर :-** विषय क्र.०१ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं.८४० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दि.३०/०५/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देणेत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६४**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २**) सन २०२२-२३ या शालेय वर्षाकरिता जळगांव शहर महानगरपालिका संचलित बालवाडीतील मुलांना पुरक पोषण आहार पुरविणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, या विषयाबद्दल सभागृहाला, थोडी माहिती अवगत करुन द्यायची आहे. या प्रस्तावात असे नमुद आहे. प्रतिदिन रु.४.९२ प्रमाणे ५०० उष्मांक आणि १२-१५ ग्रॅम प्रथिनेयुक्त आहार आपण बालकांना देणार आहोत.तर नेमक आपण याच्यात काय देणार आहोत. त्या बद्दलची डिटेल्स सभागृहापुढे यायला पाहिजे.

**श्री.शाम गोसावी, अति.आयुक्त :-** ५०० उष्मांक आणि १२-१५ ग्रॅम प्रथिनेयुक्त आहार प्रत्येक विद्यार्थ्याला रोज देणे अभिप्रेत आहे. या अंतर्गत आपण सोमवार ते शनिवार असे वार ठरवुन दिलेल्या प्रमाणे सोमवारी खिचडी मंगळवारी लापसी बुधवारी पोष्टीक हलवा, गुरुवारी मटकीची उसळ, शुक्रवारी वरणभात आणि शनिवारी उपमा या प्रमाणे आपण मुलांना आहार देत आहोत. याप्रमाणे शासनाने प्रति दिन प्रति विद्यार्थी रु.४.९२ पै.मात्रचे दर आहे. आपले एकुण २९ बालवाडया असुन यामध्ये सरासरी विद्यार्थी संख्या लक्षात घेता १४७४ विद्यार्थी असुन कार्यरत दिवस २४५ या प्रमाणे असे एकुण खर्च रु.१७,७६,७६०/- येतो. त्याप्रमाणे आपण सन २०२२-२३ करीता खर्च रु.२०,००,०००/- अपेक्षित केलेला आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आता याचा पुरवठा जो होणार आहे. योग्य तो दर्जेचा पुरवठा असायला पाहिजे. यासाठी आपण काय नियोजन केलेले आहे.

**श्री.शाम गोसावी, अति.आयुक्त :-** याच्यासाठी ताई, पोषण आहाराच्या दर्जेचा पुरावा आपण आपली महासभेची मान्यतेनंतर ई-निविदा काढण्यात येऊन बचतगटामार्फत सदरचा आहार विद्यार्थ्यांना पुरविणेसाठी तसेच त्यावर काही बालवाडी शिक्षिका या पुरविण्यात येणाऱ्या आहारावरती व त्याचे दर्ज्यावर आणि गुणवत्तेवर नियंत्रण ठेवणार.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, या विषयासंदर्भात दोन तीन गोष्टी लक्षात आणुन द्यायच्या आहे. मुळात होते काय ? आपल्याकडील पटसंख्या कागदावर दिसते. ती पटसंख्या प्रत्येक्षात शाळेमध्ये नसते. आणि मग अश्या पध्दतीने हा घोळ सुरु व्हायला सुरुवात होते. तर यावर लोकप्रतिनिधींचाही अंकुश असला पाहिजे आणि प्रशासनाचाही अंकुश असला पाहिजे. लहान मुलांसाठी कार्यक्रम आहे अतिशय चांगली योजना आहे. ही झालीच पाहिजे. याला कोणताही विरोध कोणाकडुन ही असण्याचे काही कारण नाही. पण पटसंख्या आणि प्रत्येक्षात होणारा पुरवठा. म्हणजे प्रत्येक्षात असलेली विद्यार्थी संख्या याचा ताळमेळ बसतो आहे की नाही. रेग्युलरली चेक झाली पाहिजे.नाही तर हे पुढे जाऊन घोटाळा निर्माण होणार. या विषयाच्या संदर्भातच आयुक्त महोदया, तुमच्या लक्षात आणुन देऊ ईच्छिते की, आपल्या बालवाडयांसाठी आपण पोषण आहाराचे म्हणतो आहे. पण आपल्या काही काही बालवाडयांची इमारतींची परिस्थिती अशी आहे. मी माझ्याच प्रभागातले सांगते. तुकाराम वाडी मध्ये जी बालवाडी आहे. तर तेथे पतरेच नाही. म्हणजे ज्या इमारतीवरती छत नाही. आणि त्यामुळे ती बालवाडीच भरु शकत नाही. किती दुरदशा आहे. एकंदरीत सर्व सभागृहापुढे नमुद करावे असे वाटत आहे मला. किरकोळ एखाद्या विषयासाठी म्हणजे किरकोळ आर्थिक तरतुद असते ती. पण त्यासाठी ते काम होत नाही. आणि ती मुले शाळयातच येऊ शकत नाही. कागदावर ती शाळा चाललेली आहे. पण प्रत्येक्षात ते सगळे बंद पडलेले आहे.

आता पावसाळयाचे दिवस आहे आणि अश्या परिस्थितीत छतच नसते तर मुले बसतील कसे. तर यावर सुध्दा प्रशासनाने लक्ष द्यावे. इमिजेट कार्यवाही करावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई मला वाटते, याच्यामध्ये समितीच गठीत करुन द्यावी. याच्या संदर्भात ही आळा बसेल. आणि जे या कामासाठी वेळ देऊ शकत असतील. असे हे ५-६ लोकांची समिती गठीत करुन लोकप्रतिनिधी सुध्दा याच्यावर नियंत्रण ठेवतील.

**श्री.कैलास सोनवणे :-** ५-६ जणांची, ५-६ जणांची, १ ते २ लोकांचे काम आहे तेथे फक्त.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** १ किंवा २ जणांची घ्या. ज्यांना या संदर्भामध्ये ईच्छा आहे ईच्छुक आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** काय आहे. तीनही पक्षांचे एक एक सदस्य घेऊन त्रिसदस्यीय समिती गठीत करुन टाका.

**श्री. कैलास सोनवणे :-** त्यांचे बिलाला आढवा करुन टाकतील ५-६ सदस्य, तुम्ही साधे समजता का यांना, साधे समजता का तुम्ही सदस्यांना,

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** एक अंकुश असणारे जे लोकं आहे.

**श्री. कैलास सोनवणे :-** ताई, ते तर म्हणतील मस्त आहे. सदस्याला काय समजता तुम्ही. चरणसिंहजी लक्षात ठेवा, या जळगांव शहरात फक्त दोन जणांचे भाव वाढलेले आहे. एक जमिनो के दुसरे कमिनोके. मी सांगतो आहे. तुम्ही त्या फंद्यात पडु नका आणि प्रशासनाला अडथळा निर्माण करु नका.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** कृती बदलवली की, सगळे काही बदलते आप्पा साहेब.

**श्री.कैलास सोनवणे :-** कृती बदलणार नाही, कृती बदलणार नाही. लाख पक्ष बदलतील पण कृती बदलणार नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** बदलली पाहिजे नाही तर सुरुवात जरी झाली पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कोणाचे तरी नियंत्रण असायला पाहिजे. भलेही समिती नका गठीत करु.कोणीही सदस्य या बद्दलची माहिती घेईल. प्रशासनाने याबाबतीत सहकार्य करायला पाहिजे.

**श्री.शाम गोसावी, अति.आयुक्त :-** २९ बालवाडया आहे.

**मा.महापौर :-** कोणीतरी पाहिले का? बालवाडयांची परिस्थिती चांगली आहे का ? हे पहिले पाहणे आवश्यक आहे. आता हाडाताईंनी सांगितले की, वरती छतच नाही. सगळया बालवाडया दोन वर्षानंतर सुरु होत आहे तर त्यांची अवस्था व्यवस्थीत आहे की नाही. लहान लहान मुलं त्या ठिकाणी येणार आहे. त्यांची बसण्याची व्यवस्था व इतर सगळं आपण त्यांना पुरविणार आहोत. तर या संदर्भात शिक्षण मंडळाला सुध्दा आदेश देण्यात येत आहे की, सर्व बालवाडयांची पाहणी करावी. आणि त्यामध्ये काही दुरुस्ती असेल तर ती दुरुस्ती प्रशासनामार्फत करण्यात यावी. आणि हाडा ताईंनी सांगितले त्याप्रमाणे प्रशासनाने याची नोंद घेऊन सुधारणा करण्यात यावी.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** महापौरताई, ज्या बालवाडया २९ आहेत. त्याच्यामध्ये ९ मराठी मिडीयमच्या आहेत. आणि बाकी सेमीच्या तर माझा असा प्रस्ताव आहे की, ते ९ बालवाडया पण सेमी करुन घ्या. कारण बालवाडी पासुन हे सर्व ABCD आहे. आणि या सगळया गोष्टी आहे. मराठी हा विषय तर कम्पलसरी असतोच सेमी मध्ये. तर जे ९ आहे ते ही सेमी मध्ये कन्वर्ट करुन घ्या.

**श्री.शाम गोसावी, अति.आयुक्त :-** भाऊ, मराठी ९ आणि २० सेमी शाळा आहे. त्याच्यामध्ये आपले जे बालवाडीचे शिक्षिका आहेत. ते दररोजच्या दररोज शिकवत असतात. आपण सर्व मुख्याध्यापिकांची बैठक घेतली. बालवाडीचे विद्यार्थी हे आपल्याकडे पहिली मध्ये येणार आहे. आपण त्यांना बालवाडीमध्येच अभ्यास दिला तर आपण सर्व बालवाडी शिक्षिकांची समिती गठीत केली. बाल-विकास प्रकल्प अधिकारी यांची ही मदत घेतली आणि काही जुनिअर के.जी. आणि सिनियर के.जी.चा अभ्यासक्रम असे एक करुन बालवाडीच्या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रमाचे आपण डिझाईन करत आहोत. आणि हा अभ्यासक्रम डिझाईन करुन पुढच्या महासभेसमोर ठेवुन त्याला मान्यता घेऊन सर्व बालवाडींना एकच अभ्यासक्रम आपण देत आहोत. तसेच आपण बालवाडीची गुणवत्ता वाढविण्यासाठी जसे भाऊंनी आणि आपण सुचना केलेली आहे. यांचा दर्जा उंचविण्यासाठी आपण या सर्वांची बैठक घेतली,शाळांच्या ज्या प्राथमिक पायाभुत सुविधा आहे. याच्यामध्येही सुधारणा करण्यासाठी त्या बालवाडीच्या शिक्षकांकडुन प्रस्ताव घेऊन त्याच्यामध्ये सुधारणा करत आहोत. तसेच त्यांच्या शैक्षणिक दर्ज्याचे गुणवत्तेला आपण प्रत्येक शाळा दत्तक देणार आहोत. आपण दत्तक ज्यांना दिलेले आहे. त्यांनी या शाळांच्या विकासासाठी ज्या त्यांच्या समस्या आहे. ते सोडविण्यासाठी प्रयत्न करायचे आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं.८४१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, एकात्मिक बालविकास सेवा योजना अंतर्गत राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागाने पारित केलेला शासन निर्णय क्र.एबावि.२०१०/प्र.क्र/११३/का-५ दि.२६/०९/२०११ अन्वये पोषण आहार दर रु.४.९२/- मात्र करण्यात आलेला आहे. त्यानुसार शासकीय शालेय पोषण आहार अंतर्गत ३ ते ६ वयोगटातील बालकांना ५०० उष्मांक व १२ ते १५ ग्रॅम प्रथिनेयुक्त आहारासाठी प्रती बालक प्रति दिन रु.४.९२/- पैसे मात्रचा आहाराचा दर विहीत करण्यात आलेला आहे. जळगांव शहर महानगरपालिकेव्दारे सदया मराठी माध्यमाच्या ९ व सेमी इंग्रजी माध्यमाच्या २० अशा एकुण २९ बालवाडया चालविल्या जातात. शैक्षणिक सत्रातील सर्व सुटया वगळता साधारणता २४५ दिवस बालवाडीतील बालकांना पोषण आहार पुरवावा लागेल या पुर्वीची साधारणता विदयाथी संख्या १४७४ X पोषण आहाराचा प्रती विदयार्थी दर रु.४.९२/- X पोषण आहाराचे दिवस २४५ = रुपये १७७६७६०/- मात्र याप्रमाणे खर्च लक्षात घेता सन २०२२-२३ या शैक्षणिक सत्रासाठी पोषण आहार पुरविणे कामी अंदाजीत खर्च रक्कम रुपये- २० लक्ष मात्र हा महिला व बालकल्याण या लेखाशिर्षका खाली सन २०२२-२३ च्या महिला व बाल कल्याण विभागाच्या आर्थिक तरतुदीतून करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६४**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३**) महिला व बालकल्याण मनपा फंडातुन मनपा शाळेतील प्रत्येक विदयार्थ्यास रुपये २०००/- मात्र प्रति वर्ष सहाय्य म्हणुन देणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढढा :-** महापौरताई, जसे आता शुचिताताईंनी सांगितले ना. त्याच प्रकारचा हा विषय आहे. याच्यामध्ये जी ४५०० पटसंख्या दाखवलेली आहे. कागदावर ही ४५०० च असेल.परंतु अश्या पध्दतीची पटसंख्या निदर्शनास येत नाही. मला वाटते या संदर्भात सविस्तर संपुर्ण माहिती घेऊन हा विषय या महासभेला तहकुब करण्यात यावा. अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीनभाऊ, आता तसे होत नाही.आता आधार कार्ड लिंक असते. त्यात माहिती टाका. पेंडींग ठेवण्यापेक्षा निपटारा करा. तुम्ही माहिती घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो घेतली मी माहिती.

**श्री.कैलास सोनवणे :-** आता तशी गडबड होत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही, नाही. रु.२०००/- डायरेक्ट त्या पालकाच्या घरात जाणार.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कारण काय आहे. विद्यार्थी शाळेत रेकॉडवरती दिसत आहे. पण शाळेमध्ये अस्तीत्वात विद्यार्थी दिसुन येत नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** म्हणजे उपस्थिती राहत नाही, बोगस आहे असे. बोगस होत नाही आता. बोगस होते का तुम्ही निदर्शनास आणुन द्या. सोक्षमोक्ष करा.

**श्री.नितीन बरडे :-** बोगस आहे. भोईटे हायस्कुल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्यामुळे सविस्तर प्रस्ताव अभ्यास करुन जो पर्यंत येत नाही आणि योग्य पध्दतीने माहितीचे आकलन होत नाही. तोपर्यंत हा विषय तहकुब करण्यात यावा.

**मा.महापौर :-** विषय क्र.३ पुढील महासभेपर्यंत या सभागृहात तहकुब करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं.८४२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महिला व बालकल्याण मनपा फंडातुन मनपा शाळेतील प्रत्येक विदयार्थ्यास रुपये २०००/- मात्र प्रति वर्ष सहाय्य म्हणुन देणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावा संबंधी प्रशासनाने अभ्यास करुन सविस्तर माहिती घेवून परिपूर्ण प्रस्ताव पूढील महासभेत सादर करावा तोपर्यंत सदरचा विषय तहकूब करण्यात येत आहे.

**सर्वानुमते तहकूब**

**अनुकूल - ६४**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ४) विज देयकाची तपासणी करुन चुकीच्या आकारणी केलेल्या विज देयकांची दुरुस्ती करणे. अदा झालेली जास्तची रक्कम वसुल करणे कामी मे.अग्रवाल एन्टप्रायजेस,जळगांव यांना मुदतवाढ देणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** महापौर महोदया, मला बोलायचे आहे. जास्तीचे केलेले व महानगरपालिकेचे आता पर्यंतचे बिल जास्त येत होते. आणि आता पर्यंत आपल्याला ते किती फरक पडायचे याचे आपल्याकडे काही गणित आहे का ? जर असेल तर त्यांनी त्याचा खुलासा करावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** एस.एस.पाटीलांशी संपर्क करा तुम्ही.

**श्री.एम.जी. गिरगावकर, शहर अभियंता :-** हे जे बिल देयक अदायगीला येतात आपल्याकडील, कर्मचाऱ्यांकडुन त्याच्यामध्ये अनेक त्रृट्या असतात. बिलाची जास्त आकारणी झालेल्या स्वरुपाचे, वाढीव स्वरुपाचे, आणखी काही वेगळे स्वरुप आणि अकाऊंट स्वरुप, अनेक वेळा असे होते की, आपली महानगरपालिका सेवाभावी संस्था म्हणुन काम करते. बऱ्याच वेळी बिले देतांना आपल्याला नॉर्मल धोरण म्हणुन या ठिकाणी बिल देण्यात आलेले असते. त्यानंतर ऑडिटसाठी आपण ही समिती नेमलेली आहे. जेव्हा पासुन ही बिल बचत समिती नेमली. त्यावेळेस दोन वर्ष कोरोना पिरेड होते. त्यामुळे बरेच कार्यालय बंद होते. आणि या ठिकाणी लवादक किंवा न्यायालय बंद होते, कोर्ट ही बंद होते. त्या अनुषंगाने आपल्या मेन बिल्डींगचे जे बिले होते. ते तपासल्यानंतर असे समजले की, २.५ ते ३ लाख बिल महिन्याला येत होता. त्याच्यामध्ये जे विज सेवा शुल्क १.५ लाख रुपये होते. साधारण एक वर्षापासुन बिल बजवण्यात आलेले आहे. यामध्ये इतर काही चेकींग आहे. या ठिकाणी मी असे ऐकले आहे की, परतावा करण्याचे अधिकार कार्यकारी अभियंताला असतात. तरी सुध्दा नियम असुन ही ते मान्य करत नाही. अश्या वेळेस आपल्याला कोर्टातच जावे लागतील. किंवा सेकरेटरीकडे जावे लागतील. ते सगळे मिळुन तो तक्रारी प्रस्तावीत करणार आहे. आता या तिन वर्षात काय कार्यवाही झालेली आहे. काही कार्यकारी अभियंतेकडे दिलेली आहे. काही कोर्टात दिलेली आहे. तर ते वादग्रस्त आहे. आणि हे प्रकरणे चालवायला वेळ लागतो. (आवाज अस्पष्ट असल्यामुळे नेमके काय बोलले समजले नाही.) याला मंजुरी देण्यात याव.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** माझ्या माहिती प्रमाणे एम.एस.ई.बी.चे जो बिल देतो. आणि ते कमी करुन देतील मला नाही वाटत. ते ॲडजेस्टमेंटच्या दृष्टीने हा जो ठेकेदार नेमलेला आहे. हेच करुन घेत असतील. आपले अधिकारी सक्षम नाही का? आपले अधिकारी हे करु नाही शकत का? मग आपल्याला हे ठेकेदार नेमण्याची काय आवश्यकता आहे.

**मा.आयुक्त :-** एस.एस.पाटील, उत्तर द्या.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** हा जो विषय आहे महानगरपालिकेच्या आपले पथदिवे, मिळकतीच्या ठिकाणी आणि त्याच्यानंतर पाणी पुरवठा योजना जी आहे. या ठिकाणी विविध ठिकाणी आपले कनेक्शन्स आहेत. मिळकतीचे जे आहे आपले ते तिन चार वेगवेगळे आहेत. गार्डन आहेत, स्मशानभुमी आहेत, दवाखाना आहे, ऑफिस कार्यालय आहे पुर्वी महावितरण कंपनीकडुन ऑफिस कार्यालय जरी असले तरी त्यांना कर्मशियल म्हणुन विज देयक आकारणी होती. त्यावेळेला सार्वजनिक हितासाठी आपण महानगरपालिकेच्या आपण सेवा घेतो सार्वजनिक सेवा देतो. सार्वजनिक हितासाठी त्यांनी असे कोणतेही दर निश्चित केलेले नाही. महावितरण कंपनीकडुन रेटमध्ये त्यांच्याकडुन विविध निर्णय घेतले जातात. आणि ते निर्णय घेतल्यानंतर कार्यलयापर्यंत म्हणजे लोव्हरलेव्हल पर्यंत, त्यांच्या सॉफ्टवेअर मध्ये काही वेळेला चेंजेस होत नाही. त्यामुळे असे निर्णय त्यांनी घेतले की, आपल्या सार्वजनिक हिताचे बिल आवश्यक असल्याने त्यांच्याकडुन कमरशियल बिले लावले जातात. त्याच्यानंतर सार्वजनिक हिताचा आपला आहे त्याच्यामध्ये विज शुल्काची आकारणी ही केली

जाते. विज शुल्काची आकारणी आपल्याला व्हायला नाही पाहिजे. ज्या पध्दतीने त्याचे बिल आहे. त्या पध्दतीने विज शुल्काची आकारणी आपल्याला होत नाही. आपण याच्या संदर्भात त्यांच्याकडे पाठपुरावा केला होता. पाठपुरावा केल्यानंतर अश्या पध्दतीने विज शुल्काची आकारणी होत नाही. हा स्वत: डिपार्टमेंटने पाठपुरावा केला होता आणि त्याचे एक उदाहारण द्यायचे म्हटले, जळगांव महानगरपालिकेला कोणत्याही प्रकारची विज शुल्काची आकारणी होत नाही बघितली तर. फक्त ए.जी. डाटा चालु असतो. त्यावेळेला फक्त रु.१५०००/- चे विशेष पत्रात विषय झाले होते. आता शासनाचे एक पत्र होते. म्हणजे इतर महानगरपालिकांचे मी सांगतो. इतर महानगरपालिकाचे आता १० दिवसापुर्वी पत्र होते. त्याच्यामध्ये वसई-विरार असेल. असे एकांचे ऑडीट आहे. त्यावेळेला त्यांचे पथदिव्यांचे आणि पाणी पुरवठाच्या विज बिलामध्ये विज शुल्काची आकारणी झाली. विज शुल्कच्या आकारणी मध्ये ३.५ कोटी रुपये त्यांचे ऑडीट मध्ये दिसुन आले. त्यांच्या ऑडीटमध्ये दिसुन आल्यानंतर ते वसुल करण्याच्या संदर्भात पुढची कार्यवाही ते महानगरपालिका सांगणार आहे. आता परिस्थिती अशी आहे की, आपण विज बिल आपल्याकडे जे चुकीचे विज बिल येते. आपण त्याच्या करीता पाठपुरावा करीत आहोत.पण पाठपुरावा करतांना त्यांच्याकडे म्हणजे सब-डिव्हीजनचे आहे महावितरणचे सब-डिव्हीजन, डिव्हीजन, सर्कल नंतर झोन आहे नंतर प्रमुख कार्यालय जे आहे. हे यांचे प्रकार आहे. परंतु या सब-डिव्हीजनला असेल, डिव्हीजनला असेल, किंवा सर्कलला, त्यांच्याकडे ऐवढे अधिकार नाही. कारण जेव्हा बिलाच्या दुरुस्तीच्या संदर्भात आपण करतो. त्यांच्याकडुन हा प्रस्ताव जो आहे तो वरच्या कार्यालयाकडे प्रस्तावीत करतो. परंतु याला बराच कालावधी लागतो. हा कालावधी ज्यावेळेला लागतो. त्याच्या करीता पाठपुरावा करणे करीता त्याचे नियम आणि सॉफ्टवेअरमध्ये काय काय बदलणार आहे. त्याच्याकरीता याचा पुर्ण अभ्यास असणे आवश्यक आहे. आणि आता ही जी एजन्सी आहे. आता ह्या ज्या प्रकारच्या एजन्स्या काम करायला लागल्या. आता आपण याच्याकरीता सल्ला कोण करतो, तर आपण सी.ए.ची नियुक्ती केलेली आहे. किंवा आपले वेगवेगळे लिगल विषय जे असतात. आपण वकीलाची नियुक्ती करतो. अशीच आपण विज बिलाची तपासणी करायची, आणि विज बिलाच्या तपासणी मध्ये जर काही अतिरिक्त चार्जेस लावलेले असतील किंवा चुकीचे दर लावलेले असतील. तर त्याची तपासणी करुन त्याचा सर्व पाठपुरावा करायचा आणि पाठपुरावा करुन जर महानगरपालिकेचा जर त्यात फायदा झालेला असेल. त्या फायदा झालेल्या रकमेमधुन त्यांना आपल्याला ती रक्कम अदा करायची आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** कसे आहे, मानसिकता नाही. आपणही करा आणि आता जी मुदतवाढ देतो आहे. त्याला मुदत संपण्याच्या आधी काही टेन्डर काढायचा असेल. काही प्रोसिजर करायची असेल. मुदत संपण्याच्या आधी ही प्रोसिजर केली पाहिजे. मुदत संपल्यानंतर मुदतवाढ देणे वगैरे वगैरे हे बंद करा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ही आपली परंपरा आहे. मुदत संपल्यानंतर प्रशासनाला जाग येते. हिताच्या दृष्टीकोणातुन योग्य आहे. त्या बद्दल वाद नाही. ढेकळे साहेबांचे पण तेच म्हणणे पडत आहे. मुदतवाढीच्या संदर्भातील विषय असतील. हे सगळे जे आहे वेळेच्या विहित मर्यादीच्या पुर्वी हे विषय सभागृहापुढे यायला पाहिजे. एखाद्या कामाची मुदत संपल्यानंतर सहा सहा महिन्यानंतर जे मुदतवाढीचे प्रस्ताव येतात ना. त्याच्या संदर्भात त्यांचा आक्षेप आहे. एखाद्या विषयाची मुदत संपत असेल.आपल्याला माहित आहे की, कुठल्यामुदती पर्यंत त्यांना काम दिलेले आहे. आणि ज्या वेळी आपल्याला कल्पना असेल.एखाद्या विषयाची डिसेंबर मध्ये मुदत संपत असेल. तर साधारणता ऑगस्ट पासुनच त्या प्रस्तावाची तयारी मुदत संपल्यापुर्वीच प्रस्ताव सभेसमोर यायला पाहिजे. ही त्यांची भुमिका आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, आयुक्त महोदया, तुम्हाला सगळयांना हे माहितीच आहे की, किती मोठा गोंधळ दर वेळेला सभागृहात होतो. तरी सुध्दा प्रशासन का बदलत नाही. मी फार खेदाने नमुद करावे असे वाटते. आयुक्त महोदया तुमच्या माहितीसाठी एक विषय सांगते मी, आता हा विषय निघाला म्हणुन, माझ्या प्रभागातला विषय आहे. माजी नगरसेवक अजय पाटील यांच्या निवासाजवळ एक कल्व्हर्टचा विषय आहे. छोटासा कल्व्हर्ट करायचा आहे. आपले मनोज अप्पा आहुजा यांच्या घराकडुन अजय पाटीलांच्या घराकडे येतांना. साधारण आठ महिने झाले ती फाईल अजुन मंजुरीसाठी फिरत आहे. योगेश वाणी साहेब आहेत का सभागृहात, योगेश वाणींना मी कालही फोन केला होता. जे अभियंता आहे माझ्या प्रभागातले. दर वेळेला मला हेच उत्तर देतात की, फाईल पुटअप केलेली आहे पण मला मंजुरी मिळत नाही. मग एखाद्याचा जिव गेल्यावर आपल्याला मंजुरी मिळणार आहे का ? म्हणजे जे अत्यंत महत्वाचे काम आहे. जरुरीचे काम आहे. त्यामध्ये अधिकारी का मंजुरी देत नाही.

इतक्या छोटया छोटया कामांसाठीची फाईलला सहा सहा आठ आठ महिने वर्ष दिड वर्ष का लागतो. कल्व्हर्टचे काम आहे माजी नगरसेवकांच्या घराजवळचे काम आहे. एक्जीस्टींग सुध्दा नगरसेवक आहे. मी स्वत: त्या प्रभागातली नगरसेविका वारंवार त्याचा पाठपुरावा घेत आहे आणि कोणतेही कारण नसतांना ती फाईल अजुन ही मंजुरच होत नाही. आठ महिने झाले महोदया, अश्या अधिकाऱ्यांचे करायचे काय मग ? गंभिर नोंद घ्या आपण याची.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मी सांगितले आणि एस.एस. पाटील साहेबांनी जे मुद्दे मांडले, सभागृहाला ते मांडणे सारखे नाही ते. कारण एक जर निवासी मिटर आणले तर निवासी प्रमाणेच रिडींग येते. ती काही वांरवार बदलत नाही. फक्त सुरुवातीला असे होते की, एखाद्या वेळी जर कमरशियलचा लावला असेल. एकतर जसा त्यांनी सांगितले की, बगिचे आहे, आपल्या वेगवेगळे इमारती आहे. आपले सेवाभावी संस्था म्हणुन काम करते. जर सेवाभावी संस्था म्हणुन जर काम करते तर एकदा जर हे बिलावर टाकले तर ते वारंवार बदलवायचा विषय नाही. त्या करीता त्याठिकाणी सगळी मिटर रिडींग असतील. त्या मिटरची रिडींग घेतली जात असतील. आपल्याकडे आपले माणसे आहे त्या विभागात ते रिडींग चेक करतात. त्यांना समजत. मग कशाला एजन्सी पाहिजे. कशासाठी वेस्टेज पैसा महापालिकेचा वाया घालवायचा.आहे ना आपल्याकडे माणसं का नाही त्या डिपार्टमेंटला. माझे मत आहे आणि जसा हा निविदेचा एक विषय आलेला आहे मी आज परत शुचितताई हाडा यांना वांरवार या विषयावर चर्चा झालेली आहे. मी म्हणतो सभागृहात याच्या पुढे जर असा मुदतवाढीचा कोणता ठराव आला. तर त्या अधिकाऱ्याला सगळयात पहिले सस्पेंड करुन टाकायचे या सभागृहाने, म्हणजे हा विषयच राहणार नाही. येणारच नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** देऊच नका मुदतवाढ.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मुदतवाढ नाही, रद्दच करुन टाका हा प्रकार.कारण हा विषय समजत नाही. मुदतवाढीला येतो म्हणुन येतो तो विषय. मला असे वाटते की, प्रशासनाच्या अधिकाऱ्यालाच हा विषय समजला नसेल की, ही काय भानगड आहे. एकतर सोडा हा विषय रद्दच करुन टाका. काही करु  नका. आपले कर्मचारी पाठवा. शासनाकडे मदतीला आपले आमदार आहे. राजुमामा आहे अजुन आता सत्तेतले गुलाबभाऊ पालकमंत्री होते. त्याच्यापुर्वी गिरीषभाऊ होते.मदत करतील ना ते आपल्याला. कोणत्या विषयावर कोण मदत करणार नाही. तर हे विषय बंद करा. हा विषय नामंजुर करावा अशी सभागृहाला माझी विनंती आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, महानगरपालिकेचे कोट्यावधी रुपयांची अशी बिले भरली गेलेली आहे. याच्यामध्ये काही तरी लाखो रुपयांचा अतिरिक्त पैसा आपला भरला गेलेला आहे. वर्षानुवर्षापासुन त्याचे मागण्या करत असतांना सुटातुन पैसा वेळेवर येणे ती आपली मिळकत आहे. त्याच्या मागचे कारण मी सांगितो. या सगळया गोष्टींच्या मागे काही ना काही अर्थ कारण घडलेला असतात. जळगांव शहर महानगरपालिका असेल कि मुंबई महानगरपालिका असेल की, नाशिक महानगरपालिका असेल. नियमानुसार बिल्डींगचा प्लॅन सँक्शन करायला टाकल्यानंतर तो बिना पैशाचे मंजुर होतो का ? होतो का ?शेवटी काय होतो जे काही सँक्शन झालेले असेल. तो नियमातच असतो परंतु स्वत: तेथे वेळ द्यावा लागतो. त्याच पध्दतीची ही परिस्थिती जी आहे की, महावितरण मध्ये सुध्दा कायदेशीर पध्दतीने पैसा घ्यायचा असेल. तरी सुध्दा वारंवार महानगरपालिकेचे अधिकारी कर्मचारी जाऊन चक्रा मारुन सुध्दा तो पैसा त्या विभागाकडुन आपल्याला परत मिळत नाही. याच्या मध्ये अश्या पध्दतीची एखादी नोडल एजन्सी असली. जो पैसा आपल्याकडुन गेलेला आहे. तो बराच वेळ पाठपुरावा करुन सुध्दा आपल्याला मिळत नाही. परंतु अश्या पध्दतीने आपला गेलेला पैसा मिळविण्याच्या दृष्टीकोणातुन एखादी नोडल एजन्सी की, ज्या मध्ये त्या नोडल एजन्सीचाही स्वार्थ असेल, तो त्या महावितरणच्या अधिकाऱ्यांचेही स्वार्थ फुलफिल करत असेल आणि त्याच्यातुन महानगरपालिकेचा स्वार्थ साधला जात असेल. तर मला वाटते अश्या पध्दतीने कुठेतरी व्यवहारीक धोरण म्हणुन त्या दृष्टीकोणातुन ते दिलेले आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** म्हणजे जे सगळे इललिगल आहे. ते चॅनलाईज करुन करायचे, लिगललाईज करुन करायचे ही वस्तुस्थिती आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** शुचितताई मला सांगा की, महानगरपालिकेमध्ये, तुम्ही संपुर्ण मक्तेदारांना बोलवुन घ्या आणि विचारुन घ्या की, त्यांच्या बिलाची एम.बी. रेकॉर्ड करणे पासुन ते त्याच्या बिलाची अदायगी होणे पर्यंत त्यांना एक नया पैसा खर्च झालेला नसेल.असा एकही मक्तेदार मिळणार नाही. जळगांव शहरातील तुम्ही सगळे

व्यवसायीक बिझिनेस बघुन घ्या. आर्किटेक्ट बघुन घ्या. मग जर सगळेचे सगळे लाभार्थी असेल नियमाने काम चालत असेल, तर मग अशी एजन्सी नेमण्याची गरज पडणार नाही. परंतु असे होत नाही. हे सगळे जे आहे. नाईलाजाने करावे लागतात.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** एक शंका आहे नितीनभाऊ, तुम्ही आता जे एक्सप्लेनेशन दिले, कश्या पध्दतीने होते आणि त्यामुळे जे आपला पैसा वाचवुन आणणार. आता माझ्या मनामध्ये अशी शंका उपस्थित झाली की, अश्या प्रक्रियेला आपण लिगलाईज करतो आहे. तर असे का होणार नाही की, त्यांचेच एकमेकांचे साठगोठ होणार, एजन्सीचे आणि महावितरणचे, आणि ते तसे वाढीव बिलेच दर वेळेला पाठविणार. आता येथे मी जे वाचले.

**श्री.नितीन लढ्ढा :-** काय म्हणत आहे ताई.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** दुरुस्त केलेल्या देयकाच्या टक्केवारीनुसार आपण त्यांना अदायगी करणार आहोत बिलाची २०.५०% आणि २६.५०% म्हणजे त्यांना त्यांचे पेमेंट घेण्यासाठी वाढुन बिले देणार. विनाकारण एक्सेस बिले येणार.असे होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही, हा बघा भाग काय आहे. असे अनेक गुन्हेगार आहे. जे तुरुंगामध्ये राहुन वकीलापेक्षा जास्त ज्ञान प्राप्त केलेले आहे. परंतु सुध्दा वकील तेथे लावला जातो. का तिथे त्या वकीलाची फेसव्याल्यु आहे. त्याच पध्दतीने इन्कमटॅक्सचे रिटर्न व्यापारी दाखल करतो, व्यापारी हा जगातला सगळयात हुशार माणुस आहे. परंतु तो सुध्दा तेथे प्रॅक्टीकलवे मध्ये फेस करु शकत नाही. म्हणुन आपण तेथे चार्टर्ड अकाऊंटेंटची मदत घेतो. अश्या पध्दतीने आता काय झालेले आहे. हा ट्रेंड आहे की, जिथे तुम्हाला प्रोफेशनल एजन्सी आणि दुसरे काय होते. जरी महावितरणने इन्टेन्शनली चार्जेस आकारले नसतील. परंतु वेगवेगळया कायद्यामध्ये होत असलेल्या सुधारणा आणि त्या सुधारणांच्या बाबतीत आपला महानगरपालिकेचा जो काही स्टॉफ असेल. तो तितका अपडेट नसतो या गोष्टींना. मग अश्या वेळेला ज्या काही प्रोफेशनल एजन्सीज असतात. त्या ते कायद्यात अपडेट असतात.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ठिक आहे नितीनभाऊ, महानगरपालिकेच्या हितासाठी हा विषय मंजुर करावा. जे तुमचे म्हणणे आहे त्याबद्दल आमचा विरोध नाही. मात्र आता मुदतवाढीचा प्रस्ताव आलेला आहे. आमचे हेच म्हणणे आहे की, मुदतवाढ न देता नव्याने निविदा प्रक्रिया राबवा. ती एजन्सी कॉलिफाईड आहे तर त्याच एजन्सीला पुन्हा काम मिळेल. एजन्सी कोणती असावी या बद्दल कोणाचा आक्षेप असल्याचे कारण नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.आयुक्त उत्तर देत आहे.

**मा.आयुक्त :-** आदरणीय नितीनभाऊंनी उत्तर दिलेले आहे. विषय आपण सर्वांनी समजुन घेतला पाहिजे की, सन २०१९ ला आपण टेन्डर करुन त्यांना वर्कऑर्डर अशी दिलेली होती की, जे काही देयक ते कमी करुन आणतील त्या परसेंट मध्ये आपण त्यांना बिल देत आहे. आपण मनपा मधला त्यांना एक रुपयाही देणार नाही नंबर एक, नंबर दोन एस.एस.पाटीलांनी समजुन सांगितले की, या स्टेप्स असतात, प्रत्येक विभागाशी अपीलची एक पध्दत असते. एखाद्याला विज देयक कमी करायचे असेल. तर त्याला वेगवेगळया पध्दतीने जावे लागतात. तेवढा आपल्याकडे स्टॉफही नाही. आणि तसे सांगितले की, एजन्सीज टेक्नीकली साऊंड असतात, त्यांना तेवढा वेळ असतो. त्यांच कामच ते आहे. ते वेगवेगळया प्लॉटफार्मवर जाऊन आपली बिले कमी करुन आणतात. त्यांनी विनंती मुदतवाढीची याच्यासाठी केलेली आहे. त्यांना सन २०१९ ला वर्कऑर्डर मिळाली, त्यांना काम फक्त सहा महिने एक वर्षच काम करायला मिळाले, नंतर कोरोनामध्ये सर्व प्लॉटफार्म बंद होते. सर्व न्यायालय बंद असल्यामुळे त्यांच्या हातात आपल्या केसेस आहे पण ते पुढे गेलेल्या नाही आहे. कारण कार्यालय बंद होते म्हणुन त्यांनी मुदतवाढ मागणी केलेली आहे. आणि हा टेक्नीकल विषय असा झाला की, दोन वर्ष काम झालेले नाही, उर्वरित बिले जे त्यांना कमी करायचे आहे त्यासाठी त्यांना ती मुदतवाढ द्यायची आहे. आपल्याकडे दोन पर्याय उपलब्ध आहे. आपण नविन टेन्डर ही देऊ शकतो किंवा जो पर्यत नविन टेन्डर होत नाही. तो पर्यंत यांनी काम करावे आणि नविन टेन्डर काढावे, हा सभागृहाचा सर्वस्वी निर्णय आहे. सन्मा.सदस्यांनी निर्णय घ्यावा.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** कसे असते नितीन भाऊ.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** प्रशासनाने जसे सांगितले ना. नविन निविदा काढा आणि जो पर्यंत निविदा निघत नाही मुदतवाढ द्या.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** प्रशासनाने योग्य निर्णय दिलेला आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** एखाद्या मक्तेदाराने एखादे काम हाती घेतलेले असते आणि आज त्याची मुदत संपल्यानंतर आपण त्याला डिस्कन्टीनिव करतो.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ठिक आहे. आज त्यांची मुदत झालेली आहे. त्यांना मोबदला मिळावा कारण कोरोनामुळे त्यांना ते होऊ शकलेले नाही. तर त्यापर्यंत आपण ते करावे पण नविन निविदा प्रक्रिया आपण सुरु करावी. तोपर्यंत यांनी ते काम कन्टीनिव करावे. आणि ते ठरवुन घ्या. नविन प्रक्रियेत प्रशासनाला किती कालावधी लागणार. कारण मुळात कार्यादेश देतो त्याच वेळेला मुदत कधी संपणार हे नमुद असते. तरी ही प्रशासनाकडुन कधीच ते होत नाही. किमान तिन महिन्या आधी नवीन प्रस्ताव तयार होणे हे अपेक्षित आहे. ते योग्य आहे पण प्रशासनाकडुन ते कधीच होत नाही. तर आता टाईमबाऊंड कार्यक्रम द्या. तो पर्यंतचा एक कालावधी ठरवा आणि तोपर्यंत या ऐजन्सीला मुदतवाढ द्या.सरसकट मुदतवाढ देऊ नका. नविन निविदेपर्यंत द्या.

**मा.आयुक्त :-** येत्या तीन महिन्यापर्यंत आपण टेन्डर प्रक्रिया राबवु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ऑनगोईंग प्रोसेस मध्ये जे काही कालावधी लागेल.

**मा.आयुक्त :-** जी त्यांच्या हातावर आहे ती त्यांनी क्लिअर करावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता नविन कालावधीसाठी आपण टेन्डर प्रक्रिया नविन राबवावी.

**श्री.एम.जी. गिरगावकर, शहर अभियंता :-** अध्यक्ष महोदया, मा.महापौर महोदया, आता नितीनभाऊंनी जी (आवाज अस्पष्ट असल्यामुळे नेमके काय बोलले समजले नाही.)

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आता ज्यांचे काम चालु आहे. त्यांचे काम आपण कन्टीनिवेशन मध्ये ठेवतो आहोत. पण नविन जी बिले येणार आहेत. ती बिले त्यांना काम देण्याच्या आधीपर्यंत निविदा प्रक्रिया आपण पुर्ण करु. आणि हिच एजन्सी जर पात्र ठरत असेल. जर कोणीच निविदेमध्ये भागच घेतला नाही. तर स्पर्धाच होणार नाही. याच एजन्सीला ते काम मिळेल. परंतु ती प्रक्रिया राबवा कारण शेवटी ती कायद्याला धरुन आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हि प्रथा बंद करायची. हि जी मुदतवाढी प्रथा आहे ना सभागृहात बंद करायची आहे, तुम्ही लक्षात घ्या. या एकासाठी नाही. मुदतवाढ शुचितताई बोलल्या ना. आणि महापौरताई पण बोलल्या की, त्याला जो पिरयेड आहे त्याला त्याची जे काम घेतलेले आहे पुर्ण झाल्यावरच त्याला पेमेंट करावे.

**श्री.एम.जी. गिरगावकर, शहर अभियंता :-** हे कसे आहे. त्याला कामाची मुदत मिळाली तर तो हे केसेस कोर्टात चालवेल. न्यायालयात तो हे केसेस चालवेल.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मग तो चालवेल ना. त्याचे काम तो पुर्ण करेल ना. त्याचे पेमेंट तो घेईल.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** जे त्याच्याकडे चालु असलेल्या केसेस ज्या मिळविल्या. त्या केसेस होईपर्यंत त्याच्याकडे ठेका असु द्या. पण येणारे काम सुध्दा त्याच्याकडे हॅण्ड ओवर होईल जर त्याला सरसकट मुदतवाढ दिली तर.

**श्री.एम.जी. गिरगावकर, शहर अभियंता :-** हा विषय फार फार चालणार नाही. कारण आपले एजन्सीचे जे लोकं आहे ते सगळे तपासुन ५-७ महिन्यात ते हे करुन देतील. पण आपण जर हे बंद केले तर

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** हे बंद करायचे कोणीही म्हणतच नाही ना साहेब तुम्हाला, गिरगावकर साहेब तुम्ही हे लक्षात घ्या. तुमचे जे काम एजन्सीला दिलेले आहे. ते काम कन्टीनिवेशन मध्ये करायला हरकत नाही. त्याचा एक अंदाज आपल्याला असणार की, या कामाला किती कालावधी लागणार आहे. तीन महिने, चार महिने, सहा महिने किंवा अश्या पध्दतीने हा प्रस्ताव होऊ शकतो नितीनभाऊ की, जी कामे हॅण्ड ओवर केलेले आहे. त्या कामांचा प्रटीक्युलर घ्या. ते कामे त्याच्याकडुन जो पर्यंत होत नाही. तोपर्यंत करुन द्या. नविन निविदा प्रक्रिया सुरु करणार नविन निविदा प्रक्रियेत तो ही भाग घेणारच आहे. ना.

**श्री.एम.जी. गिरगावकर, शहर अभियंता :-** तसे असले तर पाहु आपण त्या बद्दल,

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** पाहु असे नाही म्हटले जाणार तुम्हाला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई म्हणत आहे की, याच्याकडे ऑन गोईंग प्रोसेस मध्ये जितके कामे असतील. तोपर्यंत त्याला मुदतवाढ देण्यात यावी. परंतु भविष्यात जर नविन कामे अश्या पध्दतीने पुन्हा देण्याच्या संदर्भातला जर विषय असेल. तर त्याच्या संदर्भात आपण नविन निविदा प्रक्रियेची आपण तयारी करावी.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ती करावीच लागेल नितीनभाऊ. नाही तर प्रतिनिधींना कोणाला माहितच पडणार नाही नितीन भाऊ. हे प्रशासकीय लेव्हलवर चालणारे काम आहे. त्यामुळे हा स्पष्टच प्रस्ताव झाला पाहिजे.जे कामे आता या एजन्सीला दिलेले आहे. ते कामे पुर्णत्वास झालेपर्यंत त्यांना मुदतवाढ त्या कामांसाठी देण्यात येत आहे. आणि येथुन पुढे नविन कामांसाठी नव्याने प्रशासनाने निविदा प्रक्रिया इमिजेट राबवावी. असा प्रस्ताव व्यवस्थीत

घ्यावा. मोघम प्रस्ताव कृपया येथे घेऊ नये. मोघम प्रस्ताव दिला तर पुन्हा सगळे गोंधळाचे वातावरण तयार होईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जर कधी नविन कामांच्या बाबतीत आपल्याला वाटत असेल. निकाली आहे तर नविन निविदा करा.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** पथदिवे रात्री बंद असतात.याच्याकडेही आपले प्रशासनाचे लक्ष असले पाहिजे.सर्व सभागृहाला माहित असेल स्ट्रीट लाईट दिवसा चालु असतांना बघितले आहे का? हा बघितले आहे. मी बघितले आहे आणि रोज चालु असतात.दिवस उगेपर्यंत चालु असतात आणि रात्री काही काही बंद असतात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता ढगाचे वातावरण असल्याने दिवसात ही अंधार असतो. रस्त्यात असलेल्या खड्डयांमध्ये कोणी पडु नये म्हणुन दिवसा ही लाईट चालु ठेवावे लागतात.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** तुम्हाला बचतच करायची आहे तर स्ट्रीट लाईटकडे लक्ष द्या.खरं सांगतो १०-१० वाजेपर्यंत स्ट्रीटलाईट चालु असतात. आता मला रात्री फोन आला. आमच्या त्या कॉलनीमध्ये ३-४ दिवसापासुन पुर्ण कॉलनीच बंद आहे.मी सकाळीच बोललो आपल्या ठेकेदाराशी. असे होऊ नये यासाठी काळजी घ्या एस.एस.पाटील.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आपल्या भागातील श्री.भोसले सर यांच्या घरासमोरचे स्ट्रीट लाईट दिवसा सुध्दा एक वर्षापासुन सुरु आहे. तरी कृपया त्वरीत बंद करावे.आणि अजुन एक सांगते माझ्या मागे म्हणजे शिव कॉलनी मध्ये दिपमालाताईच्या प्रभागामध्ये एक चार दिवसापुर्वी मी पाहणी केली तेव्हा दुपारच्या वेळी सुध्दा स्ट्रीट लाईट तिथले सुरु होते. ही अनेक भागातली कमप्लेंट आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** व्ही.आय.पी. प्रभागांना ही फॅसिलीटी प्रोव्हाईड केलेली आहे महापालिकेने की, दिवसा आणि रात्रभर.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** माझ्या प्रभागाला व्ही.आय.पी. प्रभागात घेतल्या बद्दल खुप खुप आभार माणते पण महापालिकेचे जे डिंडोरे पिटत आहे ते थांबवावे. तर विभागाने थोडे जागृत व्हावे. आणि आम्हाला या व्ही.आय.पी. ट्रिटमेंटची गरज नाही याची नोंद घ्यावी आणि या गोष्टी बंद कराव्यात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतु ही वस्तुस्थिती आहे की, काही प्रभागांमध्ये लाईटं दिवसा चालु असतात. परंतु काही वाढीव भागांमध्ये अद्यापपावेतो स्ट्रीट लाईट फेस ओढले गेलेले आहे जवळपास तीन चार महिन्याचा कालावधी झाला आहे. परंतु अनेक विस्तारीत भागांमध्ये अजुन ही स्ट्रीट लाईट नाही. तर याच्या संदर्भात नेमकी त्या ई.सी.एल. कंपनीची पॉलिसी काय ? या संदर्भात मागे मी एस.एस.पाटील साहेबांशी चर्चा केलेली होती. परंतु त्याच्या बाबतीत काही करार होणे अजुन बाकी दिसत आहे. परंतु जर कधी अश्या पध्दतीने विस्तारीत भागांमध्ये आपण पथदिव्यांची व्यवस्था पोहचु शकत नसेल. तर हे काही मला संयुक्तीक वाटत नाही. तर या संदर्भात थोडासा खुलासा विद्युत विभागाने सभागृहासमोर केला पाहिजे.

**श्री.सचिन पाटील :-** डी.पी.डी.सी. गाईडलाईनला आमदार निधीतुन नितीनभाऊ, हायमास्टलॅम्प दिला जातो. चार वर्षाचा आमचा अभ्यास नसेल माझा स्वत:चा की, ते हायमास्टलॅम्पचा जो देयक आहे. माझ्या माहितीनुसार ते महानगरपालिकेला अनुज्ञेय आहे. मी गेल्या १० वर्षापासुन एस.एस.पाटील सरांशी बोललो. त्यानंतर मोरेंशी बोललो पहिले, बेंडाळेंशी बोललो. ताईंनी विषय काढला शिव कॉलनीचा म्हणुन सांगतो. प्रत्येक आमदारांचे प्रत्येक लोकप्रतिनिधी कार्यकर्ते अतिशय जवळचे असतात. आणि जवळचे कार्यकर्त्यांचे म्हणणे ऐकलेच पाहिजे. पण राजुमामा भोळे जे आपले आमदार आहेत. त्यांच्या आमदार निधीतुन खरतर शिव कॉलनी गट नं. ५४ मध्ये अगदी हायवेच्या कोपऱ्यावर हायमास्टलॅम्प लावला गेलेला आहे. त्या हायमास्टलॅम्पला चार फोकस असतात मॅडम. चार पैकी दोन फोकस हे घरांकडे वळत आहे. तर दोन फोकस रेल्वे ट्रॅकवर जात आहे. म्हणजे रेल्वेला लाईट दाखवायचे आपण हा तुझा रोड आहे, ही तुझी पटरी आहे. आणि ह्या भाषेत हे फोटो हे सर्व मी एस.एस.पाटील साहेबांना सांगुन १० ते १२ दिवस झाले. शेवटी त्यांचा मला एक दिवशी फोन आला की, सर तुम्ही या विषयावर जास्त बोलु नका. हा विषय क्रिटीकल आहे. आता ते शिव कॉलनीतला गट आहे, मी शिव कॉलनीतला नगरसेवक आहे ते बोलणे मला आता भाग पडेल व्हि.आय.पी.वार्ड आहे आमचा. महापौर, उपमहापौर आमचे अश्विनभाऊ पण राहुन गेले. असा कोणता विषय आहे की, मी नगरसेवक असुन बोलु नये हे तुम्ही समोर येवुन सांगावे एस.एस.पाटील साहेब. कृपया एस.एस.पाटील साहेबांनी समोर यावे आणि सांगावे. जर माझे म्हणणे चुकीचे असेल, नक्की मला समजुन सांगा, मी मान्य करुन घेईल भाऊ, आणि आताही गेले तुम्ही संध्याकाळी, माझे म्हणणे काय होते. लाईट काढुन नका तो. कार्य करायचे आहे तर समाधानी करा.मला त्या

बाबतीत विरोध नाही. पण त्याचे दोन जे पटऱ्यांवर लाईट पडत आहे. ज्या ठिकाणी तिन रस्त्यांचा जंक्शन आहे. त्या ठिकाणी अंधार आहे. नागरीकांची कंप्लेंट आहे. त्याच्यातले दोन काढा आणि इकडे टाका म्हटले. मला एस.एस.पाटील साहेब सांगतात फोन वर, कॉल तो रेकॉर्डवर ठेवलेला आहे मी की, सर मला या गोष्टीची अडचण आहे. मी विषय काढणार नव्हतो भाऊ, शिव कॉलनीचा विषय निघाला म्हणुन नागरीक मला म्हणतील. तुम्हाला निवडुन दिले तुम्ही विषय काढत नाही. साहेब तुम्ही समोर यावे आणि सांगावे की, अडचण काय आहे.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** जळगांव शहरातील आपले जेवढे स्ट्रीट लाईट कनेक्शन्स आहेत. त्या सगळया ठिकाणी ऑटो वायलेशनची सिस्टीम आहे. सगळेच्या सगळे पथदिवे जे आहे. आपण निश्चित केलेल्या वेळेनुसार चालु होतात आपण निश्चित केलेल्या वेळेनुसार बंद होतात.आपला ऑटोवायलेशन सिस्टीम पुर्णपणे कार्यान्वीत झालेला आहे. हे जे पथदिवे चालु संदर्भातला जो विषय आहे. काही काही ठिकाणी येत आहे. तर महावितरणची जी ओवर हेडलाईन आहे तेथे फॉल्ट झालेला असेल किंवा एखाद्या कंज्युमर कंडक्टरची लाईन आहे त्याच्यात जर आपल्या स्ट्रीट लाईटच्या कंडक्टरला जर कुठे झाडाच्या फांदीमुळे म्हणा किंवा कुठे लुज असेल, याच्यामुळे जर कुठे जॉईंट झालेला असेल, तर तो रिव्हर्स सप्लाय देत असतो.ते स्ट्रीट लाईट आपले चालु असतात.आपण याच्या संदर्भात आपले जे कर्मचारी आहे महावितरणचे जे युनिट कार्यालय आहे त्यांच्याकडे आपण तक्रार नोंदवितो. ती तक्रार केल्यानंतर त्यांच्यामार्फत काम केले जाते आणि हा फॉल्ट काढला जातो. त्याच्यामध्ये ऑटोमाईजेशन सिस्टीम असल्यामुळे आपले मिटरच्या मध्ये आपले महानगरपालिकेच्या वैयक्तीक बिलात नुकसान नाही मात्र विजेचे नुकसान होते. विजेचे नुकसान होत असल्यामुळे महावितरणकडे आपण वेळोवेळी तक्रार देऊन फॉल्ट आपण काढत असतो. त्याचे जर तक्रारी जास्त असल्या तर त्यांना एक किंवा दोन दिवस फॉल्ट शोधण्यामध्ये लागतात. कारण आपला सेग्रीगेट कनेक्शन जे आहे. ते थ्री फेस असल्यानंतर प्रत्येक फेसवर चालणारे ५० ते ६० बल्बपोल असतात. म्हणजे एका स्ट्रिट लाईटवरती साधारणता, १५० ते २०० बल्ब आहे. कारण तितके पोल तितक्या गल्या चेक कराव्या लागतात. कारण नेमका फॉल्ट कुठे आहे. ते सगळ शोधावे लागतात. हे शोधण्यामध्ये थोडा कालावधी लागतो. आता दुसरा विषय सन्मा.सदस्य श्री.सचिनभाऊंनी जो विषय केला, त्याच्या संदर्भात जो भाऊंचा फोन होता की, असा असा आमदार निधीतुन पोल उभारण्यात आलेला आहे. त्याच्यावरती ब्रॅकेट करुन त्याच्यावरती चार लाईट लावलेले आहे. ऑलरेडी आपण याच्या संदर्भात जे काही आमदार साहेबांकडुन आपल्याकडे मागणी येते किंवा येथे पोल लावायचे आहे तेथे पोल लावायचे आहे. तेथे पोल लावले जातात. तेथे पोल लावण्याचा प्रस्ताव आपण जिल्हा नियोजन विभागाला देतो. आपण याच्या सुचना यांना दिलेल्या आहेत युनिट इंजिनिअरला की, जागेवरती जर टी-पॉईंट असेल तर त्या जागेत तीन ब्रॅकेट लावायचे. जर ओपनस्पेस असेल तर ओपनस्पसमध्ये स्कवेअरचा ब्रॅकेट लावुन चार लाईट लावायचे. जर काही लाईट उभ्या रोडवर असतील, तर उभ्या रोडवरती व्यवस्था करण्याच्या सुचना आपण एम.जी.पी.ला याच्या पहिले सुध्दा दिलेल्या आहे. आपल्या प्रस्तावात आता जे जे नविन आहे. परंतु आपण जे म्हटले की, ते स्कवेअर आहे. आता त्याच्या संदर्भात त्याच्या ठेकेदाराला सांगितलेले आहे. जेजे ब्रॅकेट आहे शहरात जास्त ते काढुन जागेच्या आवश्यकतेनुसार ब्रॅकेट तयार करा. आणि त्या पध्दतीने लावा.

**श्री.सचिन पाटील :-** मी टी-पॉईंट देतो, जंक्शन पॉईंट देतो. त्याच ठिकाणी लाईट लावा. अहो या कार्यकत्यांनी आमदाराच्या घरातला पैसा नाही दिला. हा पैसा डी.पी.डी.सी.चा पैसा असतो. हा नागरीकांच्या येणाऱ्या टॅक्स मधुन येणारा पैसा असतो. व्यापाऱ्यांच्या जी.एस.टी. मधुन आलेला पैसा असतो. तो सदकामी लागला पाहिजे. कार्यकर्त्यांचे नक्की समाधान करा, त्याच्या घरापासुन ५-५० फुट दुर लावा तुम्ही. त्याचे लोकेशन द्यायचे काम तर महानगरपालिकेचे असेल ना जर विज बिल आपल्याला द्यायचे आहे तर. तुम्ही प्रत्येक वेळेस मुंबईला जातांना सरळ निघा हायवेने. तुम्ही काय करतात साहेब, औरंगाबाद, पुणे मग मुंबईला येतात. असे करु नका काहीच.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब ते एल.ई.डी.चे काय झाले.

**मा.महापौर :-** पहिले आपण विषयपत्रिकेवरील सर्व विषय घेऊ या. नंतर ही चर्चा करु. विषयांतर होत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, यांनी जो विषय प्रस्तुत केला ना. याच्या संदर्भातलाच विषय आहे. वाढीव जागेंच्या पथदिवे संदर्भातला, तो पण महत्वाचा विषय आहे. नेमकी त्याच्या मधली काय अडचण आहे.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** नेमके त्यावेळेला १५५०० स्ट्रीट लाईट आपल्या जळगांव शहरामध्ये होते. त्याच्यानंतर आपण या एजन्सीला शासनाच्या निर्देशानुसार ई.एस.एल. कंपनीला आपण कॉन्ट्रॅक्ट दिला. त्यावेळेला त्याचा प्रोजेक्ट रिपोर्ट तयार होता. आपण त्यांच्या दाखविलेल्या प्रोजेक्ट रिपोर्ट वरुन त्यांच्याकडुन साधारणता आजपर्यंत जुन्या काही नविन काही असे १८००० स्ट्रीट लाईट लावुन घेतलेले आहे आणि नविन

कॉलन्यांचा जो विषय आहे की, नविन कोलन्यांमध्ये जो वाढीव एरिया आहे. त्याच्यामध्ये स्ट्रीटलाईट लावण्याचा प्रस्तावीत आहे आणि याच्या संदर्भात आपण ई.एस.एल.ला कळविलेले आहे. ई.एस.एस.वाल्यांचे मुख्य ऑफिस हे दिल्लीला आहे आणि सेंट्रल गव्हर्मेंटला जॉईंट वेन्चर आहे. त्यांनी त्यांचा बिजनेस प्लॅन चेंज केलेला आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, आपले मुळ याच्यामध्ये असे होते की, त्यांनी एल.ई.डी.लाईट लावायचे आणि ७ वर्ष त्यावर त्यांनी मेनटेनन्स करायचा. आता त्यांनी त्यांची पॉलिसी चेंज केलेली आहे. त्यांनी याच्यामध्ये तीन पॉलिस्या आपल्याला दिलेल्या आहे. त्याच्यापैकी अशी एक पॉलिसी दिलेली होती. स्ट्रीट लाईट आम्ही तुम्हाला पुरवितो, त्याचे पैसे तुम्ही तिन महिन्यामध्ये देऊन टाका. त्याच्यानंतर मेनटेनन्सचा भाग वेगळा, दुसरी पॉलिसी अशी होती की, स्ट्रीट लाईट आम्ही तुम्हाला पुरवितो. आम्ही त्यात त्याचे मेनटेनन्स जोडु, त्याच्या अगेनस्ट तुम्ही आम्हाला पैसे द्या. आणि तिसरा जसा मुळ प्रोजेक्टला आहे त्याच्यानुसार त्यांनी म्हटले होते पण त्याच्यामध्ये त्यांनी एल.ई.डी.लाईट बसविणे आणि ७ वर्षाच्या ऐवजी ५ वर्षाच्या मेनटेनन्स करणार होते. याच्या संदर्भात आम्ही त्यांना कळविले की तुम्ही मुळ प्रोजेक्ट जो आपला आहे. एल.ई.डी. लाईट बसविल्यानंतर ७ वर्ष त्याचे मेनटेनन्स करायचे. तुम्ही याच मुळ प्रकल्पाच्या अधिन राहुन तुम्ही हे स्ट्रीट लाईट बसवावे याच्या संदर्भात आपण त्यांना वेळोवेळी कळविले. परंतु त्यांच्याकडुन मला आता एक पत्र आलेले आहे. त्यांनी म्हटलेले आहे की, आम्ही ५ वर्षच मेनटेनन्स करु. याच्या करीता ई.एस.एल. कंपनी आणि स्थानिक स्वराज्य संस्था या प्रोजेक्टच्या मध्ये आपली नोडल एजन्सी जी आहे. नगरपरिषद संचालनालयातील ही नोडल एजन्सी आहे. आपण याच्या संदर्भामध्ये ई.एम.ए.ऑफिसला पत्र दिलेले आहे. आणि त्यांना आपण याच्या संदर्भात असे सांगितले आहे की, जी एजन्सी ई.एस.एल.आहे. त्यांना मुळ प्रोजेक्टच्या अंतर्गतच एल.ई.डी.लाईट बसविणे आणि ७ वर्ष मेनटेनन्स करणेबाबत त्यांना सुचना द्याव्यात. आणि जर ती एजन्सी या पध्दतीने काम करत नसेल. तर महानगरपालिकेला तुम्ही परवानगी द्यावी. महानगरपालिका याच्या संदर्भात महानगरपालिकेच्या स्तरावर वाढीव एरिया मध्ये स्ट्रीट लाईट बसविण्याची कार्यवाही करेल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** केव्हा पाठविले पत्र.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ई.एम.ए.कडुन आले का काही अजुन ?

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पत्र केव्हा पाठविले.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** आपण साधारण २० दिवसापुर्वी पत्र दिलेले आहे. त्याच्या अगोदर आपण एजन्सी करसपाँडन्स करत होते ई.एस.एल.वाल्यांची, ई.एस.एल वाल्यांकडुन आपल्याला दोन तिन वेळा त्याच पध्दतीची त्यांनी जी पॉलिसी बदलविलेली आहे त्याचे उत्तर मिळाले की, मग शेवटी त्यांच्याकडुन आपल्या प्रतिसाद दिसला नाही म्हणुन आपण ई.एम.ए.ऑफिसला पत्र पाठविले. आणि ई.एस.एल.ला आपण याच्या संदर्भात जेव्हा जेव्हा कळविलेले आहे. त्या कॉपीज ज्या होत्या ते आपण ई.एम.ए.ऑफिसला दिलेल्या आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ई.एस.एल.ला जेव्हा आपण मुळ कॉन्ट्रॅक्ट दिला होता तर त्याच्यामध्ये वाढीव परिसर आहे का ?

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** वाढीव परिसरामध्ये जर आपल्याला स्ट्रीटलाईट लावायचे असेल तर एक छोटासा ॲग्रीमेंट त्यांच्या बरोबर करायचं आहे. असे वाढीव परिसरामध्ये आपण लाईट बसविणार आहोत. बस बाकी त्याच्यामध्ये काही अडचण नाही भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही, पण तो ॲग्रीमेंट आहे का ?

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मग त्या ॲग्रीमेंटच्या आधारे त्यांच्यावर कम्पलशन करा ना.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** केलेले आहे भाऊ, आपण त्याच्यामध्ये तेच म्हटलेले आहे. महानगरपालिका आणि ई.एस.एल. मध्ये जो काही द्विपक्षीय करार झालेला आहे. त्या कराराच्या अनुषंगाने तुम्ही ते काम करावे म्हणुन.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे कम्पलशन वरतीच हे दोन तीन गोष्टी मार्गी लागायला पाहिजे. मग हे जे दुसरे वेगवेगळे प्रस्ताव जे आहे. त्यांची गरज नाही आपल्याला.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** मग त्याच्याकरीताच आपण ई.एम.ए.ऑफिसकडुन मार्गदर्शन ही मागविलेल आहे.

**मा.आयुक्त :-** त्यांनी त्यावेळेस २०१७-२०१८ ला ई.एस.एल.कम्पलसरी केले होते सर्व महानगरपालिकांना, ई.एस.एल.मार्फतच घेण्यात यावी. सद्या ही परिस्थिती चेंज झाली आहे. तर सध्याची परिस्थिती विचारात घेता आणि त्या अनुषंगाने आपण ठराव करू.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपला जो कॉन्ट्रॅक्ट आहे त्या कॉन्ट्रॅक्ट ॲक्टच्या अनुषंगाने ते सुध्दा त्यांनी पुर्वीच्याच दराप्रमाणे आणि पुर्वीचीच सेवा देण्याच्या संदर्भातला जो कालावधी असेल. त्याला अनुषंगुनच सप्लाय करायला पाहिजे आपल्याला.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** त्या टाईमाला ही त्यांनी हेच उत्तर दिले आज १८ महिने होऊन गेले.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मॅडम, आपण ई.एस.एल.शी जो करार केलेला आहे. त्या करारामध्ये स्पष्ट नमुद आहे. आपली पॉलिसी जर बदलली.

**मा.आयुक्त :-** वाढीव एरियासाठी हा सगळा विषय चालला आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** ही जी पॉलिसी सांगत आहे. त्यांच्याकाही पॉलिसी बदलल्या आहेत. आणि त्या पॉलिसीच्या आधारे त्यांनी प्रस्ताव दिलेले आहे. आपला जो मुळ कॉन्ट्रॅक्ट आहे. त्याच्यामध्ये असे काही उल्लेख आहे का ? अश्या जर पॉलिस्या बदलल्या तर आपल्या मुळ प्रस्तावावर परिणाम होईल. तर प्रस्ताव त्यांच्याकडुन येऊ द्या ना.

**मा.उपमहापौर :-** ४ नंबरचा जो विषय आहे. सेकंड आपण पॉलिसी, आता सर्व सदस्यांनी चर्चा केली, तर आपल्याला विषयांतर होऊन गेले. नेमके आता कसी प्रस्तावाची पार्श्वभुमी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही. नाही. आता जे सर्व विभगातील कॉन्ट्रॅक्टर त्यांच्याकडे काही महावितरणाशी संबंधीत कामे त्यांच्या हातात असतील. तो पर्यंत त्या कॉन्ट्रॅक्टरला मुदतवाढ देण्यात यावी. यापुढील कामांसाठी नविन निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

**मा.महापौर :-** विषय क्र.४ च्या संदर्भात जी मागील कामे या महावितरण कंपनीकडे पेन्डींग असेल.ती कमप्लीट करून द्यावी. आणि नविन कामांच्या संदर्भात नविन निविदा प्रक्रिया राबवावी. विषय क्र.४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं.८४३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मे.अग्रवाल एन्टरप्रायजेस,जळगांव यांना मनपा पत्र क्रं.जशमनपा/विदयुत /५७/२०१८-१९ दि.१४/०२/२०१९ अन्वये विषयाकींत कामी कार्यादेश निर्गमीत करण्यात आलेले होते. सदर कार्यादेशात कामाच्या कालावधी हा कार्यादेशाच्या दिनाकांपासून ३ वर्ष देण्यात आलेला होता. परंतु मे.अग्रवाल एन्टरप्रायजेस,जळगांव यांनी दि.२१/०२/२०२२ रोजी पत्र देवून कार्यादेशात नमुद केलेल्या कालावधीत दरम्यानच्या काळात कोरोना या जागतीक महामारीमुळे केंद्र शासनाने त्या पाठोपाठ राज्य शासनाने वेळोवेळी जाहिर केलेल्या लॉक डाऊनमुळे तसेच त्या कारणास्तव संबधित महावितरण कार्यालय सुध्दा वेळोवेळी बंद असल्यामुळे तसेच उक्त महामारीमुळे संबधीत महावितरण कार्यालयातील कार्यालयीन कर्मचाऱ्यांना उक्त कालावधीत त्यांच्या कार्यालयात येण्यास बंदी असल्यामुळे तसेच मागील काही वर्षापासुन बहुतेक प्रत्येक कामाच्या मंजुऱ्या महावितरण कंपनी मर्या.च्या मुंबई येथील मुख्य कार्यालय येथुन निर्गमित होत असल्या कारणास्तव व त्यात भरपुर वेळ वाया जात असल्या कारणास्तव उक्त कार्यादेशात नमुद कामामधील काही कामे झालेली असुन काही कामे होणे बाकी असल्याने सदरची कामे पुर्ण करण्यासाठी एजन्सीने मुदतवाढ मिळण्याची मागणी केलेली आहे. एजन्सीने आज पर्यंतच्या केलेल्या कामामुळे महानगरपिालकेचे दरमहा साधारण रक्कम रुपये १ लक्ष मात्र पर्यंतची बचत होत आहे. मे.अग्रवाल एन्टरप्रायजेस,जळगांव यांना निर्गमित करण्यात आलेला कार्यादेश व त्यांची मुदत बाबत तपशिल खालीलप्रमाणे.

| | कामाचे नांव | कार्यादेश व दिनांक | कार्यादेशाची मुदत | मंजुर दर/मक्तेदारास अदा करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| अ | महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या विज देयकाची (कार्यादेशाच्या दिनांकापासुन एक वर्ष कालावधी पर्यंतची देयके) तपासणी करुन चुकीच्या दराने | जशमनपा/विदयुत/५७/ दि.१४/०२/२०१९ | कार्यादेशच्या दिनाकां पासुन ३ वर्षे म्हणजे दि.१४/०२/२०१९ | २०.५०% (विज देयके दुरुस्त केलेपासुन एक वर्ष कालावधीमध्ये होणाऱ्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | आकारणी केलेल्या विज देयकाची दुरुस्ती करुन सुधारीत विज देयके प्राप्त करुन देणे. | | ते दि.१३/०२/२०२२ पर्यंत | बचतीच्या २०.५०% |
| ब | महानगरपालिकेने आजपर्यंत अदायगी केलेल्या विज देयकाची तपासणी करुन चुकीच्या दराने आकारणी केलेल्या विज देयकामुळे मनपामार्फत विज देयकापोटी जास्तची रक्कम अदायगी झालेली असल्यास ती जास्तीची रक्कम वसुल करुन देणे. | | | २६.५०% (वसूल केलेल्या रक्कमेच्या २६.५०%) |

एजन्सीने पुर्वीच्या कार्यादेशाची मुदत संपल्यापासुन म्हणजेच दि.१४/०२/२०२२ पासुन तिन वर्ष दि१३/०२/२०२५ पर्यंत मुदतवाढ मिळणे बाबतची मागणी केलेली असुन आयुक्त यांचे दालनात तत्कालीन आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली तत्कालीन मुख्यलेखाधिकारी / मुख्यलेखापरिक्षक यांच्या उपस्थित मक्तेदार मे.अग्रवाल एन्टरप्रायजेसचे प्रतिनिधी यांनी केलेल्या चर्चेनुसार खालीलप्रमाणे तिन वर्षा करिता मुदतवाढ मागीतलेली असुन सविस्तर तपशील खालील प्रमाणे.

| | कामाचे नांव | मंजुर दर/मक्तेदारास अदा करावयाची रक्कम | मागितलेली मुदतवाढ |
|---|---|---|---|
| अ | महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या विज देयकाची तपासणी करुन चुकीच्या दराने आकारणी केलेल्या विज देयकाची दुरुस्ती करुन सुधारीत विज देयके प्राप्त करुन देणे. | २०.५०% (विज देयके दुरुस्त केलेपासुन एक वर्ष कालावधीमध्ये होणाऱ्या बचतीच्या २०.५०% | दि.१४/०२/२०२२ पासुन तिन वर्ष म्हणजेच दि.१३/०२/२०२५ पर्यंत |
| ब | महानगरपालिकेने आजपर्यंत अदायगी केलेल्या विज देयकाची तपासणी करुन चुकीच्या दराने आकारणी केलेल्या विज देयकामुळे मनपामार्फत विज देयकापोटी जास्तची रक्कम अदायगी झालेली असल्यास ती जास्तीची रक्कम वसुल करुन देणे. | २६.५०% (वसूल केलेल्या रक्कमेच्या २६.५०%) | |

मे.अग्रवाल एन्टरप्रायजेस,जळगांव यांना प्रस्तृत कामी कोणतेही मासिक अथवा वार्षिक रक्कम अदा करायची नसुन मे.अग्रवाल एन्टरप्रायजेस,जळगांव यांनी महानगरपालिकेकड्न महावितरण कंपनीस अदायगी केलेली जादाची रक्कम वसूल करणेची कार्यवाही केल्यास तसेच तथा चुकीची आकारणी केलेली असल्यास त्या संदर्भात पाठपुरावा करुन चुकीची होत असलेली आकारणी दुरुस्ती केल्यास या कामामुळे महानगरपालिकेचा जो फायदा होणार आहे त्या फायदयानुसार तथा मनपाच्या होणाऱ्या बचतीनुसार वर नमुद तक्त्यात नमुद केलेप्रमाणे ‘अ’ कामी होणाऱ्या बचतीच्या रक्कमेच्या २०.५०% रक्कम व ‘ब’ कामी वसुल केलेल्या रक्कमेच्या २६.५०% मात्र रक्कम कुठलीही दरवाढ न देता मे.अग्रवाल एन्टरप्रायजेस,जळगांव यांना अदा करणेस तसेच कार्यादेशाची मुदत संपल्यापासुन मे.अग्रवाल एन्टरप्रायजेस,जळगांव यांचेकडेस सदयास्थितीत जी कामे प्रलंबित आहे ती पूर्ण होईपावेतो मुदतवाढ देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

मात्र प्रशासनाने मे.अग्रवाल एन्टरप्रायजेस,जळगांव यांचेकडेस सदयास्थितीत ज्या बिलांसंदर्भात प्रोसिजर चालू आहे ती त्यांच्याकडून त्वरीत पुर्ण करुन घ्यावी व नविन बिलांसंदर्भात त्वरीत नव्याने निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६४**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५**) जळगांव शहर महानगरपालिकेच्या राष्ट्रीय कुटूंब कल्याण व माता बाल संगोपन योजने अंतर्गत कार्यरत / सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती पूर्व व सेवानिवृत्ती नंतर चे लाभ (अर्जित रजा, निवृत्ती वेतन व कुटूंब निवृत्ती वेतन, उपदान व निवृत्ती वेतन विषयक लाभ तसेच ७ वा वेतन आयोग व कायम करणेबाबत इत्यादी) लागू करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं.८४४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेतील राष्ट्रीय कुटूंब कल्याण व माता बाल संगोपन केंद्राअंतर्गत कार्यरत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना जळगांव शहर महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी अधिकारी व कर्मचारी यांना राज्य शासनाने लागू केलेल्या शिफारशी प्रमाणे लाभ देणेबाबतचा प्रस्ताव राष्ट्रीय कुटूंब कल्याण व माता बाल संगोपन योजने अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना चौथा वेतन आयोग दिनांक १/४/१९९२ पासुन व पाचवा वेतन आयोग दिनांक १/४/२००४ पासुन लागु करण्यात आलेला आहे. तसेच सहावा वेतन आयोग सन २००६ पासून लागू करण्यात आलेला आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेच्या दवाखाने विभागाकडील राष्ट्रीय कुटूंब कल्याण व माता बाल संगोपन योजने अंतर्गत कार्यरत आणि सेवानिवृत्त कर्मचारी आहेत. सदर कर्मचाऱ्यांना वेतनापोटी म.अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटूंब कल्याण,पुणे यांचेमार्फत १००% सहाय्यक अनुदान प्राप्त होते. परंतु सदर अनुदान सन २०१३ पर्यंत इकडेस प्राप्त झालेले आहे.

१) म.संचालक कुटूंब कल्याण व माता बाल संगोपन विभाग पुणे यांचेकडील पत्र क्र.रा.कु.क.वि./रजा/कक्ष/५ दि.३०/०४/१९९० दि.५/५/१९९० अन्वये राष्ट्रीय कुटूंब कल्याण व माता बाल संगोपन केंद्राचे कर्मचारी हे संस्थेचे कर्मचारी असलेने संस्थेच्या नियमास बांधिल आहे. याबाबत संस्था आपल्या कर्मचाऱ्यांना ज्याप्रमाणे सवलती देते त्याच सवलती राष्ट्रीय कुटूंब कल्याण व माता बाल संगोपन कर्मचाऱ्यांना लागू कराव्यात असे कळविले आहे. त्यानुसार नेमणुक करण्यात आलेले कर्मचारी हे नगरपालिका कर्मचारी म्हणून कामकाज करीत होते आणि करित आहेत. जळगांव नगरपालिकेचे रुपांतर महानगरपालिकेत झालेले असून त्यातील कार्यरत काही कर्मचारी सेवानिवृत्त झालेले असुन काही कर्मचारी कार्यरत आहेत. (२) राष्ट्रीय कुटूंब कल्याण व माता बाल संगोपन व शालेय आरोग्य पूणे यांचे दि.१९/१२/१९९४ चे पत्रानुसार, राष्ट्रीय कुटूंब कल्याण व माता बाल संगोपन या योजनेखालील काम करणारे कर्मचारी हे नगरपरिषदेचे कर्मचारी आहेत. शासनातर्फे त्यांच्या पगारावर होणारा खर्च अनुदान म्हणून दिला जातो; सदर कर्मचाऱ्यांच्या नेमणूका नगरपरिषदेने केलेल्या असल्याने त्यांना नगरपरिषदेच्या इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे सेवा सवलती देणे संबंधी नगरपरिषदेने निर्णय घ्यावा असे नमूद आहे.

महराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील ३० नुसार " शासकीय कर्मचाऱ्याची अर्हताकारी सेवा, त्याची ज्या पदावर कायमपणे किंवा स्थानापन्न किंवा तात्पुरती या नात्याने नेमणूक प्रथम केली असेल त्या पदाचा कार्यभार तो ज्या तारखेस घेईल त्या तारखेपासून सुरु होईल मात्र सेवानिवृत्तीच्या वेळी त्याने शासकीय सेवेतील एखादे स्थायी पद कायमपणे धारण केलेले असले पाहीजे, अथवा निलंबीत धारणाधिकार किंवा स्थायित्व प्रमाणपत्र धारण केलेले असले पाहिजे. जो शासकीय कर्मचारी दहा वर्षापेक्षा कमी नाही एवढी अस्थायी सेवा केल्यानंतर नियत वयोमान प्राप्त झाल्यामुळे किंवा समुचित वैदयकीय प्राधिकाऱ्याने त्याला पुढील शासकीय सेवेसाठी कायमचे असमर्थ ठरविल्यामुळे अथवा वीस वर्षाची अर्हताकारी सेवा पूर्ण केल्यानंतर स्वेच्छेने सेवानिवृत्त झाला असेल असा कर्मचारी कायम कर्मचाऱ्याला अनुज्ञेय असलेल्या प्रमाणात नियत वयोमान, रुग्णता किंवा यथास्थिती पूर्ण सेवा निवृत्तीवेतन निवृत्ती उपदान आणि कुटूंब निवृत्ती वेतन मिळण्यास पात्र असेल " असे नमुद आहे.

राष्ट्रीय कुटूंब कल्याण व माता बाल संगोपन केंद्राअंतर्गत कार्यरत, सेवानिवृत्त कर्मचारी हे आस्थापना सूचिवरील मंजूर पदावरील कर्मचारी नाही मात्र या योजनेअंतर्गत समाविष्ट कर्मचारी यांना तत्कालीन नगरपालिकेच्या इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे सेवा शर्ती तसेच सेवानिवृत्ती विषयक लाभ दिलेले आहेत. राष्ट्रीय कुटूंब कल्याण व माता बाल संगोपन केंद्राअंतर्गत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा एकत्रित प्रस्ताव आस्थापना विभागाने सादर केलेल्या टिप्पणी प्रस्तावातील पान क्र.१ ते ९ वर नमुद आहे.

राष्ट्रीय कुटूंब कल्याण व माता बाल संगोपन केंद्राअंतर्गत कार्यरत व सेवानिवृत्त अश्या एकत्रित २४ कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव आहे. त्यापैकी २३ कर्मचारी हे सेवानिवृत्त आहे व सदयस्थितीत १ कर्मचारी कार्यरत आहेत तरी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्त वेतन विषयक लाभ देणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

उपरोक्त कर्मचाऱ्यांना ज्या प्रमाणे आजपावेतो चौथा, पाचवा व सहावा वेतन आयोगाच्या शिफारशी लागू केल्याचा निर्णय स्थानीक स्तरावर घेण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रीय कुटूंब कल्याण व माता बाल संगोपन केंद्राअंतर्गत कार्यरत सेवानिवृत्त कर्मचारी यांना महानगरपालिकेच्या इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे सेवा व सवलती लागू करणेबाबत तसेच महानगरपालिकेला त्यांनी दिलेली मनपा सेवा विचारात घेता त्यांना कायम करणेबाबत राष्ट्रीय कुटूंब कल्याण व माता बाल संगोपन योजने अंतर्गत कार्यरत कर्मचारी हे म.न.पा.चे कर्मचारी असल्याने इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे त्यांनाही यापूर्वी ज्या ज्या वेळेस वेतन आयोग लागू झालेला आहे त्या-त्या वेळेस त्यांना शिफारशी लागू केलेल्या असल्याने राष्ट्रीय कुटूंब कल्याण व माता बाल संगोपन योजने अंतर्गत कार्यरत कर्मचारी यांना सेवानिवृत्ती पूर्व व सेवानिवृत्ती नंतर चे अर्जित रजा, निवृत्ती वेतन व कुटूंब निवृत्ती वेतन, उपदान व निवृत्ती वेतन विषयक लाभ तसेच ७ वा वेतन आयोग लागू करणेस व त्यांना कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** **६४**

**सूचक** **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक** **:- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ६**) महासभा ठराव क्र.७६३ दि.२४/०३/२०२२ रोजी पारीत ठरावात निर्देशित केलेनूसार जळगांव शहर महानगरपालिका मालकीच्या बालगंधर्व नाटयगृह, सागर पार्क मैदान, महानगरपालिकेचे उदयान, बगीचे, खुल्या जागा अनामत घेऊन जागा तात्पुरत्या स्वरुपात भाडयाने देणेकामी सुधारीत धोरण ठरविणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करावा. याच्यामध्ये काही दुरुस्ती विशालजी सुचवतील खुल्या जागांच्या संदर्भात.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हा जो तक्ता दिलेला आहे प्रशांत पाटील साहेबांनी, त्यामधील क्रमांक ३ त्याच्यातील धार्मिक कार्यक्रमाचे आपण रु.५०००/- ठरविलेले आहे. ते रु.१०००/- करण्यात यावे पुर्वी सारखेच.

**श्री.अनंत जोशी** :- नाही, नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** खुली जागा, सागर पार्क सोडुन उर्वरित. त्यानंतर जे लग्नसमारंभ सागरपार्क सोडुन, ते रु.२५०००/- केले होते ते रु.५०००/- करण्यात यावे आणि कबड्डी व कुस्ती स्पर्धा ज्याचे १० हजार केलेले आहेत ते १००० करण्यात यावे.

**श्री. कैलास सोनवणे :-** नाही नाही. रु.१०००/- पण देऊ शकत नाही ते. रोज आहे ते रोज आहे. ते इतके नाही देऊ शकतात. मॅचेस भरपुर दिवस असतात.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** प्रशांत पाटील साहेब इतर खुल्या जागेंचे सागरपार्क वगळता.

**मा.महापौर :-** सागर पार्क वगळुन,

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही नाही, बाकीच मंजुर, बाकीचे सगळे सर्वानुमते मंजुर.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई, सागरपार्कला आपण जे भाडे दिलेले आहे ते ठिक आहे पण जी स्वच्छता असते, एखादा कार्यक्रम असतो आणि आपण त्याच्याकडुन अनामत रक्कम पण घेतो. पण तेथे स्वच्छता केली

जात नाही. तेथे कर्मचारी लावावे लागतात. मग ते कर्मचारी आम्हाला वार्डातुन तेथे पोहचवावे लागतात. त्यामुळे वार्डात स्वच्छता होत नाही. त्याच्यासाठी वेगळे कर्मचारी द्यावे. जेव्हा तेथे कार्यक्रम असेल. त्याच्या दुसऱ्या दिवशी तेथे ठरवुन द्या की, दुसरे कर्मचारी तेथे देण्यात यावे. आणि दुसरा विषय हा साऊंडचा आहे. आवाज हा कमी असायला पाहिजे. जेव्हा तुम्ही परमीशन देत असाल तर नागरीकांना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता महापालिकेने घ्यावी. आवाजाचा इतका त्रास होतो, तेथे कॉलेज शाळांचा परिसर जास्त आहे. ऐवढीच सुचना आहे.

**श्री.अनंत जोशी :-** जो प्रस्ताव दिलेला आहे त्याच संदर्भात आहे. तुम्ही बोलत आहे का ?

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही मी तेच सांगत होतो, स्वच्छतेबाबत, साफसफाईच. चार कर्मचारींचा उल्लेख आहे त्याच्यामध्ये.

**श्री.अनंत जोशी :-** आहे त्या प्रस्तावात सगळ, मी बोलतो, सन्मा.महापौर साहेबा, आयुक्त मॅडम आणि सन्मा.सभागृह, हा सागरपार्कचा जो विषय आहे, ज्याला आपण आता परवानगी दिली. याच्यात सगळ सविस्तर आलेले आहे. याच्यात एक चुकीच मला वाटत आहे. पाटील साहेब आपण सभेला त्याचे दोन लाख रुपये केलेले आहे. मुळात राजकीय सभा ज्या आहे, मुळात दोन चार वर्षात एकदा होत असतात तेथे. आणि तो दोन तासाचा विषय असतो. सकाळी सभा असते, तास दोन तास चालते. त्याचे दोन लाख केलेले आहे तुम्ही. नका आमच्यावर ऐवढा बोझा टाका तुम्ही. राजकीय सभेची नको ठेवा ऐवढी रु.२ लाख फी. आणि त्या काही रेग्युलर नाही होत. दोन चार वर्षातुन एकदा होते. ते चुकुन आलेले आहे. जेव्हा आपली चर्चा झालेली होती महापौरांच्या दालनात. तेव्हा सभेचा विषय नाही निघालेला आपला.

**श्री.कैलास सोनवणे :-** पण ते देऊ शकता ऐवढे पैसे.

**श्री.अंनत जोशी :-** अहो, आप्पा साहेब, दोन तिन वर्षातुन एकदा होतात सभा.

**मा.आयुक्त :-** राजकीय सभा होत असतात.

**श्री.अंनत जोशी :-** मॅडम, सभा होत नाही, आम्ही साक्षीदार आहोत. दोन तीन चार वर्षातुन सभा होत असते.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** कसे आहे, त्याचे कारण पण असे आहे. ज्या सभा होतात ना, त्याच बिल निवडणुक आयोगाला पण द्यावे लागतात. आणि प्रत्येक उमेदवाराला खर्चाची पण लिमिट असते.

**श्री.अनंत जोशी :-** मर्यादा आणि त्या ठिकाणी सभा घेण्याचे इंट्रेस्ट जे होते ललितभाऊंचे, सद्या ते इंट्रेस्ट घेत नाही. तेच सभा घ्यायचे फार.

**मा.आयुक्त :-** तरी सभेचे काय? किती करायचे सभेचे.

**श्री.नितीन बरडे :-** रु.२१०००/- करा.

**श्री.कैलास सोनवणे :-** खुप गरीब लोकं आहे.

**श्री.अनंत जोशी :-** अहो आप्पा, होत नाही मुळात. याचा उद्देश काय आहे, आपण हा जो प्रस्ताव आणलेला आहे. याचा मुळ उद्देश काय ? तेथील नागरीकांना होणारा त्रास. आणि सभेचा विषय रोज होणारा विषय थोडा आहे. स्वच्छतेच्या संदर्भातला जो विषय होता महापौरताई. याच्या बद्दल मी गेल्या वर्षीच बोललो होतो. त्या ठिकाणी कार्यक्रम असो, मॅचेस असो, काही असो. कुठलेही उपक्रम असतात. त्या ठिकाणी सगळी घाण तशीच सोडुन जातात. अनामत रक्कम मधुन आम्ही वजा करु पैसे घेऊ असे आपण म्हणतो प्रशासन म्हणुन ते घेता येत नाही व त्यांचे इमप्लीमेंट होत नाही आपल्या एस.आय.कडुन आपल्याला माहित नाही. पण मुळात विषय असा आहे. आपण भानगड आता ठेवली नाही. आपण प्रस्तावामध्ये सुचित केले होते की, आपण सांगितल्या प्रमाणे दिलेले आहे प्रस्तावामध्ये की, सरसकट कुठलाही कार्यक्रम जरी असला, तरी आपण प्रत्येक टाईम मॅचेस असो की, कुठलाही प्रोग्राम असो. त्याला रु.५०००/- आपण स्वच्छता शुल्क आकारतो आहे. त्यामुळे याच्यात आलेल आहे. तर तो विषय आता राहणार नाही. पण आमचा मुळ विषय राहिलेला आहे ताई. आमच्या प्रभागाचे जे स्वच्छता कर्मचारी असतात ते त्या ठिकाणी टाकले जातात. आता तुम्ही रु.५०००/- घेता आहे. चौधरी साहेब किती बुकींग असतात सागरपार्कचे साधारणता.

**श्री.नरेंद्र चौधरी, किरकोळ वसुली विभाग :-** २०० पेक्षा जास्त.

**श्री.कैलास सोनवणे :-** तिन वर्षाची बुकींग असते यावर्षी.

**श्री.अनंत जोशी :-** समजा रु.५०००/- x २०० तर इतके पैसे तुम्ही आमच्या सागरपार्क वरुन घेणार. तर कमीत कमी एक वॉचमन तर नेमा, मी किती वर्षापासुन सांगतो आहे, तेथे झाडांना पाणी द्यायला, ग्राऊंडची देखभाल

करायला, एक व्यक्ती दोन व्यक्ती दोन शिप्ट मध्ये माणसे सकाळचा वेगळा संध्याकाळचा वेगळा, दोन माणसं नेमा तेथे. तुमच्याकडे कर्मचारी नसतील तर आता पैश्यांची व्यवस्था आम्ही करून दिलेली आहे. आता तुम्ही आमच्याकडुन पैसे घेत आहात सागरपार्कमुळे, आता दोन कर्मचारी तुम्ही कंत्राटी घ्या. माणसे नेमा, आमच्या प्रभागामध्ये, आमच्या प्रभागातील स्वच्छता कर्मचारी काढु नका. आमच्या प्रभागात हाल होतात. गटारीचे रस्त्यांचे हे वारंवार वर्ष भरात कितीदा बोललो आहे की, सागरपार्कसाठी माणुस दिला पाहिजे. गेट बंद केले पाहिजे उघडले पाहिजे. रात्री काय करतात लोकं तेथे बघा तुम्ही गेट उघडे असते ते, मी कुलुप लावत फिरतो तेथे. आता पैसे पण मिळणार आहे. आता आपण स्वच्छता शुल्क आकारतो आहे. आणि स्वच्छता देत नाही, देखभाल करत नाही. आपले कायम कर्मचारी नसेल तर कंत्राटीचे माणसे द्या. यात दुसरा आणखी विषय असा होता की, आवाजाचा विषय, हा सागरपार्क हा विषय येण्याचे मुळ कारण तेच आहे. प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव जो आहे आणि त्याच्या मागची आमची भुमिका जी आहे. ती तेथील परिसरातील नागरीकांना होणारा त्रास. तेथील दोन तीन ज्या कॉलन्या आहेत. ते अतिशय उबगलेले आहे. आणि अनेक वर्षापासुन उबगलेले आहे. यात सगळयात मोठा त्रास त्यांना आवाजाचा आहे. आपण त्यावेळेस जेव्हा महापौरांच्या दालनात मिटींग घेतली होती. त्या वेळेस आपण डी.जे. बद्दल बोललो होतो की, डी.जे.वर बंदी, डी.जे. लावता येणार नाही. लावला तर जप्त करु. एक लाख जी अनामत असेल ती जप्त करु आपण. मला याच्यात आणखी एक सुचवायचे आहे आपण, मला याच्यात फक्त एक सुचवायचे आहे. इतर कार्यक्रमांना लाऊड स्पिकरला परवानगी द्या तुम्ही, क्रिकेट मॅचेस ला लाऊड स्पिकरची परवानगी द्यायची नाही, डी.जे.ही नाही, लाऊड स्पिकरही नाही. कारण सांगतो, तेथे काही कार्यक्रम असला, सभा असली, बहिणाबाई महोत्सव असला, खान्देश महोत्सव असला, काही भाऊंचे कार्यक्रम असतात काही. वर्षातुन एखाद्या दिवस असतात. आणि दोन चारच असतात. या क्रिकेट मॅचेस ज्या आहेत. पाच पाच महिने चार चार महिने सलग चालतात ते. सकाळी ७.०० वाजेपासुन ते लाऊडस्पिकरवर बोलायला सुरूवात करतात तर रात्री ८.०० वाजता बंद करतात. डी.जे. आणि लाऊड स्पिकर दोन्ही ही, सकाळी ७.०० ते रात्री ०८.००. तेथील परिसरातील लोकांच काय होत असेल. याच्यामुळे माझी विनंती आहे सभागृहाला की, क्रिकेट मॅचेसला फक्त लाऊड स्पिकरला बंदी दिली गेली पाहिजे. खेळण्या बद्दल आक्षेप नाही. त्यांनी ३६५ दिवस तेथे क्रिकेट खेळावा. कारण आवाज क्रिकेटचा जातो आणि सगळयात जास्त वापर सागरपार्कचा जो होतो तो क्रिकेट मॅचेससाठी होतो. आणि त्या ठिकाणी डी.जे. आणि लाऊड स्पिकरचा इतका आतोनात त्रास आहे तेथील लोकांना, मी मागे कुलकर्णी साहेबांनाही विनंती केली होती की, तुम्ही माझ्या सोबत चला आणि परिसरातील नागरीक काय म्हणतात तुम्ही एकदा ऐका म्हणुन, आणि त्याच सगळयात जास्तीचा त्रास आम्हाला आहे. जसे बुकींगचे पैसे मी घरी घेऊन चाललो आहे. जसे नरेंद्र चौधरी पावती फाडतात आणि पैसे मला आणुन देतात. तसे नागरीक मला शिव्या देतात, जसे मी घेऊन चाललो ते पैसे बुकींगचे. असे या ठिकाणी आपण थोडी काळजी घेतली पाहिजे. माणुस नेमायचा आहे आपल्याला तेथे सफाई कर्मचारी देखभालीसाठी, लाऊडस्पिकरवर ही बंदी केली पाहिजे. क्रिकेट मॅचसाठी फक्त. आणि याला अनुसरून अजुन एक विषय होता मॅडम. आपल्या नॉलेजला नसेल कदाचित. सागरपार्क या ठिकाणी आपण गेल्या टर्मला आम्ही नो हॉकर्स झोन म्हणुन घोषित केलेले आहे. तेथील जे हॉकर्स होते ते आपण गव्हर्टमेंट पॉलिटेकनिक समोर शिफ्ट केलेले होते. ते त्या ठिकाणी व्यवसाय करत आहे. पोट भरत आहे, इथल्यापेक्षा चांगला व्यवसाय त्यांचा तेथे चालला आहे. आता काय होते की, कालंतराने त्यां लोकांना वेगवेगळया टुपक्या सुचतात. त्यांची एक गाडी किंवा दुकान तेथे आहे. आय.टी.आय.जवळ, त्यांनी काय केले, ज्या लोकांना आपण तिकडे शिफ्ट केलेले होते तीन चार वर्षा आधी. त्या लोकांमधील एक दोन हॉकर्स आता परत येथे येऊन उभे राहिलेले आहे म्हणजे तिकडेही एक गाडी सुरु आहे. आणि आपण नो हॉकर्स झोन म्हणुन केलेले आहे ते. त्यांच काय आहे तेथे, प्रयोग आहे हा. त्यांच्यातील एक दोन जण संध्याकाळी येऊन उभे राहिला लागले आहे आता. म्हणजे आय.टी.आय.च्या ठिकाणी ही गाडया ठेवतील, मग एक येईल, दुसरा येईल मग तिसरा येईल मग चौथा म्हणजे तिकडे आय.टी.आय.लाही गाडया आणि सागर पार्कलाही गाडया, ते नो हॉकर्स झोन आहे. पण आपल्याकडुन लक्ष दिले जात नाही. मी वारंवार सांगतो आहे. गोसावी साहेब येथे बसलेले आहे. संजय ठाकूर आहेत की नाही या ठिकाणी मला माहित नाही. मी आणि नितीनभाऊ गेल्या ६ महिन्यापासुन सांगत आहोत. आकाशवाणी ते काव्यरत्नावली चौक हा शहरातला एक प्रमुख रस्ता आहे. जिल्हाधिकारी साहेब, एस.पी.साहेब, सगळे जजेस, सगळे गव्हर्नमेंट ऑफिसरांचे बंगले, सगळे तेथे राहतात, सगळे अधिकारी वर्ग राहतात किंवा एक वेगळा मार्ग म्हणुन त्या रस्त्याकडे बघितल जायचे, पुर्वी आजच्या दोन वर्षा आधी, त्या

ठिकाणी एखादा फ्रुट विकणारा सापडला तर सापडायचा, आजची परिस्थिती अशी आहे. आकाशवाणी पासुन ते काव्यरत्नावली पर्यंत पाय ठेवायला जागा नसते इतके हॉकर्स असतात. आणि त्यांच्याकडे ते ठेले रस्त्यावर लावतात. त्या रस्त्याला सगळ उध्वस्त करुन टाकलेले आहे. आणि मी गोसावी साहेबांशी दोन वेळापण वैयक्तिक बोललेलो आहे. संजय ठाकुरला मी कमीतकमी चार वेळा सांगितले आहे. काहीही कार्यवाही होत नाही. मी सांगितल्यानंतर तेथुन दहा दिवसासाठी गाडया हलतात. आपलेच लोकं सांगतात. तक्रार आहे आम्ही गाडया उचलायला येतो आहे. ते गाडया परत जातात. दहा दिवसानंतर परत गाडया येतात. म्हणजे आमच्या सदस्याच्या बोलायला काही किमंत आहे की नाही. नितीन बरडेंनी सांगितले प्रभात कॉलनी चौकापासुन ते जिल्हाधिकारी बंगल्यापर्यंत म्हणजे एम.जे.कॉलेज पासुन जिल्हाधिकारी साहेबांच्या बंगल्यापर्यंत जातो आपण.तो रस्ता क्लीन केला पाहिजे तुम्ही त्या रस्त्याची अवस्था बघा एम.जे. कॉलेज जवळ सकाळी १०.०० वाजे पासुन १.०० वाजेपर्यंत आणि संध्याकाळी ५.०० ते ८.०० वाजेपर्यंत अवस्था बघा काय असते. आम्ही जिव तोडुन सांगतो, एक वर्षापासुन सांगतो आहे की, आम्हाला प्रभात कॉलनी ते कलेक्टर साहेबांच्या बंगल्यापर्यंत एम.जे.कॉलेज समोरचा पुर्ण रस्ता क्लीन पाहिजे. आणि आकाशवाणीचा रस्ता तेथे त्यांनी पोट भरावे ना, त्यांनाही पोट आहे, त्यांचेही कुटुंब आहे. त्यांना संसार बघायचा आहे. त्यांना पोट पाणी आहे आम्ही नाकारत नाही ना. गरीबांचे शत्रु नाही आम्ही. पण तुम्ही शत्रु बनविता आम्हाला, वारंवार बोलायला लावता. एका सदस्यानी सुचना जर केली तर तुम्ही त्याचे पालन जर केले त्यावर कार्यवाही जर केली तर आम्हाला वारंवार बोलावे लागणार नाही. तुम्हाला दहा वेळा सांगितल्यानंतर पेपर मध्ये तुम्ही आमचे नाव द्याल आणि तुमचे कर्मचारी त्या हॉकर्सला जाऊन सांगतात की, बंटी जोशीची तक्रार आहे, म्हणजे ते सगळे हॉकर्स सकाळी ८.०० वाजता माझ्या दारी असतात. म्हणजे तुम्ही त्यांना आमच्याशी दुर करतात का ? त्यांनी पोट भरायला पाहिजे आमचा काहीही वाद नाही. त्यांनी पोट भरायला पाहिजे आमचे काहीही म्हणणे नाही. याच ठिकाणी मॅडम आकाशवाणी ते काव्यरत्नावलीचे जे हॉकर्स होते त्यांना वाहुळे साहेबांनी कोविड पिरेड मध्ये सगळयांना महाबळ पर्यंत मी काव्यरत्नावली म्हणतो आहे, वाहुळे साहेबांनी आकाशवाणी पासुन ते महाबळ पर्यंत सगळे हॉकर्स यांना छत्रपती संभाजीराजे नाटयगृहाजवळ बसवत होते, मागच्या रस्त्याला, तुम्ही रस्त्यावर बसु नका आत मध्ये बसा, आता त्याठिकाणी ओटे झाले, दुकाने झाली, लोकांनी आता पक्के ओटे होऊन गेले तेथे, तिथे बसायला लागले, त्यांच्याच फॅमिलीतला, पोरगा, पुतण्या, मामा, मामी, काका, काकु यापैकी परत या रस्त्यावर बसायला लागले, याला कुठलेही बंधन नाही, नियोजन नाही, शहर विद्रुप करायचे आहे. सागरपार्क नो हॉकर्स झोन आहे तेथे हॉकर्स लावायला लागले, एक वर्षापासुन आम्ही सांगत आहे. त्याच्याकडे लक्ष दिले जात नाही. याच्यावर कार्यवाही होणार आहे का साहेब ? मला तुमच्याकडुन खुलासा पाहिजे. कायम स्वरुपी, दुसरा विषय बॅनर्सचा मी नेहमी सांगतो, मंदिर आणि महापुरुषांच्या पुतळया जवळ परवानगी देऊ नका. मी मॅडम आपल्या समोर तिसऱ्यांदा बोलत आहे. त्याच्यावर ही कार्यवाही होत नाही. आता मी विषयाला सोडुन बोलत नाही. याच्यातच एक विषय होता. ओपन स्पेसचा विषय आहे म्हणुन महापौरांनी संधी द्यावी दोन मिनीट बोलण्याची.

**श्री.ललित कोल्हे :-** बंटी बंटी.

**श्री.अनंत जोशी :-** या हॉकर्सची साहेब, गोसावी साहेब आता जे मी सांगितले दोन रोड आहेत साहेब, त्याच्यावर कार्यवाही आपण कधी पर्यंत कराल आणि ती कायम असेल किंवा नसेल. म्हणजे मी सांगतो, आपल्या कर्मचाऱ्यांना मी चेहऱ्याने ओळखतो, नावाने ओळखत नसेल मी पण चेहऱ्याने ओळखतो, जे आपले अतिक्रमणचे कर्मचारी आहेत.

**श्री.सचिन पाटील :-** तसाच आमचा प्रभाग आहे, रिंगरोडपासुन ते ख्वाजामियाँ चौकापर्यंत.

**श्री.**कैलास सोनवणे :- सगळयात जास्त त्रास मला आहे.

**श्री.अनंत जोशी :-** साहेब यांची ही तक्रार आहे. साहेब मी आपल्या कर्मचाऱ्यांना नावानीशी ओळखत नसेल पण मी चेहऱ्याने ओळखतो, आपले अतिक्रमणचे कर्मचारी त्या सागरपार्कच्या रोडावर दिवसातुन दोन चारदा बसलेले असतात टु-व्हिलरवर, येता जाता मी बघतो त्यांना, त्यांच्याकडे कार्ड पण असतात आपल्या महापालिकेने त्यांना नेमलेले कशासाठी आहे तेथे, हॉकर्स नसावे म्हणुन नेमलेले आहे. कार्यवाही करण्यासाठी नेमलेले आहे. तेथे. ते बसलेले असतात झाडाखाली, कार्यवाही करत नाही. आणि तुम्ही आज एक उत्तर सांगा की, या दोन्ही रस्त्यावरील आणि सन्मा.सदस्य जे बोलले त्या रस्त्यावरील कार्यवाही कधी होणार आणि ती कायमस्वरुपी असेल किंवा नाही. त्याची उपाययोजना सांगा, आपला रहिवास पण तेथेच आहे. आपण म्हणाल तर संध्याकाळी घरी जाता जाता फिरुन येऊ ते परिसर. पुढच्या मिटींगपर्यंत होईल का ?

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई, सागरपार्क वरुन विषय निघाला आणि तो हॉकर्सकडे गेला, बंटीभाऊंना त्रास जेवढा होतो त्याच्या ५० पटीने त्रास मला होतो, त्यामुळे, तुम्ही सगळयांनी मला पाहिले असेल, फक्त टु-व्हिलरवरच पाहिले असेल, ४-व्हिलरमध्ये फिरु शकत नाही. घरुन येतो तर इथपर्यंत, सगळे जण जाऊन चक्कर मारा तुम्ही, सगळे जण रस्त्यावरती, हा मेन रोड, म्हणजे हे बोलले रिंगरोड वगैरे, म्हणजे एकच भाग नाही, सगळया ठिकाणी आहे ते, ते कसा व्यवसाय करतात, हे जे बोलले ना की, मोटर सायकलवरच, सांगत पण नाही की, तु बाजुला लाव. आणि जळगांवकर पण मोटर सायकलवरतीच बाजार करतात. असेच उभे राहतात आणि घेतात. प्रत्येक जण, मॅक्जीमम लोकं. त्याच्यावरती खरोखर ते जे सांगत आहे ना. कार्यवाही व्हायला पाहिजे.

**श्री.अनंत जोशी :-** ते सकाळ पासुन संध्याकाळ पर्यंत उन्हात बसुन पैसे कमवितात, मुलांच पालनपोषण करतात आपला त्याच्या बद्दल वाद नाही. माझे असे म्हणणे आहे, त्यालाच धरुन आपण याचा पण विचार करावा की, शहराचे विद्रुपीकरण होणार नाही. म्हणजे तुम्ही शहर विद्रुप करणार आहात का ? शहराला कुठे नियोजन असायला पाहिजे की नको रस्त्यांबद्दल आपली काळजी असली पाहिजे की नको, पायी लोकांनी व्यवस्थीत चालल पाहिजे. शहर व्यवस्थीत दिसले पाहिजे. व्यवस्थीतपणा असावा किंवा नसावा. आपला मुद्दा आहे म्हणुन बोलत आहे आम्ही, त्यांच्याबद्दल बोलण्याचे काही कारण नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** बंटी भाऊंनी जसे सांगतले, ती सगळी वस्तुस्थिती आहे. माझ्या वार्डात पण २ ते ३ हॉकर्स बसायला लागले भाजी विक्रेते तेव्हा पासुन मी या विषयाचा पाठपुरावा करते पण काही ही बदल होत नाही. हायवे आहे तेथे, वळन रस्ता आहे. शाळेकडे, कॉलेजकडे जाणारा मार्ग आहे. प्रचंड त्रास होतो. म्हणजे तिथुन कार तर तुम्ही काढुच शकत नाही. टु-व्हिलरवर सुध्दा जाणे मुश्किल होते. पुर्ण रस्ता भरलेला असतो बाजाराने, जिल्हा परिषद सदस्यांचा बंगला आहे. या सगळया रस्त्यांवर त्रास आहे.

**मा.महापौर :-** गोसावी साहेब, आपण उत्तर द्या की, या संदर्भात आपण काय कार्यवाही केली.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कसे आहे बघा, या सगळयांचा मुळ तुम्हाला सांगु का ? याच्यामध्ये प्रचंड भ्रष्टाचार आहे. सगळयात जास्त भ्रष्टाचार होत असेल तर या अतिक्रमण विभागात. म्हणजे मी म्हणतो याचे आकडे आपण ऐकले नसतील. आपण सदस्य ५-५० हजाराच्या कामासाठी येथे महानगरपालिकेमध्ये फेऱ्या मारुन थकुन जातो. परंतु फुले मार्केटचा आकडा आपण तर आपलेही डोकं चकरावेल. इतक्या मोठया प्रमाणावरती या विभागामध्ये भ्रष्टाचार आहे की, लाखो रुपयाची हप्तावसुली या माध्यमातुन होत असते. ही वस्तुस्थिती आहे. याला जर कधी म्हटले तर स्टींग ऑपरेशन करुन पुरावे सुध्दा देऊ शकतो. कारण शेवटी काय आपलेच दांत आपलेच ओठ आपलेच कर्मचारी आहे. परंतु आपले म्हणणे हेच आहे. हा जो सामान्य माणसाचा उदनिर्वाहचा जो विषय आहे. त्याच्यामध्ये महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचा हेतु स्वच्छ असला तर आपण समजु शकलो असतो. परंतु बसविण्याच्या संदर्भातला सुध्दा आणि उठवण्याच्या संदर्भातल्या सुध्दा सुपाऱ्या घेतल्या जातात त्या डिपार्टमेंट कडुन, इतकी गंभिर परिस्थिती आहे. या संदर्भात आपण फुले मार्केटला जाऊन बघा. ५ x५ च्या जागा आहे. या लाखो रुपयांनी विकल्या जातात. आज एखादी जागा मी आरक्षीत करुन ठेवलेली आहे. मी ती जागा सुनिल भाऊंना विकतो रु.५० हजारात. सुनिलभाऊ लाख रुपयात दुसऱ्याला विकतात. म्हणजे जे दुकानदार आपल्याला भाडे देत नाही. त्याच्यापेक्षा मोठया किमतीच्या त्या अतिक्रमण मधल्या जागा तेथे आहे. हा खुप गंभिर विषय आहे. याला खुप गांभिर्याने हाताळावा लागेल. जितका वाटतो तितका सोपा नाही. आणि नावे सांगण्याच्या मागची स्ट्रॅटेजी जी असते ती हीच असते की, जेणे करुन त्या नागरीकांनी सन्मा.सदस्यांकडे जावे आणि सन्मा.सदस्य धर्मसंकटात सापडतात आणि मग त्या विषयाचा ते नास ओढतात. हे सगळा खेळ आहे. ही मॉडस ऑप्रेंडी आहे सगळी. तर या संपुर्ण विषयाला तुम्ही थेट पर्यंत जर जाल. ज्या पध्दतीने आपण प्लास्टीकच्या पिशव्यांवर कार्यवाही संदर्भात चंग बांधलेला आहे तसेच या अतिक्रमण निर्मुलनच्या संदर्भात सुध्दा आपण एक निश्चय करावा आणि या जळगांव शहराला कमीतकमी काही भाग आहे मुख्य रस्त्यांचे की, जेणे करुन जिथुन शहरातील मोठया प्रमाणावर रहदारी तेथुन जाते. गणेश कॉलनीच्या रस्त्याची परिस्थिती आहे. संध्याकाळी आपल्या येथुन गेलो, हॉस्पीटलला गणेश कॉलनीला, रस्त्याच्या दुतर्फा पहा, मध्ये डिव्हायडर आहे. रस्त्याची साईज ऑलरेडी छोटी झालेली आहे. परंतु रस्त्याच्या दुतर्फात सगळे भाजीवाले बसलेले आहे. मग अश्या परिस्थितीमध्ये एखादा अपघात घडला तर ज्याच्या हातुन अपघात घडला असेल त्या माणसाचा जिव जायची वेळ येते. इथपर्यंत वाईट परिस्थिती आहे तेथे.

**श्री.अनंत जोशी :-** ठिक आहे आज पहिल्यांदा चर्चा झाली अतिक्रमण संदर्भात आपल्या समोर, आपण जेव्हापासुन पदभार घेतला तेव्हापासुन याच्या संदर्भात भ्रष्टाचारावर मी आज पर्यंत बोललो नाही, हा जो काही प्रॉब्लेम आहे त्यावर बोललेलो आहे. पण याच्यात सुधारणा नाही झाली तर याच्याकडे नितीन भाऊ जे बोलले, त्यांच्याकडे आहे सगळया सदस्यांकडे आहे. माझ्याकडे तर खुप आहे. मी सगळच आणेल आणि सगळच बोलेल. पण त्या गोष्टीत जायच नसत. जर सुधारणा नाहीच झाली तर मी याच्या पुढे बोलेल.महापौरताई, महापौरताई. आप्पा साहेब दोनच मिनीट, महत्वाचे आहे आणि परत बोलु शकणार नाही. आयुक्त मॅडम एखाद्या संस्थेला जर आपण जागा दिलेली असली तर ओपनस्पेस आपल्या महापालिकेची २० वर्षापुर्वी, जागा त्यांनी त्याचा व्यावसायीक वापर केला असेल, सर्व अटीशर्तीचा नियमाचा भंग केला असेल, आणि सिध्द झाले असेल तर वारंवार. ती जागा आपण ताब्यात घेण्याचे प्रयत्न करत असतो. त्या ठिकाणी समजा बॉडी डिझॉल झाली असेल आणि प्रशासक त्या ठिकाणी नेमला गेला असेल, तर आपल्या विरोधात प्रशासक कोर्टात जाऊ शकतो का ?

**मा.आयुक्त :-** त्यांना नोटीसी देऊन उत्तर मागवायला पाहिजे.

**श्री.अनंत जोशी :-** बॉडी नाही, प्रशासक आपल्या विरोधात जाऊ शकतो का ?

**मा.आयुक्त :-** आपण नोटीस दिलेली असली तर जाऊ शकतो.

**श्री.अनंत जोशी :-** ठिक आहे जाऊ शकतो. याच्यात विषय असा होता मॅडम एक ओपनस्पेस आहे ३० वर्षापुर्वीची माझ्या प्रभागातली. ३० वर्षापुर्वी एका पतपेढीला दिलेली होती. पतपेढी म्हटली म्हणजे समस्या आली.

**मा.आयुक्त :-** सानेगुरुजी.

**श्री.अनंत जोशी :-** नाही. सानेगुरुजी नाही. जळगांव नागरीक पतपेढी म्हणुन आहे. आता ३० वर्षापासुन त्यानी त्याचा वापर ही केलेला आहे. आता १०-१२ वर्षापासुन ती पतपेढी बंद आहे. त्यांनी कुठेतरी दुसरीकडे शिफ्ट केली ती सोसायटी. ती बिल्डींग बंद आहे. भंगार अवस्थेत आहे, खंडर झालेली आहे पुर्ण. ५-६ हजार स्के.फुटाची छोटीशी ओपनस्पेस आहे. तो वापरात येत नाही. त्यांनी सोसायटी दुसरीकडे शिफ्ट केलेली आहे. यापुर्वी जेव्हा आपण ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. ते कोर्टात गेले, कोर्टाने त्यावेळेस असे म्हटले होते की, ती प्रोसिजर जी आहे ताब्यात घेण्याची तुम्ही व्यवस्थीत फॉलो केलेली नाही. ती फॉलो करा म्हणुन. सन २०१२ किंवा २०१४ ला झालेले असेल. त्याच्यानंतर त्या परिसरातील नागरीक २०१२ - २०१४ पासुन भांडत आहे की, ती जागा आम्हाला परत द्या म्हणुन गेल्या वर्षापासुन मी याचा पाठपुरावा करत आहे. त्या नागरीकांनी मला सांगितल्यामुळे, आपले नगररचनेकडुन करवंदे साहेबांनी, आणि शिरसाठ साहेबांनी पुर्ण प्रोसिजर व्यवस्थीत, मी व स्वत:आपले विधी विभागाचे मुजुमदार साहेब सगळयांनी तेथे बसुन सगळे मुद्दे काढले की, त्यांनी कोणत्या कोणत्या अटीशर्तीचा भंग केलेला आहे. ती जागा आपण का ताब्यात घेतली पाहिजे. असे करत असतांना ते विरोधीपक्ष नेत्यांकडे आले सोसायटीचे लोकं, त्यांनी मला विरोधीपक्ष नेत्यांकडे बोलविले आणि त्या ठिकाणी मला असे सांगितले, सुनिलभाऊंना असे सांगितले की, ही जागा ताब्यात घेत आहे. इतक्या वर्षापासुन आमच्या ताब्यात होती. आमची पहिली बॉडी डिझॉल झालेली आहे दुसरी बॉडी अजुन आलेली नाही. तुम्ही जागा ताब्यात घेतली तर याच्यात आमची नाचक्की होईल. तुम्हाला काय करायचे आहे तेथे. मी त्यांना सांगितले की, मला बगिचा करायचा आहे. माझा एक मित्र आहे त्या कॉलनीत राहणारा आहे. तो १५ लाख रूपये खर्च करून मला तेथे बगिचा बनवुन देणार आहे. आमची ड्रॉईंग्स ही सुध्दा तयार आहे. १५ लाख रूपये स्वखर्चाने करुन देणार आहे. मी सुनिलभाऊंना सांगितले की, मला तेथे बगिचा करायचा आहे. माझा मित्र करून देत आहे. तो लोकसहभागातुन होईल. त्या सोसायटीच्या लोकांनी आम्हाला सांगितले की, ४-६ महिने आम्हाला द्या आम्ही स्वत: बगिचा करून देतो. आणि ते ४-६ महिने संपत आले आता. सोसायटीची मागितलेली मुदत संपत आली आता. ते परत कोर्टात गेले आता सोसायटीचे लोकं. आपल्या शिरसाठ साहेबांनी सगळी प्रोसिजर झालेली आहे आपली जागा ताब्यात घेण्याची नगररचना कडुन फक्त स्पिकींग ऑर्डर बाकी होती मला वाटते. यांनी परत कोर्टात गेल्यामुळे, कोर्टानी अभिप्राय घेण्यासाठी परत आपल्या वकीलांकडे पाठविले की, याच्यावर अभिप्राय द्या की हे कोर्टात गेले म्हणुन कोर्टाने स्टेटसको दिलेला नाही स्टे दिलेला नाही. काहीच नाही फक्त ते कोर्टात गेलेले आहे. तरी सुध्दा आपल्या वकीलाने त्याच्यावर लिहलेले आहे की, सद्यास्थितीत ते कोर्टात गेलेले असल्याने त्यांच्यावर कार्यवाही करु नये. स्टे नाही, स्टेटसको नाही मग का कार्यवाही करु नये. आणि वकीलाने असा अभिप्राय का द्यावा. जर कोर्टाने असे म्हटले नाही. कोर्टात कोणीही जाऊ शकतो.त्यांचा अधिकार आहे. आपल्या लोकांनी कार्यवाही का थांबवली. माझ ी विनंती आहे. ती जागा कश्या पध्दतीने लवकरात लवकर ताब्यात घेता येईल. तुम्हाला परत से मागवायच

असेल वकीलांकडे परत त्यांच्याकडे नव्याने पाठवा साहेब आणि त्याच्यावर अभिप्राय मागवा आपल चार दिवस पहिले बोलणे झाले होते. मी येथे बोलणार नव्हतो, तुम्ही सगळच केलेल आहे. खुप कॉपरेट केलेले आहे. मी शिरसाठ साहेबांबद्दल पण बोलत नाही. ज्या दिवशी नितीनभाऊ स्वत: बोलले तुमच्याशी तर त्या दिवसापासुन से मागविला का तुम्ही. अभिप्राय मागविला का ?

**श्री.करवंदे, सहा.नगररचनाकार :-** (आवाज अस्पष्ट असल्यामुळे नेमके काय बोलले ते समजत नाही.)

**श्री.अनंत जोशी :-** मग आपले बोलणे झाले होते. तुम्ही मला सांगायला पाहिजे होते, मी बोलेल, नितीनभाऊ बोलतील.शिरसाठ साहेबांनी आजपर्यंत याची कल्पना दिली नाही मला. ठिक आहे आता मी वेळ जास्त घेत नाही. माझी विनंती आहे की, ती जागा लवकरात लवकर ताब्यात घेण्यात यावी. आणि ते लोकं कमर्शियल वापर करीत होते मॅडम, त्यांनी सगळया अटीशर्तींचा भंग केलेला आहे. आणि लोकांचा नागरीकांचा हक्क आहे त्याच्यावर. माझी विनंती आहे की, ती जागा ताब्यात घेण्यात यावी. आता साहेबांनी मी जे बोललो, अतिक्रमण बद्दल मी जे बोललो कृपया कार्यवाही करा ही माझी विनंती आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** क्रिकेट संदर्भात, लाऊडस्किरचा जो विषय आहे. लाऊडस्पिकर कॉमेंटरी क्रिकेटची आत्मा आहे. क्रिकेटच्या संबंधी हा विषय आहे. त्याच्यावर बंदी आणण्यापेक्षा त्याच्या आवाजाला मर्यादा दिली पाहिजे.

**श्री.अनंत जोशी :-** कोण मोजेल.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मोजायला पाहिजे.

**श्री.अनंत जोशी :-** सुप्रिम कोर्टाने डिसीपल ठरवुन दिलेले आहे. त्याप्रमाणे कार्यक्रमामध्ये डिसीपल मोजायला जाऊ, कोणीही मोजु देणार नाही. कोणी जात नाही. पोकळे साहेब, तुमच घर शिवाजी नगरला आहे. तुमच्यासाठी बोलणे सोपे आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** तुमचा आमचा विषय नाही. या शहरातला विषय आहे.

**श्री.अनंत जोशी :-** क्रिकेटचा आत्मा वगैरे जाऊ द्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** मुद्दाम तुम्ही या विषयावर उठले म्हणुन मी उठत नव्हतो. मी या विषयावर बोलणारच होतो.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** आप्पा साहेब, कॉमेंटरीचा विषय आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** एक मिनीट ऐका ना. आदरणीय शिंदे साहेब, आदरणीय शिंदे साहेब.

**श्री.अनंत जोशी :-** क्रिकेटचा आत्मा वैगेरे काही नसतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी बोलणारच होतो या विषयावर फक्त यांचे बोलणे संपण्याची वाट पाहत होतो. गोराणे साहेब, ठरावामध्ये नमुद करा, बंटीभाऊ जे बोललेले आहे ते सर्व, क्रिकेटला स्पिकरलाही परवानगी नाही आणि डी.जे.ला ही परवानगी नाही. आणि हे मुद्दाम नाही बोलत आहे तुम्ही उठले म्हणुन मी हे बोलणारच होतो. तुमची बसण्याची वाट पाहत होतो. तुम्ही मिटींग लांबवली. ते करायलाच पाहिजे. कारण याच्याने त्रास होतो म्हणजे होतो. नागरीकांना त्रास होतो आणि ते शिव्या नागरीकांना घालतात. आणि हे ज्या दोन नगरसेविका बसलेल्या आहे यांनाही त्रास होतो. लोकं बोलतात, यांनाही लोकं बोलतात.हे प्रॅब्लम आहे तेथे.

**श्री.अनंत जोशी :-** प्रत्येक समाजाच्या टुरनामेंट तेथे भरायला लागल्या आहेत. आणि सकाळ संध्याकाळ जे पोरं तेथे क्रिकेट खेळतात सगळे रेग्युलर खेळणारे, सगळी माझी मित्र मंडळी आहे. मी सगळयांची नाराजी ओढुन घेतो आहे. सगळयांशी वाईटपणा घेतो आहे. पण जे योग्य आहे ते योग्य आहे. पण तिथल्या लोकांचा त्रास त्यांनाच माहित आहे. हे बोलणे सोपे आहे, तुमच्या घराच्या शेजारी असत तर तुम्ही बोलले नसते का.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** माझ्या म्हणण्याचे अर्थ असे नाही की, नागरीकांना त्रास द्या. परंतु ते सागरपार्कचे मैदान असेल, त्याठिकाणी मैदानी खेळ खेळले जातात.

**श्री.अनंत जोशी :-** मैदान नाही ते, मैदान नाही.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मग तुम्ही कबड्डी, क्रिकेट, खो-खो कसे खेळतात तेथे जाऊन, मग तुम्ही सांगा ना तेथे जाऊन.

**श्री.अनंत जोशी :-** अरे, गावात जागा नाही म्हणुन लोकांना सुविधा करुन दिलेली आहे.

**श्री.सचिन पाटील :-** आयुक्त साहेबा, त्या ठिकाणचे सर्व खेळ बंद करा.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** त्या ठिकाणी जर लाऊडस्पिकर बंद केले तर या विषयाला माझा विरोध आहे.

**श्री.अनंत जोशी :-** आप्पा साहेब, कबड्डीच्या मॅचेस किती भरतात, कुस्तीचे किती भरतात.

**श्री.कैलास सोनवणे :-** कर नियमित भरतात.

**श्री.अनंत जोशी :-** याच्या शिवाय कुठले खेळ होतात तेथे, फक्त क्रिकेट आणि क्रिकेटच होतो तेथे. आणि मॅडम, सकाळी स्पर्धा परिक्षाची तयारी करणारे मुलं, जे पोलिस भरती किंवा इतर परिक्षाची तयारी करतात. २००-२५० मुलं तेथे तयारी करतात. आपण त्यांना विरोध करतो का? त्यांनी जो प्रश्न केला ना. वकील साहेबांना माहित नाही अजुन वकील साहेब तज्ञ आहे पण त्यांना माहित नाही अजुन ते खेळाचे मैदान नाही. आपल्या गावात नागरीकांसाठी जागा नाही, स्टेडियम नाही. म्हणुन लोकांसाठी सुविधा म्हणुन राहु दिले ते. त्याच्या बद्दल आरक्षण कसले आहे ते वाचुन घ्या. ते मैदान नाहीच.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मुळ मुद्दयावर बोला, रिझरवेशनवरच्या बोला, त्या टॉपीकवर बोला, तुम्ही प्रस्ताव मांडत आहे. तुम्ही प्रस्ताव मांडत आहे. भाडे डिसाईड करत आहे. जागेचे भाडे घेत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** अहो गोराणे साहेब, ठरावामध्ये मी जो ठराव मांडत आहे. एक गोष्ट अजुन नमुद करा. कबड्डी आणि कुस्तीचे रु.५००/- करा फक्त.

**श्री. नितीन बरडे :-** ह्या वर्षातुन एकदा होता इतर स्पर्धा फक्त. क्रिकेट रोज खेळ चालतात तेथे. इतर स्पर्धा वर्षातुन एक एक होतात तेथे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** कॉमेंटरी हा एक प्रकार आहे त्याच्यात फक्त, त्याला तुम्ही आवाजाची मर्यादा दिली पाहिजे. कमी आवाजाला परवानगी देणेस काही हरकत नाही.

**श्री.अनंत जोशी :-** माझे एक सजेशन आहे. मला तुमची तळमळ कळत आहे. मला तुमचे म्हणणे कळत आहे. किती पोटतिळकीने तुम्ही बोलत आहात ते योग्य आहे. माझे असे सजेशन आहे. तेथे जे टुरनामेंट भरतात, सगळयाच समाजाच्या भरायला लागले आता. आणि ५-५ दिवस सगळया टुरनामेट चालतात तेथे, ते लोकं सकाळचा नास्ता, दुपारचा नास्ता, सकाळची चहा, संध्याकाळची चहा, दोन्ही वेळचे जेवण तेथे २५-२५ लाख रुपये खर्च करतात. घ्या भाड्याने खुप जागा आहे गावामध्ये, खुप नविन लॉन तयार झालेले आहे जे भाड्याने देतात. भाड्याने घ्या तेथे सागरपार्कवर कशाला येता आहे.

**श्री.सचिन पाटील :-** दुसऱ्या काही टुरनामेंट जे आहे जी.एस.ग्राऊंडवर होतात.

**श्री.अनंत जोशी :-** तुम्ही २५-२५ लाख रुपये टुरनामेंटवर खर्च करतात, घ्या ना जागा भाड्याने. खुप ग्राऊंड तयार झालेले आहे गावामध्ये.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मी कसे काय चॉईस देऊ शकतो इथे नका घ्या आणि तेथे घ्या.

**मा.महापौर :-** या विषयावर बरीच चर्चा झालेली आहे. सन्मा.सदस्यांनी जे बदल सुचविलेले आहे. त्या पध्दतीने बदल करावे.

**मा.उपमहापौर :-** आपण जो मुळ प्रस्ताव मांडला, त्याच्यामध्ये सन्मा.सदस्यांनी काही बदल सुचविलेले आहे. म्हणजे भाडे आकारणीच्या संदर्भात. सर्व सन्मा.सदस्यांनी प्रस्तावामध्ये बदल सुचविलेले आहे. ते सर्व मान्य करावे. माझा या प्रस्तावाला अनुमोदन आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** गोराणे साहेब, लक्षात आले का ? रु.५००/- कबड्डी आणि कुस्तीसाठी आणि हे टाका क्रिकेटला स्पिकर आणि डी.जे.ला परवानगी नाही.

**मा.महापौर :-** विषय क्र.०६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे आणि सन्मा.सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह विषय क्र.०६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. आणि विषय अवांतर होणार नाही याची सगळयांनी कृपया काळजी घ्यावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं.८४५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका मालकीच्या बालगंधर्व नाटयगृह, सागर पार्क मैदान, महानगरपालिकेचे उदयान, बगीचे, खुल्या जागा अनामत घेऊन जागा तात्पुरत्या स्वरुपात भाडयाने देणेबाबत प्रशासनाने दिलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महासभेने महासभा ठराव क्र.७६३ दि.२४/०३/२०२२ पारीत केला असून सदर ठरावानुसार सदर बाबतीत प्रशासनाने सन्मा.सदस्यांकडून सूचना, अटी-शर्ती व दरांसंबधी माहिती मागवून सविस्तर प्रस्ताव पूढील सभेत सादर करणेबाबत निर्देशित केले होते. त्यानुसार दि.२०/०५/२०२२ रोजी मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली उक्त विषयाबाबत बैठक झाली असता, बैठकीत उपस्थित सन्मा.सदस्य यांनी सुचविलेल्या सूचना, अटी-शर्ती व दर यानुसार खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

| अ. | मनपा जागेचा | कार्यक्रमाचा | सदयाचा | प्रशासनाने | सदयाचे | प्रशासनाने | सन्मा.सदस्यांनी | सन्मा.सदस्यांनी | सन्मा.सदस्यांनी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

| क्र. | तपशिल | प्रकार | भाडेदर प्रति दिवस (रु.) | सादर केलेल्या प्रस्तावातील भाडे दर प्रति दिवस (रु.) | अनामत दर (रु.) | सादर केलेल्या प्रस्तावातील अनामत दर (रु.) | सुचविलेल्या सुचना नुसारचे भाडेदर प्रति दिवस (रु.) | सुचविलेल्या सुचना नुसारचे अनामत प्रस्तावीत दर (रु.) | सुचविलेल्या सुचना नुसारचे स्वच्छताबाबतीचे सेवाशुल्क (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बालगंधर्व नाटयगृह | धार्मिक कार्यक्रम/ सांस्कृतिक कार्यक्रम | १००० | २००० | ५००० | ५००० | ५००० | २०००० | २००० |
| | | लग्न/वाढदिवस/मुंज/ इतर खाजगी कार्यक्रम | ३००० | १०००० | ५००० | १०००० | बालगंधर्व नाटयगृह हे नाटक, सांस्कृतीक कार्यक्रम व धार्मिक कार्यक्रम या व्यतिरीक्त कोणत्याही कार्यक्रमाकरीता मुंज देण्यात येऊ नये. | | |
| | | व्यावसायिक नाटक (तिकीट असलेले) | ३००० | ५००० | ५००० | ५००० | १०००० | २०००० | १००० |
| | | हौशी नाटय संस्थेचे नाटक (तिकीट नसलेले) | २५० | १००० | ५००० | ५००० | २००० | ५००० | ५०० |
| २ | सागर पार्क मैदान | धार्मिक कार्यक्रम/ सांस्कृतिक कार्यक्रम | १००० | १०००० | ५००० | ५००० | १०००० | २०००० | ५००० |
| | | लग्न/वाढदिवस/ मुंज/ इतर खाजगी कार्यक्रम | ५०००० | ७५००० | २५००० | २५००० | २००००० | १००००० | ५००० |
| | | नाटक / सर्कस | ५००० | १०००० | ५००० | १०००० | २५००० | ५०००० | ५००० |
| | | क्रिडा स्पर्धा - क्रिकेट | १००० | १०००० | ५००० | १०००० | २५००० | १००००० | ५००० |
| | | क्रिडा स्पर्धा - कबड्डी /कुस्ती | १००० | १०००० | ५००० | १०००० | ५००० | १०००० | २००० |
| | | व्यावसायिक प्रदर्शन / आनंद मेळा | ५००० | १५००० | ५००० | १०००० | २५००० | ५०००० | ५००० |
| ३ | महानगरपालिकेचे खुल्या जागा (सागर पार्क व्यतिरिक्त) | धार्मिक कार्यक्रम/ सांस्कृतिक कार्यक्रम | १००० | ३००० | १००० | ५००० | ५००० | ५००० | २००० |
| | | लग्न/वाढदिवस/मुंज/ इतर खाजगी कार्यक्रम | १००० | १०००० | १००० | १०००० | २५००० | २५००० | २००० |
| | | नाटक/सर्कस/ आनंद मेळा | १००० | १०००० | १००० | १०००० | १०००० | २०००० | २००० |
| | | क्रिडा स्पर्धा - क्रिकेट | १००० | ७००० | १००० | ५००० | १०००० | २०००० | २००० |
| | | क्रिडा स्पर्धा - कबड्डी/ कुस्ती | | | | | ५००० | १०००० | २००० |
| | | व्यावसायिक प्रदर्शन | १००० | १०००० | १००० | १०००० | १०००० | २०००० | २००० |
| ४ | महानगरपालिकेचे उदयान,बगीचे | महानगरपालिकेचे उदयानातील वृक्ष, फुलझाडे इत्यादीच्या संवर्धनासाठी तसेच त्याची हानी टाळण्यासाठी महानगरपालिकेचे उदयान, बगीचे लग्न, वाढदिवस, मुंज इत्यादी कोणत्याही खाजगी कार्यक्रमाकरीता देता येणार नाही. | | | | | महानगरपालिकेचे उदयानातील वृक्ष, फुलझाडे इत्यादीच्या संवर्धनासाठी तसेच त्याची हानी टाळण्यासाठी महानगरपालिकेचे उदयान, बगीचे लग्न, वाढदिवस,मुंज इत्यादी कोणत्याही खाजगी कार्यक्रमाकरीता देता येणार नाही. | | |

प्रशासनाने प्रस्तावात उपरोक्त प्रमाणे दर दिलेले असून सभागृहात झालेल्या चर्चेनूसार व सन्मा.सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे काही दरांमध्ये बदल करुन खालील प्रमाणे दर आकारणी करणेस व काही अटी-शर्तींचा समावेश करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ. क्र. | मनपा जागेचा तपशिल | कार्यक्रमाचा प्रकार | सदयाचा भाडेदर प्रति दिवस (रु.) | प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावातील भाडे दर प्रति दिवस (रु.) | सदयाचे अनामत दर (रु.) | प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावातील अनामत दर (रु.) | सन्मा.सदस्यांनी सुचविलेल्या सुचना नुसारचे भाडेदर प्रति दिवस (रु.) | सन्मा.सदस्यांनी सुचविलेल्या सुचना नुसारचे अनामत प्रस्तावीत दर (रु.) | सन्मा.सदस्यांनी सुचविलेल्या सुचना नुसारचे स्वच्छताबाबतीचे सेवाशुल्क (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बालगंधर्व नाटयगृह | धार्मिक कार्यक्रम/ सांस्कृतिक कार्यक्रम | १००० | २००० | ५००० | ५००० | ५००० | २०००० | २००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लग्न/वाढदिवस/मुंज/ इतर खाजगी कार्यक्रम | ३००० | १०००० | ५००० | १०००० | बालगंधर्व नाटयगृह हे नाटक, सांस्कृतीक कार्यक्रम व धार्मिक कार्यक्रम या व्यतिरीक्त कोणत्याही कार्यक्रमाकरीता देण्यात येऊ नये. | | |
| | | व्यावसायिक नाटक (तिकीट असलेले) | ३००० | ५००० | ५००० | ५००० | १०००० | २०००० | १००० |
| | | हौशी नाटय संस्थेचे नाटक (तिकीट नसलेले) | २५० | १००० | ५००० | ५००० | २००० | ५००० | ५०० |
| २ | सागर पार्क मैदान | धार्मिक कार्यक्रम/ सांस्कृतिक कार्यक्रम | १००० | १०००० | ५००० | ५००० | १०००० | २०००० | ५००० |
| | | लग्न/वाढदिवस/ मुंज/ इतर खाजगी कार्यक्रम | ५०००० | ७५००० | २५००० | २५००० | २००००० | १००००० | ५००० |
| | | नाटक / सर्कस | ५००० | १०००० | ५००० | १०००० | २५००० | ५०००० | ५००० |
| | | क्रिडा स्पर्धा - क्रिकेट | १००० | १०००० | ५००० | १०००० | २५००० | १००००० | ५००० |
| | | क्रिडा स्पर्धा - कबड्डी /कुस्ती | १००० | १०००० | ५००० | १०००० | ५०० | १०००० | २००० |
| | | व्यावसायिक प्रदर्शन / आनंद मेळा | ५००० | १५००० | ५००० | १०००० | २५००० | ५०००० | ५००० |
| | | राजकिय सभा | - | - | - | - | २१००० | ५०००० | ५००० |
| ३ | महानगरपालिकेचे खुल्या जागा (सागर पार्क व्यतिरिक्त) | धार्मिक कार्यक्रम/ सांस्कृतिक कार्यक्रम | १००० | ३००० | १००० | ५००० | १००० | ५००० | २००० |
| | | लग्न/वाढदिवस/मुंज/ इतर खाजगी कार्यक्रम | १००० | १०००० | १००० | १०००० | ५००० | २५००० | २००० |
| | | नाटक/सर्कस/ आनंद मेळा | १००० | १०००० | १००० | १०००० | १०००० | २०००० | २००० |
| | | क्रिडा स्पर्धा - क्रिकेट | १००० | ७००० | १००० | ५००० | १०००० | २०००० | २००० |
| | | क्रिडा स्पर्धा - कबड्डी/ कुस्ती | | | | | ५०० | १०००० | २००० |
| | | व्यावसायिक प्रदर्शन | १००० | १०००० | १००० | १०००० | १०००० | २०००० | २००० |
| ४ | महानगरपालिकेचे उदयान,बगीचे | महानगरपालिकेचे उदयानातील वृक्ष, फुलझाडे इत्यादीच्या संवर्धनासाठी तसेच त्याची हानी टाळण्यासाठी महानगरपालिकेचे उदयान, बगीचे लग्न, वाढदिवस, मुंज इत्यादी कोणत्याही खाजगी कार्यक्रमाकरीता देता येणार नाही. | | | | | महानगरपालिकेचे उदयानातील वृक्ष, फुलझाडे इत्यादीच्या संवर्धनासाठी तसेच त्याची हानी टाळण्यासाठी महानगरपालिकेचे उदयान, बगीचे लग्न, वाढदिवस,मुंज इत्यादी कोणत्याही खाजगी कार्यक्रमाकरीता देता येणार नाही. | | |

वरील तक्त्यात नमूद केल्यानुसार जळगांव शहर महानगरपालिका मालकीच्या बालगंधर्व नाटयगृह, सागर पार्क मैदान, तात्पुरत्या स्वरुपात भाडयाने देणे करीता खालील अटी व शर्ती निश्चित करण्यात येत आहेत.

१) ज.श.म.न.पा.चे बालगंधर्व नाटयगृह, सागर पार्क मैदान, व महानगरपालिका मालकीच्या खुल्या जागा तात्पुरत्या स्वरुपात भाडयाने मिळणेकामी जास्तीत जास्त ३ महिने अगोदर आरक्षीत करता येईल, त्याकरीता लेखी अर्ज व अर्जासोबत सदर जागेचे विहीत संपुर्ण भाडे व अनामत रक्कमेचा भरणा करणे बंधनकारक राहील.

२) आरक्षण केल्यानंतरही अर्जदाराचे आरक्षण, परवानगी रद्द करण्याचा संपुर्ण अधिकार आयुक्त,जळगांव शहर महानगरपालिका यांचा राहील, अश्या परिस्थितीत अर्जदाराने मनपात भरणा केलेले अनामत व भाडे रक्कम परत करण्यात येईल, सदर रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही. त्यासाठी कोणतीही नुकसान भरपाईची मागणी करता येणार नाही.

३) अर्जदारास आरक्षण केलेल्या तारखेबाबत बदल करता येणार नाही.

४) अर्जदाराने आरक्षण रद्द करणेबाबत मागणी केल्यास, अश्या परिस्थितीत आरक्षण केलेल्या तारखेच्या १० (दहा) दिवसापावेतो भरणा केलेल्या भाडे रक्कमेच्या ५० टक्के रक्कम व संपुर्ण अनामत रक्कम तसेच ५ (पाच) दिवसापावेतो भरणा केलेल्या भाडे रक्कमेच्या २५ टक्के रक्कम व संपुर्ण अनामत रक्कमेचा परतावा देण्यात येईल. अर्जदाराने आरक्षण केलेल्या तारखेच्या ४ (चार) दिवस अगोदर आरक्षण रद्द करणेबाबत मागणी केल्यास अनामत व सेवाशुल्क व्यतिरिक्त कोणत्याही रक्कमेचा परतावा मिळणार नाही.

५) आरक्षण कालावधी संपल्यानंतर संबंधीतांना तात्काळ सदरची जागा रिकामी करुन दयावी लागेल तसे न केल्यास संपूर्ण अनामत रक्कम जप्त करुन संबंधीतांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

६) ज.श.म.न.पा.चे बालगंधर्व नाटयगृह, सागर पार्क मैदान येथील कार्यक्रम संपल्यावर अर्जदारास सदर जागेची साफसफाई करुन सदर जागा पुर्ववत करुन दयावी लागेल, अन्यथा त्या करीता येणारा खर्च अर्जदाराच्या अनामत रक्कमेतून वसुल केला जाईल.

७) सागर पार्क मैदान येथे डि.जे. वापरण्यास बंदी राहील, (क्रिकेट कॉमेंट्रीसाठी लाऊडस्पिकर, डि.जे.वापरता येणार नाही.) सदर अटीचे उल्लंघन केल्यास अनामत जप्त करण्यात येवून, कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.

८) प्रशासनाने सागर पार्क येथे स्वतंत्र साफसफाईसाठी कर्मचारी नियुक्त करावेत व त्यांचे मार्फत सागर पार्क येथिल नियमीत साफसफाईची कामे करुन घ्यावीत.

९) कार्यक्रमादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडल्यास किंवा त्यासंबंधी गुन्हा दाखल झाल्यास किंवा कोणतीही दंडात्मक कार्यवाही झाल्यास, त्याबाबत जळगांव महानगरपालिका कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

१०) कार्यक्रमादरम्यान मनपा जागेत लावण्यात येणाऱ्या आकाशचिन्हे, बॅनर, फलक यांची वेगळी परवानगी घेणे बंधनकारक राहील. तसेच तेथील पार्कींग बाबत व्यवस्था करणेची जबाबदारी अर्जदाराची राहील.

११) ज.श.म.न.पा.चे बालगंधर्व नाटयगृह हे दर वर्षी दि.०१ मार्च ते १५ मार्च या कालावधी करीता महिला दिनानिमित्त महानगरपालिकेकडून राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाकरीता आरक्षित करण्यात यावा. परंतु सदर कालावधीत इतर कार्यक्रमाकरीता नाटयगृहाची मागणी असल्यास त्याबाबतची परवानगी देण्याचा संपुर्ण अधिकार आयुक्त जळगांव शहर महानगरपालिका यांचा राहील.

महासभा ठराव क्र.७६३ दि.२४/०३/२०२२ नुसार जळगांव शहर महानगरपालिकेचे बालगंधर्व नाटयगृह, सागर पार्क मैदान हे अनामत घेऊन तात्पुरत्या स्वरुपात भाडयाने देणेबाबत नविन दराचे व विहीत अटी व शर्तीचे धोरण नमूद केलेले आहे त्याप्रमाणे अटी व शर्तीचे भाडेदरांची आकारणी करुन तात्पुरत्या स्वरुपात परवानगी देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच दि.०७/०६/२०२२ पासून उपरोक्त प्रस्तावीत धोरणाची अंमलबजावणी करणेस मंजूरी प्रदान करण्यात येत असून यापुर्वी बालगंधर्व नाटयगृह, सागरपार्क मैदान ज्यांनी आरक्षित केलेले आहेत, त्यांना नविन धोरणानुसार जागाभाडे व अनामत रकमेची आकारणी करुन, भाडे रक्कम व अनामत रक्कम भरणेबाबत पत्राव्दारे अवगत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६४**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ७**) विकास योजना जळगांव जि.जळगांव, जळगांव शहर महानगरपालिकेच्या मुळ हद्दीसह वाढिव हद्दीचा विकास आराखडा तयार करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये नगररचना अधिकारी (T.P.O) यांची नेमणूक करणे व मुळ व वाढीव हद्दीची एकत्रित सुधारीत विकास योजना तयार करण्यासाठी, विकास योजना विशेष घटक या कार्यालयाची स्थापना करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, विषयाच्या मंजुरीला काही हरकत नाही. सभागृहाच्या या विषयाच्या अनुषंगाने काही गोष्टी लक्षात आणुन द्यायचे आहे. सर्वप्रथम नगरसचिव साहेब, या विषयाच्या प्रस्तावाचा जो

विषय दिला गेलेला आहे. यामध्ये जे संदर्भ टाकलेले आहे. त्यामध्ये महासभा ठराव क्र.८४० दि.२०/०२/२०२१ असे नमुद केलेले आहे. दि.२०/०२/२०२१ झालेला नाही हा ठराव सन २०१८ ला झालेला आहे. या विभागाने याची नोंद घ्यायची आहे आणि अश्या चुका प्रशासकीय कामकाजात होणार नाही याची दक्षता घ्यायची आहे. विषय असा आहे आयुक्त महोदया, मुळात आपल्याकडे MRTPI च्या तरतुदींच पालन होत नाही. त्यामुळे दुर्देवाने काय होते की, यामुळे आरक्षण व्यपगत होतात. सभागृहाला ज्ञात आहे हे सगळ, मुळात १२७ नुसार जेव्हा खरेदी सुचना दिली जाते. दोन वर्षात जर आपण आरक्षण केले नाही संपादन केले नाही. जर संपादन प्रक्रिया झाली नाही दोन वर्षात तर ते आरक्षण ऑटोमेटीक पुर्णपणे रद्द होऊन जातो. अर्थातच याचा परिणाम काय होतो. आपल्याला आताचे आरक्षण जे भविष्याच्या दृष्टीने आवश्यक आहे ती संधी निघुन जाते. रहिवास क्षेत्र जळगांव शहराचा जर विचार केला. तर जळगांव शहराचा जवळपास सगळं रहिवास विकसीत झालेला आहे. मुळात जळगांव शहराचा अवलोकन जर केला तर ते २५% भाग हा MIDC कडे जातो. आणि ५०% भाग हा ना विकसीत क्षेत्र म्हणजे ग्रीन झोन मध्ये येतो. पर्यायाने काय होते की, ऐवढा मोठा जळगांव शहराचा ६८ स्के.कि.मिटरचे क्षेत्रफळ जे आपल्याला दिसतो. पण त्यापैकी फक्त २५% जागा विकासासाठी आपल्याला उपलब्ध असतो. त्यामध्ये पण १०% आरक्षण ही शासकीय जमिनी आहेत.म्हणजे पर्यायाने शेवटी काय झाले. १५% जागा विकासासाठी उपलब्ध होते. आणि याचा परिणाम काय होतो नितीनभाऊ की, जमिनचे जे भाव आपले वाढलेले आहे जळगांव शहराचे सामान्य माणसाच्या आवाऱ्याच्या बाहेर हे आता गेलेले आहे. या सगळयांच्या मागे ही वस्तुस्थिती आहे. व्यापक जनहित बघता खरं तर या प्रस्तावाला, २०१७ पासुन हा प्रस्ताव आलेला आहे. तेव्हापासुन या प्रस्तावाच्या मागे पाठपुरावा लोकप्रतिनिधी म्हणुन आम्ही सगळेच करत आहोत. पण परिस्थिती आजही जैसे थे तीच आहे. जे १९९३ ला मंजुरी झालेली आहे. त्यानंतर २०१८ मध्ये आपला हा प्रस्ताव सुध्दा मंजुर झालेला होता. महासभेचा. याला इतक वर्ष झालेवर सुध्दा काय झालेले आहे. परिस्थिती मध्ये कोणताही बदल झालेला नाही. नगररचना विभागाला मला हे विचाराचे आहे आणि मा.आयुक्त महोदयांचे लक्ष वेधुन घ्यायचे आहे. यासाठीचा आता टाईम बाऊंड कार्यक्रम, आता आम्ही महासभा म्हणुन मागतो आहे. कारण परिस्थिती मध्ये बदलच होत नाही. आणि या सगळयाला सफर सामान्य माणसाला जावे लागतात. या गोष्टी सामान्य माणसाला न कळणारी आहेत. पण शेवटी भोगावे त्यांनाच लागणार आहे. तर त्याच्यासाठी टाईम बाऊंड कार्यक्रम सांगावा प्रशासनाने.आणि सगळं केव्हापर्यंत नगररचना विभाग करणार. १९९३ पासुन ती मंजुर झालेली आहे आणि इतके वर्ष झाले अजुन ही परिस्थिती जशीच्या तशी आहे.

**मा.आयुक्त :-** सभागृहाला याची प्रोसिजर सांगावे.

**श्री.अशोक करवंदे, सहा.नगररचनाकार :-** मुळ हद्दीची विकास योजना जी आहे त्याचा मॅक्जीमम पिरियेड जो आहे. तो ३० वर्षाचा आहे. जळगांव मुळ हद्दीची विकास योजना ज्या दिवसाने मंजुर झालेली आहे. वाढीव हद्दीची विकास योजना सन २००२ मध्ये झालेली आहे. वगळलेले भागाची विकास योजना २००४ साली मंजुर झालेली आहे. आता शासनाचे धोरण असे आहे. विकास योजना सुरु करत असतांना मुळ हद्दीची वेगळी करा, वाढीव हद्दीची वेगळी करा, एक्सट्रनल ऐरियाची वेगळी करा. असा कायदा नाही. जेव्हा मुळ हद्द, वाढीव हद्द आणि एक्सट्रनल ऐरिया एकत्र करा असे कायद्यात आहे. त्यानुसार जळगांव महानगरपालिकेने यापुर्वी २३ सेक्टर, क्युबीक ३८ सेक्टर सिटीला लावत असतो. आणि ती पण जी आहे. जी योजना नव्या कायद्याने लागु होते.तर असा ठराव केलेला आहे आपण. तर त्या ठरावामध्ये असा प्रस्ताव आहे. जो मुळ ठराव होता हद्दी विकसीत करण्याचा त्याच्यामध्ये क्षेत्राची चुक झाली होती. ती क्षेत्राची चुक या ठरावामध्ये दुरुस्त करायची आहे आणि त्याच्या जागी TPO म्हणुन सहा.संचालक, नगररचना, जळगांव ब्रांच, जळगांव शाखा यांना आपण TPO म्हणुन नेमणुक करण्याचा प्रस्ताव मा.संचालक, नगररचना श्री.राजीव पवारजी यांना दिला होता. परंतु सहा.संचालक, नगररचना यांनी त्यांच्याकडे असलेल्या कार्यभाराचा विचार करता, सदरचे काम करणेस असमर्थता दर्शविलेली आहे. आणि ते रेकॉर्डवरती आलेली आहे. तर या संदर्भात मा.सहा.संचालक, नगररचना यांनी विशेष घटकाची स्थापना करावी. आणि त्याची मागणी शासनाकडे करावी. असे सुचविलेले आहे. साधारणता महानगरपालिकेमध्ये असलेला तांत्रिक कर्मचारी वर्ग सद्या आणि त्यावर नगररचनात इतक्या कमी कर्मचाऱ्यांवर ह्या डिपार्टमेंटला काम करणे शक्य नाही. स्टीन वर्क करुन विकास योजनेचे काम करणे शक्य नाही. हे पुर्णपणे जिगरीचे काम असते. फार मायक्रो लेव्हलला जावे लागतात. त्यामुळे ही विकास योजना स्थापित करायला आपल्याला TPO ची नेमणुक विकास योजना घटक झाल्यानंतर आपण मा.आयुक्त यांचे मान्यतेने शासनास सादर करणार आहोत. आता काही प्लॉटचा विषय मॅडमांनी जो मुद्दा उपस्थीत केला. तर २३ अट सेक्शन ३८ याचा इरादा जाहिर

झाल्यानंतर पुढील दोन वर्षांमध्ये त्याचा सर्व्हीस सेंटर साठी जी.पी. परमिट व्हायला पाहिजे. आता हे पहा मिटींगमध्ये पाहिले की, त्यांनतर जो पिरीयेड आहे तो शासनाने ज्या ज्या वस्तीला टाईम बँण्ड दिलेला आहे. तो टाईम बँण्ड कोरोना काळ सोडुन म्हणजे हे दोन वर्ष आणि शासनाला जर वाटले की, २ वर्ष मुदतवाढ द्यावी म्हणजे साधारणता ४ वर्षाचा तो पिरीयेड आहे. त्या ४ वर्षामधुन हे २ वर्ष कोविडचा जो पिरीयेड आहे तो धरुन विशेष घटक स्थापन झाल्यानंतर ते एक्सपर्टाईजकडे जाणार आहे आणि ते विशेष घटक जे आहे ते रिपोर्ट आयोगाच्या अखत्यारीतला विषय आहे. जनरली नगरविकास विभाग कॉरपोरेशन हद्दीतली विकास योजना तयार करण्यासाठी रिपयुटेड कार्यालयाच्या हेड खालीच रिपोर्ट देतो. आणि हे रिपोर्ट आले तर हे काम होईल. हा आता २६ ला कार्यक्रम आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आदरणीय आयुक्त महोदया, तुमच्या लक्षात आणुन देऊ ईच्छिते मी, नगररचना कार्यालयामध्ये तुम्हाला सगळयांना माहित आहे की, तेथे खुप स्पर्धा असते. नितीनभाऊ नगररचनेमध्ये आमची वर्दी लावा यासाठी आपल्या सगळयांकडेच अभियंते फिरत असतात. खरंतर खुप महत्वाचा विभाग आहे हा. सगळे अभियंते शिफारशी आणतात. पण ज्या पध्दतीचे काम तेथे होणे अपेक्षित असते ते. होते का? शहराच्या विकासाकडे किंवा महापालिकेचे हित म्हणुन कोणते कार्यक्रम तेथे केला जातात. या विषयाबद्दल बोलायचे म्हटले तर माझ्या आठवणी प्रमाणे जेव्हा मी स्टॅण्डींग कमिटी चेअरमन होती. त्यावेळेला याचा मुदतवाढीचा प्रस्ताव आला होता. नितीनभाऊ तुम्हाला आठवत असेल. तेव्हा याला मुदतवाढ दिली होती स्टॅण्डींगला. आता मला असे वाटते आयुक्त महोदया, त्या मुदतवाढची ही मुदतवाढ आता संपलेली असेल किंवा संपायला आली असेल.म्हणजे सुनिलभाऊ येत्या एक दोन महासभामध्ये त्याच्या मुदतवाढीचा प्रस्ताव प्रशासन आपल्यासमोर आणेल.म्हणजे कोणत्या गतीने हे कामकाज चाललेले आहे की, जे शहराच्या विकासासाठी सगळयात महत्वाचा आहे. त्यामुळे नितीनभाऊ मी येथे अशी एक मागणी करु ईच्छिते,

**श्री.सुनिल महाजन :-** धुळयाचे होऊन गेले ना आपल्या बरोबरीचे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** हो झाले ना, म्हणजे आपल्या मागुन येणारी शहर आपल्या पुढे निघत आहे. आणि आपण तिथेच थांबलेलो आहोत.आणि हे असच चाललेले आहे. माझी मागणी आहे सुनिलभाऊ, नितीनभाऊ, ज्या नगरसेवकांना या विषयामध्ये रस आहे ज्ञान आहे. यांची एक समिती नेमा या विषयावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि या विषयाचा पाठपुरावा करण्यासाठी, त्या समितीत मला घ्या असे आग्रह नाही. मला अजिबात घेऊ नका. इतर ज्यांना याच्यातला ज्ञान आहे.त्या नगरसेवकांची समिती नेमा. मात्र समिती नेमा अशी माझी आग्रहाची मागणी आहे महापौर महोदया, त्या शिवाय प्रशासन हलणार नाही. आपण सगळे बघतो येथे तारखा आलेल्या आहे १९९३ पासुनची ही योजना आहे. सगळे कार्यक्रम दिसत आहे. आता सुध्दा आपल्याला ४ वर्ष झाले. टाईमबाऊंड कार्यक्रम मांडल्यानंतर सुध्दा ४ वर्ष सांगितलेले आहे. हे ४ वर्षाचे सुध्दा ४० होऊन जातील. पण जर आपला अंकुश नसला तर काहीच होणार नाही नितीनभाऊ. आपला अंकुश असला पाहिजे. त्याकरीता त्याच्यावर एक समिती नेमा. ही माझी आग्रही मागणी आहे महापौर महोदया, आजच्या या विषयाला कोणतीही हरकत नाही. पण या विषयाचा ज्ञान ज्या नगरसेवकांना आहे. ज्यांना या विषयात काम करण्याची ईच्छा आहे. अशी नगरसेवकांची एक समिती याचा पाठपुरावा घेण्याकामी नेमा अशी माझी आग्रहाची मागणी आहे. त्यावेळेला आपणच सभागृहात चर्चा केलेली होती. आणि आठ लेयर मध्ये आपण सर्व्हेक्षण करावे असे आपण सांगितले होते. या विषयाचा ज्ञान आहे. या सगळया नोंदी आल्या पाहिजे.त्या नोंदी कधी घेतल्या आहेत का ? हे तपासण्यासाठी आपली यंत्रणा कार्यान्वीत नाही. महापालिकेमध्ये कोण घेतो याचा फॉलोअप, प्रशासनाकडे याच्या बद्दलच्या कोणत्याच नोंदी नाही. कोणत्याच पध्दतीचा पाठपुरावा होत नाही. आणि म्हणुन माझी अग्रहाची मागणी आहे की, येथे आता लोकप्रतिनिधींचा अंकुश असणे आवश्यक आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्या पध्दतीने प्रत्येक पक्षाचे एका सदस्याचे नांव त्यांच्याकडुन मागुन घेण्यात यावे. आणि त्या पध्दतीने एक समिती या कामकाजाचा पाठपुरावा करणे संदर्भात या कामकाजावर नियंत्रण ठेवण्याच्या संदर्भात ज्या ज्या मार्गदर्शन सुचना त्यांना करावयाचे वाटतील. असे सुचना ती समिती करत राहीन.आणि त्याचा जे काही अवलोकन समिती करेल. ते महासभेच्या निदर्शनात आणत राहिल ती समिती. प्रस्ताव जो आहे आज प्रशासनाचा तो जसाचा तसा मान्य करण्यात यावा. मुळ प्रशासनाच्या प्रस्तावाला कुठलीच अडचण येता कामा नये.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** दोन तीन महत्वाची आहे. ते अजुन तपासलेल्या नाही. ही वस्तुस्थिती आहे आणि आपल्याला हा अंकुश ठेवणे खुप आवश्यक आहे.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य श्री.नितीनभाऊ यांनी प्रशासनाला दिलल्या सुचनेनुसार सर्व पक्षाचे एक एक सदस्य निवडुन एक समिती गठन या संदर्भात करण्यात यावी आणि हा प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात यावा.

**नगरसचिव :-** समितीच नाव निश्चित करुन घ्या.

**मा.महापौर :-** नाही ते तर नंतर करु ना. या संदर्भात सर्व पक्षांचे गटनेत्यांना बोलवुन मिटींग घेवुन ज्या सन्मा.सदस्यांना या ठिकाणी काम करण्याची ईच्छा असेल त्यांचे नावे सन्मा.गटनेते देतील. त्यानंतर ती समिती गठीत करण्यात येईल. प्रशासनाचा हा विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८४६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रात मुळ हद्द व वाढिव हद्द अशा दोन विकास योजना अंमलात आहेत. जळगांव शहर महानगरपालिकेच्या मुळ हद्दीची विकास योजना (सुधारीत) टि.पी.एस.३५८८/१९४/सी.आर.-९७/युडी-९ दिनांक ०६/०१/१९९३ अन्वये मंजुर झालेली असून दि.१५/०२/१९९३ पासून अंमलात आलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ नुसार विकास योजना अंमलात येऊन २० वर्षाचा कालावधी झाला असल्यामुळे सदर विकास योजना सुधारीत करणे आवश्यक आहे. तसेच महानगरपालिकेच्या वाढिव हद्दीची विकास योजना (वाढिव क्षेत्र) टि.पी.एस.३५९९/७३८/सी.आर.१४२(अ)/ युडी-९ अन्वये दिनांक ११/०२/२००२ रोजी मंजूर झालेली असून दि.०७/०४/२००२ पासून अंमलात आलेली आहे.

शासनाचे नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.टिपीएस-१८१८/१६४७/प्र.क्र.२५२/१८/नवि-१३, दि.१५/१०/२०१८ अन्वये संपुर्ण क्षेत्राचा विचार होऊन दोन्ही भागांच्या विकास योजना सुधारीत करण्याची प्रक्रिया एकत्रित हाती घेण्यात यावी असा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६ चे कलम १५४ अन्वये निर्देश दिलेले आहेत.

जळगांव शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात मुळ हद्द व वाढिव हद्द अशा दोन भागात विकास योजना मंजूर असल्याने, जळगांव शहर महानगरपालिका महासभा क्र.५४, विषय क्रं.०२ नुसार ठराव क्र.८४० दि.२०/०२/२०१८ प्रमाणे मुळ हद्दीसह वाढिव हद्द क्षेत्राचा एकत्रित विकास आराखडा तयार करण्यासाठी ठराव पारित करण्यात आलेला आहे. उक्त ठरावानुसार जळगांव शहर महानगरपालिकेच्या मुळ हद्दीसहच्या वाढिव हद्दीचा एकत्रित विकास आराखडा तयार करण्याकामी खाजगी कंत्राटदाराव्दारे दि.२५/०१/२०१९ रोजीच्या शासन निर्णय क्र.टिपीएस-१८१८/१४८९/ प्र.क्र.३०३/१८/नवि-१३ व शासन निर्णय क्र.टिपीएस-१८१८/१४८९/ प्र.क्र.३०३/१८/ नवि-१३ दि.१७/०६/२०१९ रोजीच्या शुध्दीपत्रकातील निर्देशानुसार म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम २५ अन्वये तसेच विदयमान जमीन वापर नकाशा तयार करणे या कामाचे आदेश महानगरपालिकेव्दारे देण्यात आलेले आहे.

महासभा ठराव क्र.८४० दि.२०/०२/२०१८ पारीत करण्यात आलेला आहे. उक्त ठरावाच्या अनुषंगाने मा.सहसंचालक, नगररचना, नाशिक विभाग नाशिक यांना उद्देशित केलेले कार्यालयाकडील पत्र जा.क्र./नर/१३८५,दि.२२/०३/२०२१ नुसार मा.सहाय्यक संचालक नगररचना जळगांव शाखा कार्यालय जळगांव यांची नगररचना अधिकारी नियुक्तीस मान्यता देणेबाबत प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. तथापि मा.सहसंचालक नाशिक विभाग नाशिक यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र.निवी/वि.यो.जळगांव/११७८, दि.२८/१०/२०२१ चे पत्रामध्ये नमुद केलेनूसार जळगांव शाखा कार्यालया मार्फतच्या शेंदुर्णी,मुक्ताई नगर, अमळनेर, एरंडोल, फैजपुर, बोदवड या विकास योजनांची कामे प्रगतीपथावर सुरु असुन विकास योजना रावेर (वा.ह.),सावदा (मुळ + वा.ह.) व नशिराबाद या नवनिर्वाचीत नगरपंचायतीची विकास योजना तयार करण्याचे काम सुध्दा तात्काळ हाती घेणे आवश्यक आहे. त्यामुळे जळगांव शहराची विकास योजना तयार करण्याच्या कामाकरीता, उपसंचालक,नगररचना,विकास योजना विशेष घटक या कार्यालयाची स्थापना करणे उचित होईल असे सहाय्यक, संचालक,नगररचना शाखा कार्यालय जळगांव यांनी त्यांचे दि.२४/०९/२०२१ अन्वये मा.सहसंचालक, नगररचना, नाशिक यांना कळविलेले असुन

त्याप्रमाणे मा.सहसंचालक यांनी त्यांचेकडील पत्र नावि/वि.यो/जळगांव/११७८ दि.२८/१०/२०२१ अन्वये उपसंचालक, नगर रचना विकास योजना विशेष घटक या कार्यालयाची स्थापना करणे उचित होईल असे कळविलेले आहे. तसेच सदर पत्रातील मुद्दा क्र.०१ मध्ये ठराव क्र.८४० दि.२०/०२/२०१८ मधील म.न.पा.हद्दीच्या एकुण क्षेत्राच्या तफावती बाबत कळविलेले आहे.

महासभा ठराव क्र.८४० दि.२०/०२/२०१८ मध्ये महानगरपालिकेचे एकुण क्षेत्रफळ ६४.०० चौ.की.मी (६४० हेक्टर) असे नमूद आहे. तथापि वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजना अहवालानुसार जळगांव शहर महानगरपालिकेच्या एकुण क्षेत्रफळ ६८२४.२७ हेक्टर दर्शविलेले आहे. यापैकी मुळ हद्दीचे क्षेत्र ११४५.४२ व वाढीव हद्दीचे क्षेत्र ५६७८.८५ असे आहे. त्यामुळे क्षेत्र तफावती बाबत दुरुस्ती होणे आवश्यक आहे.

तसेच मा.सहसंचालक,नगररचना नाशिक विभाग नाशिक यांनी त्यांचे दि.२८/१०/२०२१ अन्वये कळविल्यानुसार सहाय्यक संचालक, शाखा कार्यालय जळगांव यांच्याकडे असलेला कार्यव्याप लक्षात घेता ते जळगांव शहराच्या मुळ व वाढीव हद्दीच्या एकत्रीत सुधारीत विकास योजनेसाठी नगररचना अधिकारी (TPO) म्हणून काम करणे शक्य नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे सदर विकास योजना तयार करणेसाठी मा.सहसंचालक नगररचना नाशिक विभाग नाशिक यांनी सुचविल्यानुसार,मा.उपसंचालक / नगर रचनाकार नगररचना, विकास योजना, विशेष घटकाची स्थापना करणे व त्यासाठी शासनाकडे या विशेष घटक कार्यालयाच्या मागणीचा प्रस्ताव पाठविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच सदरचे विशेष घटकासाठी येणाऱ्या खर्चास सुध्दा मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

शासनाने सदरचे विशेष घटक मंजूर केल्यानंतर त्याप्रमाणे नगररचना अधिकारी (T.P.O.) ची नेमणूक करणेबाबत आयुक्त,जळगांव शहर महानगरपालिका यांनी आपल्या स्तरावर निर्णय घ्यावा.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनूसार विकास योजना तयार करतांना त्यावर नियंत्रण ठेवणेसाठी/ पाठपुराव्यासाठी एक सर्व पक्षीय समिती गठीत करणेस सुध्दा मान्यता प्रदान करण्यात येत आहे. याबाबत सहा.संचालक, नगररचना विभाग यांनी वेळोवेळी समितीची बैठक आयोजित करुन समिती समोर अदयावत माहीती सादर करावी व त्यानुसार माहीती महासभेला अवगत करण्याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६४**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ८**) जळगांव शहर महानगरपालिका हद्दितील जमिनी वरील मालमत्ताकर (खुला भुखंड) आकारणी दर ठरविणे बाबत चार सदस्यीय गठीत समितीने सादर केलेला अहवाल स्विकारुन त्यानूसार खुला भुखंड कराची आकारणी करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्यामध्ये जो वाढीचा भाग जास्तीचा वाटत होता आणि त्याच्यामध्ये वाढलेले जमीनीचे भाव याच्यात आपण पाहीले तर या दृष्टीकोनातुन त्याच्यावर फेरविचार करणे गरजेच होत आणि त्याच्यानंतर त्या अनुषंगाने प्रशासनाला विनंती केल्यानंतर यासाठी चार जणांची एक समिती गठीत करून जो हा प्रस्ताव दिलेला आहे की पुर्वी आपण रेडीरेकनरच्या २ टक्के प्रमाणे खुल्या भुखंड कराची आकारणी करत होतो आणि त्याच्यामध्ये आपण १ रू स्के. मिटर प्रमाणे जरी आपण म्हंटले तरी त्याच्यामध्ये जी रेग्युलर डिडक्शन जे देतो १० टक्क्यांचे ती वजा जाता पॉईट ९० परसेंन्ट सामान्य नागरीकांना हा कर लागु होईल. म्हणजे साधारणत: जवळपास आपण निर्णय घेण्यासाठी प्रशासनाने दर जे दिलेले आहेत ते मला वाटत की जळगांव शहरातील नागरीकांनी या खुला भुखंड कराच्या बाबतीत प्रशासनाने थोडासा विचार करून कारण काय आहे की ज्यांच्या आकारण्या अजुनपर्यंत झालेल्या नसतील. त्यांनी इतक्या लवकर आकारणी करून घेतली आपल्याकडुन खुला भुखंड कराचा त्यांना तितका फायदा आहे कारण की आकारणी ज्या वर्षी येते त्या वर्षाच रेडीरेकनर गृहीत

धरल जाईल. म्हणुन सामान्य नागरीकांना याबाबतीत आपण सुध्दा सुचना करण्याची याच्यामध्ये प्रशासनाने तसदी घ्यावी की जेणेकरून या खुला भुखंडाच्या बाबतीत ज्या भुखंडावर कुठल्याही प्रकारची आकारणी झाली नसेल तर त्यांनी महानगरपालिकेकडे येवुन स्वत: आपल्या खुला भुखंडाची आकारणी करून घ्यायला पाहीजे.

**ॲड. शुचिता हाडा :-** प्रशासनाने हा जो विषय मांडला आहे महासभे समोर जो आपण वारंवार पाठपुरावा करत होतो. आयुक्त महोदय आपल्याला एक सांगायच आहे की खुला भुखंड हा कर वेगळा नाहीये खर तर मालमत्ता करासोबतच संलग्न केला असता तर कदाचित बर झाल असत हा पुढचा विचार केला आता माझी उपायुक्त साहेबांशी मागे एकदा चर्चा झाली होती. तर त्यावेळी त्यांनी सांगीतले की ते आता या विषयाचा अभ्यास करताहेत. तर आता अस लक्षात येत आहे की हे सगळे डिमांड अद्यावत नाही आहेत. कारण प्रत्यक्षात आपले कर्मचारी हा खुला भुखंड कुठे आहे हे सुध्दा सांगु शकत नाहीये. म्हणजे हा सगळा जो सावळा गोंधळ होत आहे. आपल्याला कुठे तरी मिटवावा लागणार आहे. अनेक खुला भुखंडाचा कन्स्ट्रक्शन मध्ये म्हणजे खुला भुखंडांचे रूपांतरण बांधकामात झालेले आहे परंतु आपल्याकडे त्यांची नोंदच नाहीये आणि या नोंदी नसल्यामुळे काय होत की ती या विभागाकडेपण दिसते आणि तिकडे पण दिसते मग होत काय की आकडेवारी दिसते. परंतू वसुली काहीच होत नाही. आता प्रशासनाने जो प्रस्ताव आणलेला आहे चांगला प्रस्ताव आहे. तर महापौरताई आणि आयुक्त महोदया मला एक अशी विनंती करावीशी वाटते की आपण जळगांव शहराची जी परिस्थिती आपण बघतोय की शहराच्या विविध भागात विकास काम झालेली आहेत. नितीनभाऊ आपण सुध्दा याच्यानुसार बोलणार आहोत पण माझी एक अशी मागणी आहे की शहराचा खुप मोठ्या प्रमाणात विकास होत आहे. पण काही भाग असा आहे की तो विकसित झालेला नाहीये म्हणजेच रस्ते,नाली, गटारी , लाईट यादृष्टीने जिथे आपण कोणतेच विकास काम करीत नाही कारण की आपण कोणत्याच सुखसोई सुविधा देत नाहीत. म्हणजे स्थानिक नागरीकांना महानगरपालिका , स्थानिक स्वराज्य संस्था म्हणुन आपली जी जबाबदारी आहे त्या बेसिक जबाबदाऱ्या आपण पार पाडलेल्या नाहीत. तर अशा भागांसाठी आपण ५० टक्के सुट द्यावी. जोपर्यंत विकास काम होत नाहीत. म्हणजे नागरीकांचा जो रोष आहे तो रोष आपल्याला कमी करता येवु शकतो. निदान ज्या भागामध्ये विकास कामे झालेली नाहीत त्या भागांमध्ये खुला भुखंडांसाठी आपण ५० टक्के सुट द्यावी त्या भागांमध्ये अशी माझी ही आग्रही मागणी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई कस आहे की तुम्ही पहिला मुद्दा मांडला की मला वाटत नाही की आयुष्य भर त्यांना ५० टक्क्यांमध्येच जाव लागेल सामान्य नागरीकांना.

**ॲड . शुचिता हाडा :-** भाऊ मी काय म्हणतेय की तो भाग विकसित झाल्यानंतर आपली जी मागणी आहे ती रेग्युलर सुरू आहे ना

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई कस आहे की आता बघा की घरपट्टीचे रिव्हिजन झाल्यामुळे घरपट्टीच्या उत्पन्नातही चांगल्या प्रकारे वाढ होतेय. शासनाचा निधी मा.पालकमंत्री. गुलाबभाऊ असतांना त्यांनी या शहरासाठी भरभरून निधी दिलाय. योगायोगाने आता जे सरकार आहे याच्यामध्ये जे मुख्यमंत्री महोदय असतील, गुलाबभाऊ मंत्री महोदय असतील . शिंदे साहेबांनी या महानगरपालिकेला निधी देण्याच्या संदर्भात सुध्दा त्यांच उदार मत होत. तर मला वाटत की आपण कर कमी करण्याच्या भानडीत न पडता, निधी राज्य शासनाकडुन जास्तीत जास्त कसा मिळवता येईल आणि तो लवकरात लवकर जास्तीत जास्त कशा पध्दतीने खर्च करता येईल त्याच्यावर जर फोकस केला ना तर योग्य होईल.

**ॲड . शुचिता हाडा :-** भाऊ शेवटी काय आहे की,

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई काय होत आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** भाऊ आपण जे म्हणताहेत त्याला काही हरकत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य आहे ना ताई तुमची जी सुचना आहे ती अत्यंत योग्य आहे त्या बद्दल वाद नाहीये. परंतू व्यावहारीक दृष्टया त्या सुचनांच पालन करण महानगरपालिकेच्या आर्थिक रित्या हे पाहाता अवगळता येते आणि मग काय होत काहीवेळेला कालांतराने चुकीचे पायंडे पडत जातात आणि मग अशा एखाद्या विकसित भागातील सुध्दा एखादा व्यक्ती म्हणेल की बघा आमच्याकडे रस्ते नाहीयेत, गटार नाहीये तर आम्हालाही ती करावरची सवलत द्या. तर मला वाटत आपण त्या गोष्टीचा विचार न करता आपण विकासाचे नियोजन जर योग्य पध्दतीने केले तर मी म्हणतो की आपण लवकरच या परिस्थितीमधुन बाहेर पडण्याच्या संदर्भात विचार करू शकतो.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** माझी अजुन एक महत्वाची मागणी आहे नितीनभाऊ या विषयाबद्दल आपण एका एजन्सीला काम देवुन सगळ सर्वेक्षण केले आणि आपण सगळयांना ज्ञात आहे की, त्यांनी आपल्याला उत्पन्नामध्ये अगदी लक्षणीय वाढ आपण साद्य केलेली आहे. तर आता खुल्या भुखंडाच्या सर्वेक्षणाचे सुध्दा काम आपण ताबडतोब द्यायला हवे. ते सुध्दा या ठरावात नमुद करायला हवे. ते काम नविन निविदा प्रक्रिया राबवा. यालाच कन्टीनिव्हेशन द्या. प्रशासनाने, सभागृहाने ठरवा. तो सभागृहाचा अधिकार आहे. पण सर्वेक्षणाच काम आपण इमिजिएट द्यायला हवे. ते आवश्यक आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सर्वेक्षणाच्या बाबतीत काय होतं ताई की, त्याच रेकॉर्ड

**श्री.प्रशांत पाटील, उपायुक्त :-** आपले जे कर्मचारी आहेत ते अपडेट करणार आहेत.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** पाटील साहेब आता आपण जर म्हणायच झाल की हे एक काम आपण एका एजन्सीला काम द्या म्हणजे याच्यामुळे काय होईल की हे सगळ रेकॉर्डवर व्यवस्थितरित्या येवु शकेल.

**श्री.प्रशांत पाटील, उपायुक्त :-** मा.महापौर , ताई याच ऑलरेडी आपण सर्वेक्षण केलेलच आहे. त्याच मोजमाप आपण केलेल आहे. त्यांची संख्या आपण घेतलेली आहे. पुन्हा आपण साधारणता आता पुढच्या महिन्यापासुन ते फिल्डवर जातील त्याच पुन्हा सर्वेक्षण करतील की त्या जागेवर बांधकाम झालेले आहे की तो खुला भुखंड आहे आणि त्याच्या नोंदी घेतील आणि त्यानुसार ज्या मिळकती आहेत की ज्यांच्यावर आपण खुला भुखंडही आकारत आहोत आणि घरपट्टी पण आकारत आहोत. अशा आकारण्या आपण दुरूस्त करू. त्यात आपल्याला एजन्सी लावायची आवश्यकता नाहीये. आपण आपल्या कर्मचाऱ्यांकडुन काम करून घेवु.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आपल्या कर्मचाऱ्यांचे कार्य बघता, बुध्दीमत्ता आणि कार्यक्षमता बघता हे काम लवकर होईल का अशी मला शंका आहे या सभागृहात सगळयांना मान्य असेल की हि शंका रास्त आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** साहेब याच्यात फक्त एक काम करा जस शुचितताई म्हणताहेत तसा सर्वे करा आणि सगळे लेऑऊट व सगळे उतारे आता ऑनलाईन मिळतात ते आणा आपला जो सर्वे झालेला आहे ते टॅली करून घ्या म्हणजे सर्वे केला आहे तर त्याच्यामधुन काही सुटणार नाही आणि त्याच्यामधुन सगळ वर येईल की त्याची आकारणी झाली की नाही झाली ज्याची नाही झाली ती करा. कारण ऑलरेडी जुने गांव तर पुर्ण डेव्हलप होवुन गेलेले आहे आणि जे नविन बांधकाम परवानगी साठी जे येतात तर ते ऑलरेडी आपण खुला भुखंड भरल्याशिवाय आपण देत नाही. त्याच्यावर मालकाच नांव येवुनच जात त्याच्यावर

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आपल्याकडील मनुष्यबळाचा विचार करता . आता आपण म्हणतो की मनुष्यबळ नाही किंवा होवु शकले नाही प्रयत्न चाललेले आहेत. तर आपल्याला कराव लागणार आहे. तर हे काम करायला काही हरकत नाही.

**मा.महापौर :-** प्रशासनाने दिलेला प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८४७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दितील जमिनीवरिल मालमत्ताकराची (खुला भुखंड कराची) आकारणी ही सध्या शिघ्र सिध्द गणकाचा आधार घेऊन खुला भुखंडाचे मुल्य निश्चित करण्यात येते व त्याच्या २% इतके करयोग्यमुल्य निश्चित करुन त्यावर प्रतीवर्ष साधारणत: ३८% प्रमाणे कर आकारणी केली जाते. सदर आकारणी खुपच जास्त असल्याच्या नागरीक व लोकप्रतीनिधींकडून तक्रारी येत असतात. या बाबतीत मा.महापौर व प्रमुख पदाधिकारी यांचे उपस्थितीत दि.२०/०५/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत याबाबतीत सविस्तर प्रस्ताव महासभेसमोर सादर करण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या. तसेच काही मिळकतीधारकांनी खुला भुखंड कराच्या आकारणी विरोधात वेळोवेळी मे.न्यायालयात दावे दाखल केलेले आहेत. त्यामुळे सदर बाबतीत उपायुक्त (महसुल) यांचेशी झालेल्या चर्चेनुसार जमिनीवरील मालमत्ताकराची आकारणी करतांना उपयोगांत आणण्याची कार्यवाही ठरविण्याचे धोरण व आकारणी दर ठरविण्यासाठी चार सदस्यीस समिती आयुक्त यांचेकडील आदेश जा.क्र./प्र.स.क्र.०१ ते ०४/७२/२०२२-२३ दि.२२/०६/२०२२ अन्वये गठीत करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने सदर समितीने दि.२४/०६/२०२२ रोजी खालील प्रमाणे सादर केलेला अहवाल स्विकृत करण्यात येत असून सदर अहवालात नमूद केलेनूसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

चार सदस्यीय समिती सादर केलेला अहवाल खालील प्रमाणे,

जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील जमिनीवरिल मालमत्ताकराची (खुला भुखंड कराची) आकारणी ही सध्या शिघ्र सिध्द गणकाचा आधार घेऊन खुला भुखंडाचे मुल्य निश्चित करण्यात येते व त्याच्या २% इतके करयोग्यमुल्य निश्चित करुन त्यावर प्रतीवर्ष साधारणत: ३८% प्रमाणे कर आकारणी केली जाते. सदर आकारणी खुपच जास्त असल्याच्या नागरीक व लोकप्रतीनिधींकडून तक्रारी येत असतात. या बाबतीत मा.महापौर व प्रमुख पदाधिकारी यांचे उपस्थितीत दि.२०/०५/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत याबाबतीत सविस्तर प्रस्ताव महासभेसमोर सादर करण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या. तसेच काही मिळकतीधारकांनी खुला भुखंड कराच्या आकारणी विरोधात वेळोवेळी मे.न्यायालयात दावे दाखल केलेले आहेत. त्यामुळे सदर बाबतीत जमिनीवरिल मालमत्ताकर आकारण्याची पध्दत निश्चीत करणेसाठी धोरण ठरविणे आवश्यक असल्याने आयुक्त, यांचेकडील आदेश जा.क्र./प्र.स.क्र.०१ ते ०४/७२/२०२२-२३ दि.२२/०६/२०२२ अन्वये स्थापन केलेली चार सदस्यीस समिती खालील प्रमाणे आपला अहवाल सादर करीत आहे.

समितीने धोरण निश्चित करतांना औरंगाबाद, धुळे, पिंपरी-चिंचवड, पनवेल इ. महानगरपालिकांच्या जमिनीवरील मालमत्ताकर (खुला भुखंड कर) आकारणीच्या पध्दती विचारांत घेतलेल्या आहेत.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायत व औदयोगीक नागरी अधिनियम,१९६५ चे कलम १०१ (१) (अ) व कलम ११४ अन्वये खुल्या जमिनीवर मालमत्ताकराची आकारणी करणे बाबत तरतुद विचारांत घेऊन तत्कालीन नगरपालिकेने ठराव क्र.२९० दि.०२/०१/१९९६ अन्वये दि.०१/०४/१९९६ पासुन खुल्या जमिनीवर मालमत्ताकराची आकारणी करण्याची मान्यता प्रदान करण्यात आलेली होती. तत्कालीन नगरपालिका सभेने प्रती चौ.मी.रु.१/- प्रमाणे खुला भुखंड कराची आकारणी करणेस नमुद ठरावान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने अंमलबजावणी करण्यात येत होती.

तद्नंतर नगरपालिका ठराव क्र.२२४ दि.१९/०९/१९९८ पासून खुला भुखंड कराचा दर रु.१/- प्रती चौ.मी. ऐवजी रु.२/- प्रती चौ.मी. याप्रमाणे आकारणी करणेस मान्यता प्रदान करण्यात आलेली होती. उक्त ठरावाप्रमाणे व वेळोवेळी पारीत केलेल्या ठराव धोरणानुसार नगरपालिका खुल्या जमीनीवर मालमत्ता कराची अंमलबजावणी करीत असतांना श्री.विजय रामचंद्र काबरा यांनी नगरपालिका करीत असलेल्या खुली जमीन मालमत्ताकराची आकारणी ही अधिनियमातील तरतूदीस अनुसरुन नाही. अधिनियमांत दर्शविलेल्या तरतूदीनूसार नगरपालिकेने पूर्ण कार्यपध्दती अवलंबलेली नाही. अशा कारणास्तव कराची आकारणी रद्द करणेबाबत महाराष्ट्र नगरपरीषदा, नगरपंचायती व औदयोगीक नागरी अधिनियम १९६५ चे कलम ३०८ अन्वये जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडे दि.२३/०६/२००० रोजी तक्रार अर्ज दाखल केला होता. सदर अर्जावर रितसर सुनावणी होऊन जिल्हाधिकारी जळगांव यांनी खुली जमीन मालमत्ताकर आकारणी व मागणीसाठी अधिनियमातील कलम ११२ ते ११४ आणि कलम १५१ च्या तरतूदीप्रमाणे उचित मालमत्ता कराची आकारणी करावी, असे दि.२०/११/२००० रोजी आदेश दिलेला होता. सदर आदेशाविरुध्द श्री.विजय रामचंद्र काबरा व श्री.अशोक केदारनाथ मुंदडा रा.जळगांव यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ,औरंगाबाद येथे दि.०८/०३/२००१ रोजी याचिका क्र.१४३७/२००१ दाखल केली होती. सदर याचिकेवर सुनावणी होऊन दि.०१/०८/२००२ रोजी याचिका फेटाळण्यात येऊन त्यात जिल्हाधिकारी यांनी दिलेला आदेश कायम केलेला आहे. असे पत्रव्यवहारावरुन दिसुन येते. जिल्हाधिकारी व मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाचे निकाल विचारांत घेऊन नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम १३३ मधील तरतूदीनूसार खुल्या जमीनीचे करयोग्यमुल्य निश्चित करुन मिळणेकामी सहा.संचालक नगररचना, नगररचना शाखा कार्यालय,जळगांव यांना कळविले असता त्यांनी खुला भुखंड कराचे करयोग्यमुल्य हे जळगांव शहरासाठी शासनाने प्रसिध्द केलेल्या शिघ्र सिध्द गणकाचा आधार घेऊन येणाऱ्या मुल्यांकनाच्या २% इतके निश्चित करुन दिलेले होते. त्या अनुषंगाने तत्कालीन नगरपालिकेने प्रारुप आकारणी सुची तयार करुन वृत्तपत्रामार्फत दि.०८/०२/२००१ व दि.०९/०२/२००१ रोजी प्रसिध्द करुन

नागरीकांच्या हरकती / सुचना मागवील्या होत्या. प्राप्त हरकती / सुचनांवर नियमानुसार सुनावणी घेऊन त्या निकाली काढल्या होत्या. दि.०१/०४/२००१ पासून सह.संचालक नगररचना, नगररचना शाखा कार्यालय,जळगांव यांनी निश्चित करुन दिलेल्या पध्दतीनुसार करयोग्य मुल्य निश्चित करुन खुला भुखंड कराची आकारणी सुरु आहे व त्याप्रमाणे मागणी देयके बजाविण्यात येतात.

दरम्यानच्या काळात दि.२१/०३/२००३ मध्ये नगरपालिकेचे महानगरपालिकेत रुपांतर झाले तद्नंतर स्थायी समिती व महासभेत खुल्या भुखंड करावर चर्चा झाली असता सदर दर अवास्तव व जास्त असल्याने अनुक्रमे म.स्थायी समिती ठराव क्र.१०६, दि.२३/०१/२००४ व महासभा ठराव क्र.२४ दि.१७/०२/२००४ अन्वये खुला भुखंड कर रु.१/- प्रती चौ.मी. यावार्षीक दरास मान्यता प्रदान करण्यात आलेली होती.

उक्त ठरावाच्या अंमलबजावणीमुळे कराची रक्कम कमी होऊन महानगरपालिकेचे नुकसान होणार आहे म्हणुन शासनाचे मार्गदर्शन मिळणे कामी पत्र क्र.जमनपा/फेआ/१५२२/२००४-०५, दि.१०/०९/२००४ नुसार आकारणी करावी किंवा कसे याबाबत शासनाचे मार्गदर्शन मागविण्यात आलेले होते. तसेच सदरचा पारीत झालेला ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधियिमाचे कलम ४५१ अन्वये विखंडीत करणेबाबत पत्र क्र.जमनपा/फेआ/२८१७, दि.०३/१२/२००४ नुसार मा.सचिव नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांना प्रस्ताव पाठविण्यात आलेला होता परंतु सदरचा प्रस्ताव अदयापपावेतो शासनाकडे प्रलंबित आहे.

सदरचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्यामुळे दि.०१/०४/२००५ पासुन खुला भुखंडकर रु.१/- प्रती चौ.मी. प्रमाणे आकारणीची कार्यवाही करावी यासंबंधात शासनाचा जोकाही निर्णय होईल त्याला महानगरपालिका सामोरे जाईल असा महासभेने ठराव क्र.३ दि.२९/०४/२००५ नुसार पारीत केला व याच ठरावाच्या अनुषंगाने महानगरपालिका सदस्यांनी दिलेल्या यादी प्रस्तावानुसार महासभा ठराव क्र.३ दि.२९/०४/२००५ प्रमाणे खुला भुखंड कर प्रती चौ.मी.रु.१/- या प्रमाणे भुखंडाच्या एकुण क्षेत्रफळावर आकारणी करावी किंवा कराची आकारणी करतांना जर भुखंडाचे भाडेमुल्य काढून व त्याअनुषंगाने करयोग्यमुल्य ठरवुन आकारणी करणेचे अनुज्ञेय असेल तर करयोग्यमुल्य कशा पध्दतीने करण्यात येईल याबाबत प्रशासनाने परीगणना करुन करयोग्यमुल्य निश्चित करुन कार्यपध्दती निश्चित करावी. त्यासाठी पुणे महानगरपालिकेने लागू केलेला खुला भुखंड कराच्या पध्दतीचा अवलंब करावा असा महासभा ठराव क्र.३१ दि.२१/०५/२००८ पारीत केलेला आहे.

परंतु, तत्कालीन आयुक्त यांनी शासनास जा.क्र./जमनपा/खु.भु./३७९१ दि.१५/०१/२०१० पाठविलेल्या पत्रानुसार नगरपालिका असतांना महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायत व औदयोगीक नागरी अधिनियम १९६५ नुसार मालमत्ता कराची आकारणी करण्यासाठी करयोग्यमुल्य निश्चित करण्याचे अधिकार मुख्याधिकारी व मुल्य निर्धारत अधिकारी यांना असल्याने तसेच,

१) सदरचा ठराव हा अधिनियम व त्यावरील कर विषयक नियमांशी विसंगत आहे.

२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १२७ व त्या खालील कराधान नियमानुसार करयोग्यमुल्य निश्चित करण्याची जबाबदारी आयुक्तांची असून मिळकतधारकांस कर जास्त वाटत असल्यास त्यात अपीलाची तरतूद आहे.

३) सदर ठराव महानगरपलिकेचे आर्थीक अहित करणारा आहे.

यामुळे महासभेने पारीत केलेले ठराव क्र.२४ दि.२७/०२/२००४ व ठराव क्र.३ दि.२९/०४/२००५, ठराव क्र.३१ दि.२१/०५/२००८ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५१ (३) (१) अन्वये विखंडीत करणेबाबत अहवाल शासनास सादर करण्यात आला होता. तसेच जा.क्र./जशमनपा/खु.भु./४७० दि.१५/०६/२०२१ अन्वये वरिल तीनही ठराव विखंडीत करण्याबाबत पाठविण्यात आलेल्या अहवालाबाबत त्वरित निर्णय होण्यास शासनांस स्मरणपत्राव्दारे विनंती करण्यात आलेली आहे. तथापी अदयापपर्यंत शासनाचे कुठलेही आदेश प्राप्त नाहीत.

सध्या महानगरपालिकेव्दारा शिघ्र सिध्द गणकाचा आधार घेऊन खुला भुखंड कराचे मुल्य निश्चित करण्यात येते व त्याच्या २% इतके करयोग्यमुल्य निश्चित करुन त्यावर प्रतीवर्ष साधारणत: ३८% प्रमाणे कर आकारणी केली जाते.

तसेच याआधीच खालील महासभा ठराव शासनाकडे उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे कलम ४५१ अन्वये विखंडनासाठी पाठविण्यात आलेले आहेत.

१. महासभा ठराव क्र.२४ दि.१७/०२/२००४
२. महासभा ठराव क्र.३ दि.२९/०४/२००५
३. महासभा ठराव क्र.३१ दि.२१/०५/२००८

वरिल ठराव महानगरपालिकेचे आर्थीक हित विचारांत घेता निष्प्रभावित करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे तसेच यापुर्वी वर नमुद केल्यानुसार जमिनी वरिल मालमत्ता कराची आकारणी सहा संचालक नगररचना, जळगांव शाखा जळगांव तथा करमुल्य निर्धारण अधिकारी यांनी जळगांव नगरपरिषद असतांना कळविल्यानुसार तसेच जमिनी वरिल मालमत्ताकराचे करयोग्य मुल्याबाबत म.संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सन २००१ मध्ये मा.उपसंचालक, नगररचना, नाशिक विभाग, नाशिक यांना मार्गदर्शन केलेले आहे, त्यानुसार ९९९.० चौ.मी. पर्यंतच्या भुखंडांसाठी भुखंडाच्या मुल्याच्या जास्तीत जास्त २% प्रमाणे करपात्र मुल्य निश्चीत करावे असे कळविलेले आहे. तद्नंतर तत्कालीन आयुक्त यांनी याबाबत दि.१६/०९/२००९ अन्वये कार्यालयीन आदेश पारित केलेले आहेत. त्यामुळे आजपर्यंत प्रचलित पध्दतीने सुरु असलेली कर आकारणी योग्य असल्याने त्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

मात्र आर्थिक वर्ष सन २०२२-२३ पासुन खुला भुखंड कराची आकारणी खालील प्रमाणे निश्चित करण्यात यावी.

सन २०२२-२३ या आर्थीक वर्षापासुन जमिनी वरील मालमत्ताकर (खुला भुखंड) आकारणी करतांना त्या-त्या भागातील शिघ्रसिध्द गणकाचे खुल्या जागेचे दर गुणीले क्षेत्रफळ घेऊन त्याच्या येणाऱ्या मुल्यांकनाच्या १% इतके वार्षिक भाडे निश्चित करुन व त्यानुसार येणाऱ्या करयोग्यमुल्यावर महानगरपालिकेने वेळोवेळी निश्चित केलेले मालमत्ता कर (निवासी) साठी वापरले जाणारे करांचे दर वापरुन जमिनीवरील मालमत्ताकर (खुला भुखंड) निश्चीत करावा. मात्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १५० (अ) अन्वये ची तरतुद विचारांत घेता, ज्या जमिनीची (खुला भुखंडाची) यापुर्वी मालमत्ता आकारणी झालेली नाही अशा मिळकतीची पूर्वीच्या कालावधीची आकारणी करतांना यापुर्वीच्या सुरु असलेल्या प्रचलित पध्दतीनुसार करणे आवश्यक आहे. तसेच चालु आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये कराचा भरणा केलेल्या मिळकतींच्या बाबतीत नविन पध्दतीने निश्चीत कर कमी होत असल्यास त्याचे समायोजन / परतावा करण्याची नियमानुसार कार्यवाही करावी. सदर सुधारीत पध्दतीने आकारणी निश्चित करतांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात यावी.

जळगांव शहर महानगरपालिका हद्दितील जमिनी वरील मालमत्ताकर (खुला भुखंड) आकारणी दर ठरविणे बाबत चार सदस्यीय गठीत समितीने सादर केलेला अहवाल स्विकृत करुन त्यानूसार खुला भुखंड कराची आकारणी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

नागरीकांना सदर दरांबाबत माहीती होणे कामी प्रशासनाने उपरोक्त प्रमाणे आकारणी बाबत दैनिक वृत्तपत्रात माहीती प्रसिध्द करावी व नागरीकांना याबाबतची माहीती दयावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६४**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. ०९) :-** जळगांव शहर महानगरपालिकेतील सन्मा.सदस्य यांचेकडून मा.महापौर, मनपा,जळगांव यांचेकडेस विविध विकास कामे करुन मिळणेबाबतचे प्रस्ताव प्राप्त झालेले असून सोबतचे यादीतील एकूण ०१ ते ९३ कामे विविध शासकीय योजनांच्या निधीमधून करणेबाबत मा.महापौर, मनपा,जळगांव यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा , आदरणीय कैलासआप्पा १ ते ९३ आहेत ना , प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री. कैलास सोनवणे :-** सचिनभाऊंचा एक विषय आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** १ ते ९३ न करता १ ते ९४ करून घ्यावे.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य सचिनभाऊ पाटील यांनी दिलेल्या कामांचा समावेश करून विषय क्रं.०९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सचिनभाऊ बरोबर आहे.

**श्री. कैलास सोनवणे :-** नाही नाही बरोबर आहे ना

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा महापौरांना

**श्री. कैलास सोनवणे :-** नाही प्रामाणिक माणसाचा सत्कार करील मी

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा योग्य आहे.

**नगरसचिव :-** सन्मा.महापौर महोदया , सन्मा सभागृहाला विनंती आहे पुनश्च विनंती करतो की दि.३०/०५/२०२२ च्या महासभेत आयत्या वेळेच्या विषयामध्ये प्रस्ताव समाविष्ठ करणे आर्थिक बाबीं च्या दृष्टीने संयुक्तीक नाहीये. हे संयुक्तीक होणार नाही ही मी नम्रपणे विनंती केलेली होती. तरी सुध्दा मी विनंती करतो सभागृहाला की विषयपत्रिकेवर जे विषय आहेत. त्याच्यावर निर्णय घ्यावा. आयत्यावेळेच्या विषयावर निर्णय घेण्यात येवु नये अशी माझी विनंती आहे पुनश्च या सभागृहाला

**श्री.नितीन लढ्ढा :-** हे आर्थिक विषय जे असतात तरी तो प्रस्ताव आता कधी निर्णय झाला तरी त्याची ईमिजेटली अंमलबजावणी होईल अशातील भाग नाहीये. निर्णय सभागृहाने

**नगरसचिव :-** विषय

**श्री.नितीन लढ्ढा :-** निर्णय सभागृहाने घेतला तर प्रशासन कायद्याच्या चौकटीत राहुन तपासते. तशी तरतूद असेल तर प्रशासन त्या प्रस्तावाला मान्य करेल आणि प्रशासनाला जर वाटेल की याच्यामध्ये कुठेतरी आर्थिक अनियमीतता घडत आहे. तर प्रशासन ४५१ खाली त्याचे विखंडन करण्यासाठी पाठवते. म्हणुन सभागृहाचा जो अधिकार आहे तो सभागृहाने वापरायला पाहीजे. प्रशासनाला जो अधिकार आहे तो प्रशासनाने वापरायला पाहीजे. कोणाच्या अधिकारावर कोणी अतिक्रमण करू नये अशी माझी ईच्छा आहे.

**नगरसचिव :-** विषय

**श्री.विशाल त्रिपाठी :-** महापौरताई माझी फक्त सभागृहाला अशी विनंती आहे की भारतीय जनता पार्टीची मागेपण ही भुमिका होती की दलितवस्तीचे निधी असेल किंवा नंतर मनपाचा निधी असेल किंवा सुवर्णजयंतीचे की जे ठराविक प्रभाग आहेत तर समान निधी त्या प्रभागांना वाटप केल पाहीजे. कारण आपण येथे ठराव करून घेतो आणि तो ठराव त्याचे काम करून घेतो आणि उर्वरीत प्रभागाचे काम या ठिकाणी राहुन जातात. अशी माझ ी या सभागृहाला विनंती आहे की दलितवस्तीचे निधी आपले दलितवस्तीचे ५ प्रभाग आहेत. त्या पाचही प्रभागांना समान निधी वाटप झाला पाहीजे किंवा दुसरा निधी आहे. आपण जो ठराव करतो येथे विषयपत्रिकेत आलेले समान निधीत वाटप करतात.

**श्री.सुनिल महाजन, विरोधी पक्षनेता :-** कस आहे शादी मत करो मगर शादी की बात तो करो असा विषय झाला आहे हा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हो ना मग कोणता आहे. विषय आपणच घेत आहोत विषय आपलाच आहे. विषय १० नंबरचा विषय आहे ते ९ नंबरचा विषयामध्ये ऑलरेडी आलेले आहे. सुनिलभाऊ १० नंबरचे विषयामध्ये या ९ नंबरच्या विषयामध्ये आलेले आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८४८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेतील सर्व सन्मा.नगरसेवकांनी मा.महापौर,मनपा जळगांव यांचेकडेस विकास कामांचे प्रस्ताव सादर केलेले असून ते विविध शासकीय योजनांतुन घेणेबाबत विंनती केलेली आहे. सदर विकास कामे जिल्हा नियोजन मंडळ तसेच राज्य शासनाच्या

निधीतुन घेणेबाबत जिल्हा नियोजन मंडळातील, नागरी दलितेत्तर, नगरोत्थान, दलित वस्ती सुधारणा योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी योजना, नॅशनल क्लिन एअर प्रोग्राम निधी, नाविन्यपुर्ण इत्यादी तसेच राज्य शासनाच्या नगरविकास विभागातुन ही मुलभूत सुखसुविधा, नगरोत्थान, विशेष निधी, नाविन्यपुर्ण तसेच वैशिष्टयपुर्ण योजनेतुन कामे सुचविलेली असून त्यास मा.महासभेची मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर केलेले असल्याने मा.महापौर,मनपा,जळगांव यांनी सादर केलेल्या यासोबतच्या यादीतील अ.क्र.०१ ते ९३ विकास कामे तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनूसार सन्मा.सदस्य श्री.सचिन भिमराव पाटील यांचे प्रभाग क्रं.७ मधील १ ते ९ कामे उपरोक्त नमूद विविध शासकीय योजनांच्या निधीमधून करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

मात्र उपरोक्त यादीतील अ.क्र.७० ते ७६ मध्ये दर्शविलेली कामे ही विषय क्र.१० महासभा ठराव क्र.८४९ दि.०७/०७/२०२२ व विषय क्रं.११ महासभा ठराव क्र.८५० दि.०७/०७/२०२२ मध्ये नमूद असल्याने यासोबतच्या यादीतील अ.क्र.७० ते ७६ वर नमूद असलेली कामे वगळण्यास सूध्दा मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**महासभा क्र.**39 **महासभा ठराव क्र.** 848 **दिनांक** 07/07/2022

| **अ.क्र.** | **सन्मा.सदस्य/ सदस्या** | **प्र.क्र.** | **कामाचे नांव** | **अंदाजित रक्कम** |
|---|---|---|---|---|
| 1 | खान रुकसाना बी गबलु | 1 | प्रभाग क्र. 1 मधील सुरेशदादा जैन नगर गेंदालाल मिल मधील प्रमुख रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 1,50,00,000 |
| | 1,50,00,000 | | | |
| 2 | श्री.किशोर बाविस्कर | 2 | प्र.क्र.2 अंतर्गत कांचन नगर कालंका माता मंदीरा जवळील महानगरपालिका ओपन स्पेसमध्ये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयाची इमारत बांधुन अद्यावत वाचनालय व ग्रंथालय उभारणे | 9,50,000 |
| 3 | | | प्रभाग क्र. 2 अंतर्गत कांचन नगर परिसरातील आवश्येकतेनुसार आरसीसी गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे | 50,00,000 |
| | 59,50,000 | | | |
| 4 | श्री.नवनाथ दारकुंडे | 2 | प्रभाग क्र. 2 स.नं. 337 व 338 मधील सतिष कंडारे ते आप्पा गुजर यांच्या घरापर्यंत तसेच क्षत्रिय मराठा समाज ते शिवाजी पाटील यांच्या घरापर्यंत आरसीसी गटार व स्लॅब कल्व्हेट ठिकठिकाणी करणे | 8,70,000 |
| | 8,70,000 | | | |
| 5 | श्री. प्रविण कोल्हे | 3 | प्र.क्र.3 दिनकर नगर परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे (दलित वस्ती) | 40,00,000 |
| 6 | 2,13,00,000 | | प्र.क्र.3 अंतर्गत जळगांव शिवार गट नं. 92/1,93/1/2,96/2 तळेले कॉलनी परिसरात मध्ये रस्ते डांबरीकरण करणे व आरसीसी गटारी बांधणे. | 85,00,000 |
| 7 | | | प्र.क्र.3 अंतर्गत खेडी शिवार गट नं. 5/1, 5/2 मध्ये आरसीसी गटार बांधणे | 25,00,000 |
| 8 | | | प्र.क्र.3 अंतर्गत खेडी शिवार गट नं. 3 मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | 30,00,000 |
| 9 | | | प्र.क्र.3 अंतर्गत खेडी शिवार गट नं. 48/1 मध्ये आरसीसी गटार बांधणे | 8,00,000 |
| 10 | | | प्र.क्र.3 अंतर्गत खेडी शिवार गट नं. 57, 58 मध्ये आरसीसी गटार बांधणे | 25,00,000 |
| 11 | सौ. मिनाताई सपकाळे | 3 | प्र.क्र.3 अंतर्गत जळगांव शिवार गट नं. 173 ते 51 मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | 55,00,000 |
| 12 | 1,60,00,000 | | प्र.क्र.3 अंतर्गत जळगांव शिवार गट नं. 53, 57 मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | 45,00,000 |
| 13 | | | प्र.क्र.3 अंतर्गत जळगांव शिवार गट नं. 173 ते 50 मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | 60,00,000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 14 | सौ.रंजना सपकाळे | 3 | प्र.क्र. 3 अंतर्गत साईगिता नगर येथे रस्ते डांबरी करण करणे | 1,00,00,000 |
| 15 | 5,00,00,000 | | प्र.क्र.3 योगेश्वर नगर येथे रस्ते डांबरी करण करणे | 1,00,00,000 |
| 16 | | | प्र.क्र.3 खेडी गाव येथील रस्ते डांबरी करण करणे | 1,00,00,000 |
| 17 | | | प्र.क्र. 3 दिनकर नगर येथील रस्ते डांबरी करण करणे | 1,00,00,000 |
| 18 | | | प्र.क्र. 3 गजानन नगर व समर्थ कॉलनी येथील रस्ते डांबरी करण करणे | 1,00,00,000 |
| 19 | श्री.चेतन सनकत | 4 | प्रभाग क्र. 4 अंतर्गत काट्या फाईल येथे ठिकठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे | 70,00,000 |
| 20 | 2,80,00,000 | | प्रभाग क्र. 4 अंतर्गत गुरुनानक नगर येथे ठिकठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे | 50,00,000 |
| 21 | | | प्रभाग क्र. 4 अंतर्गत बळीराम पेठ येथे ठिकठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे | 50,00,000 |
| 22 | | | प्रभाग क्र. 4 अंतर्गत ईस्मालपुरा,भिलपुरा येथे ठिकठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे | 40,00,000 |
| 23 | | | प्रभाग क्र. 4 अंतर्गत ठिकठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे | 70,00,000 |
| 24 | सौ.मंगला चौधरी | 6 | प्रभाग क्र. 6 अंतर्गत मंजुषा सोसायटी मधील रस्ता डांबरीकरण करणे | 40,50,000 |
| 25 | 88,50,000 | | प्रभाग क्र. 6 अंतर्गत मुक्तांगण हॉल परिसरामधील रस्ता डांबरीकरण करणे | 48,00,000 |
| **अ.क्र.** | **सन्मा.सदस्य/ सदस्या** | **प्र.क्र.** | **कामाचे नांव** | **अंदाजित रक्कम** |
| 26 | डॉ.चंद्रशेखर पाटील | 8 | प्रभाग क्र. 8 मध्ये विविध ठिकाणी रस्ते डांबरीकरण, कॉक्रीटीकरण करणे व गटारी बांधणे | 2,60,00,000 |
| | 2,60,00,000 | | | |
| 27 | श्रीमती लताताई भोईटे | 8 | प्रभाग क्र. 08 भोईटे नगर सिटी सर्वे नंबर 294/295 जळगांव शिवार येथील पर्यतचा रस्ता डांबरीकरण करणे | 64,69,246 |
| 28 | 1,46,34,550 | | प्रभाग क्र. 08 गोकुळधाम अर्पाटमेंट पिंप्राळा रोड ते हर्षगिरी अर्पाटमेंट पर्यतचा रस्ता डांबरीकरण करणे | 46,01,460 |
| 29 | | | प्रभाग क्र. 08 मधील श्रीमती लताताई भोईटे यांच्या घरापासून श्री.भगत (गुरुपार्क) यांच्या घरपर्यत रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे | 35,63,844 |
| 30 | सौ.पार्वताबाई भिल | 11 | प्र.क्र. 11 हरिविठ्ठल नगर पुल ते भिलाटी शौचाल पर्यत नाल्याला संरक्षण भिंत बांधणे | 32,86,006 |
| 31 | 1,00,52,657 | | प्र.क्र. 11 वाघ नगर स्टॉप ते राजीव गांधी नगर परिसर जवळील शिवराम लोंढे यांचे घरापर्यत आरसीसी गटार बांधणे | 7,95,473 |
| 32 | | | प्र.क्र. 11 पिंप्राळा गट नं. 119 मध्ये आरसीसी गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे | 14,58,494 |
| 33 | | | प्र.क्र. 11 पिंप्राळा गट नं. 117 मध्ये आरसीसी गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे | 17,51,817 |
| 34 | | | प्र.क्र. 11 पिंप्राळा गट नं. 117 मध्ये आरसीसी गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे | 27,60,867 |
| 35 | श्री.नितिन बरडे | 12 | प्रभाग क्र. 12 मधील वल्लभ नगर,पार्वती नगर, गजानन हौसिंग सोसायटी, अजिंठा हौसिंग सोसायटी, सन्मित्र कॉलनीमधील विविध भागात आरसीसी गटार बांधणे | 42,61,846 |
| | 42,61,846 | | | |
| 36 | सौ.ज्योती चव्हाण | 13 | प्र.क्र.13 आरटीओ ऑफिस पासुन ते महाजन यांचे घरापर्यत कॉक्रीट रस्ता करणे | 25,00,000 |
| 37 | 15,66,39,716 | | प्र.क्र.13 श्री.दप्तरी वकिल ते मोहाडी रोड पर्यत कॉक्रीट रस्ता करणे | 20,00,000 |
| 38 | | | प्र.क्र.13 आदर्श नगर ते शीनु पार्क स्वामी समर्थ मंदीर परिसर कविता सोसायटीचा संपुर्ण परिसर डांबरीकरण करणे | 25,00,000 |
| 39 | | | प्रभाग क्र. 13 मधील आनंद नगर रविंद्र नगर नुतन वर्षा कॉलनी व शारदा कॉलनी मधील रस्ते डांबरीकरण करणे | 1,50,04,784 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 40 | | | प्रभाग क्र. 13 मधील मोहन नगर भागातील स.नं. 448 मधील मुख्य रस्ते डांबरीकरण करणे | 95,04,000 |
| 41 | | | प्रभाग क्र. 13 मधील त्र्यबक नगर भागातील मुख्य रस्ते डांबरीकरण करणे | 15,00,000 |
| 42 | | | प्रभाग क्र. 13 मधील नुतन वर्षा कॉलनी, शारदा कॉलनी, रविंद्र नगर इ. भागात नविन आरसीसी गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे | 24,50,000 |
| 43 | | | प्रभाग क्र. 13 मधील मेहरुण स.नं. 412 नेहरु नगर मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 1,06,62,548 |
| 44 | | | प्रभाग क्र. 13 मधील मेहरुण स.नं. 451, 452 संभाजी नगर, नित्यानंद नगर मधील 12 मी. डी.पी. रोड डांबरीकरण करणे | 68,20,000 |
| 45 | | | प्रभाग क्र. 13 मधील नागेश्वर कॉलनी भागातील मुख्य रस्ते डांबरीकरण करणे | 99,00,000 |
| 46 | | | प्रभाग क्र. 13 मधील मेहरुण स.नं.463 देवंद्र नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे | 1,31,25,000 |
| 47 | | | प्रभाग क्र. 13 मधील मेहरुण स.नं.462 देवंद्र नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे | 99,75,000 |
| 48 | | | प्रभाग क्र. 13 मधील मेहरुण स.नं.464 रायसोनी नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे | 52,50,000 |
| 49 | | | प्रभाग क्र. 13 मधील मेहरुण स.नं.458 रायसोनी नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे | 65,10,000 |
| **अ.क्र.** | **सन्मा.सदस्य/ सदस्या** | **प्र.क्र.** | **कामाचे नांव** | **अंदाजित रक्कम** |
| 50 | | | प्रभाग क्र. 13 मधील मेहरुण स.नं.459 रायसोनी नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे | 2,10,00,000 |
| 51 | | | प्रभाग क्र. 13 मधील मेहरुण स.नं.456,457 रायसोनी नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे | 1,89,00,000 |
| 52 | | | प्रभाग क्र. 13 मधील लायन्स हॉल भागातील स.नं.411 मधील रस्ते डांबरीकरण करणे | 59,53,320 |
| 53 | | | प्रभाग क्र. 13 मधील मेहरुण स.नं.456,457,458 रायसोनी नगर भागात रोड साईडला गटार बांधणे. | 63,80,064 |
| 54 | | | वार्ड क्रमांक 13 मधील समता नगर मधील विवेक कॉलनी जवळ आरसीसी नाला बांधणे | 12,50,000 |
| 55 | | | त्र्यबक नगर श्री.टोके यांच्या घरापासून पाटील यांच्या घरापर्यत गटार तयार करणे | 10,00,000 |
| 56 | | | त्र्यबक नगर शाळेच्या समोरील दोन्ही बाजुस गटार तयार करणे | 9,75,000 |
| 57 | | | कुंजीवाल यांच्या घरापासुन जांगीळ यांचे घरापर्यत गटार तयार करणे | 9,80,000 |
| 58 | | | श्री.हरि अर्पाटमेंट पासून विश्वजित पर्यत आरसीसी नाला तयार करणे | 25,00,000 |
| 59 | श्री. राजेंद्र पाटील | 14 | प्र.क्र.14 मेहरुण स.नं. 426, 427 ज्योती नगर व पायोनीर क्लब परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे | 58,30,846 |
| 60 | 65,30,846 | | प्र.क्र.14 मध्ये विविध ठिकाणी 10 हायमस्ट लॅम्प उभारणे (शासकिय निधी अंतर्गत) | 7,00,000 |
| 61 | सौ.सुरेखाताई सोनवणे | 14 | प्र.क्र.14 मधील मेहरुण इंद्रप्रस्थ भवन चौक ते अनिल सोनवणे यांचे घरापर्यत नाला बांधणे | 23,80,134 |
| | 23,80,134 | | | |
| 62 | श्रीमती रेखा पाटील | 14 | प्रभाग क्रमांक 14 मधील मेहरुण तलाव विकसित करणे | 5,00,00,000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 63 | 10,00,00,000 | | प्रभाग क्रमांक 14 मधील मेहरुण तलाव विकसित करणे | 5,00,00,000 |
| 64 | श्री.प्रशांत नाईक | 15 | प्र.क्र.15 मेहरुण अंतर्गत मिल्लत मस्जिद ते इक्बाल कॉलनीच्या पुलापर्यंत च्या दोघबाजुला संरक्षण भिंत बांधणे | 1,50,00,000 |
| 65 | 5,30,00,000 | | प्र.क्र.15 कय्युम देशमुख नगर पुलापासुन ते नॅशनल हायवेच्या पुलाच्या दोघ बाजुस नाल्यास संरक्षण भिंत बांधणे | 1,40,00,000 |
| 66 | | | प्र.क्र.15 पिरजादे कब्रस्थान मध्ये भराव करुन पाथवे तयार करणे | 80,00,000 |
| 67 | | | प्र.क्र.15 कुंभारवाडा सार्व. शौचालयाच्या आजुबाजूच्या परिसरात कॉक्रीटीकरण करणे | 40,00,000 |
| 68 | | | प्र.क्र.15 मेहरुण अंतर्गत स.क्र.6/1 मनपाच्य खुल्या जागेत सामाजिक हॉल दुरुस्ती करणे | 40,00,000 |
| 69 | | | प्र.क्र.15 मेहरुण अंतर्गत मिल्लत नगर, मलिक नगर, कय्युम देशमुख नगर इ. भागात आरसीसी गटार बांधणे | 80,00,000 |
| 70 ते 76 | अ.क्र.70 ते 76 मध्ये दर्शविलेली कामे ही महासभा विषय क्रं.10 ठराव क्र.849 दि.07/07/2022 व महासभा विषय क्र.11 ठराव क्र.850 मध्ये नमूद असल्याने सभागृहात झालेल्या चर्चेनूसार सदरचे कामे या यादीतून वगळण्यात आलेली आहेत. | | | |
| 77 | सौ.रेश्मा काळे | 16 | प्र.क्र.16 एकता कॉलनी रस्ते व गटारी कॉक्रीटीकरण करणे | 30,00,000 |
| 78 | 2,89,95,000 | | प्र.क्र.16 प्रमार्थ साधना मंदीर परिसरात रस्ते व गटारी कॉक्रीटीकरण करणे | 40,00,000 |
| 79 | | | प्र.क्र.16 जयगुरुदेव कॉलनी रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 20,00,000 |
| 80 | | | प्र.क्र.16 वर्षा कॉलनीमध्ये गटारी कॉक्रीटीकरण करणे | 9,95,000 |
| 81 | | | प्र.क्र.16 रनछोड नगर मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | 25,00,000 |
| **अ.क्र.** | **सन्मा.सदस्य/ सदस्या** | **प्र.क्र.** | **कामाचे नांव** | **अंदाजित रक्कम** |
| 82 | | | प्र.क्र.16 रनछोड नगर गटारी कॉक्रीटीकरण करणे | 20,00,000 |
| 83 | | | प्र.क्र.16 लक्ष्मी नगर मध्ये रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 30,00,000 |
| 84 | | | प्रभाग क्रं. 16 साईबाबा मंदीर परिसरातील रस्ते डांबरी करण करणे. | 20,00,000 |
| 85 | | | प्रभाग क्रं. 16 देविदास कॉलनी ते संचार नगर पर्यंत रस्ता डांबरी करण करणे. | 20,00,000 |
| 86 | | | प्रभाग क्रं. 16 संचार नगर मधील रस्ता कॉक्रीटी करण करणे. | 30,00,000 |
| 87 | | | प्रभाग क्रं. 16 संचार नगर मधील दोन्ही बाजुस आर.सी.सी. गटार बांधणे. | 20,00,000 |
| 88 | | | प्रभाग क्र. 16 गट नं. 414 सम्राट कॉलनी परिसरात रस्ते डांबरी करण करणे. | 25,00,000 |
| 89 | श्री.मनोज आहुजा | 16 | प्र.क्र.16 श्री. विशाल सोनवणे यांचे घरापासून ते शिवसागर बिल्डींग पर्यत रस्ता डांबरीकरण करणे | 30,00,000 |
| 90 | 2,00,00,000 | | प्र.क्र.16 हेमूकलाणी उद्यान ते नानीबाई हॉस्पीटल दत्त मंदीर पर्यत रस्ता डांबरीकरण करणे. | 50,00,000 |
| 91 | | | प्र.क्र.16 लक्ष्मी नगर मधील मेनरोड डांबरीकरण करणे | 40,00,000 |
| 92 | | | प्र.क्र. 16 ईच्छादेवी चौक ते घरकुल पर्यत नाल्यास संरक्षण भिंत बांधणे | 50,00,000 |
| 93 | | | प्र.क्र.16 श्री. सुरेश पांचाळ ते नाथवाडा रोड पर्यत डांबरीकरण करणे | 30,00,000 |
| | 56,84,64,749 | | **एकुण :-** | 56,84,64,749 |

सभागृहात झालेल्या चर्चेनूसार उपरोक्त यादीतील अ.क्र.70 ते 76 मध्ये दर्शविलेली कामे ही महासभा विषय क्र.10 ठराव क्र.849 दि.07/07/2022 व महासभा विषय क्रं.11 ठराव क्र.850 मध्ये नमूद असल्याने अ.नं.70 ते 76 ही कामे वगळणेस तसेच सन्मा.सदस्य, श्री.सचिन भिमराव पाटील यांचे प्रभाग क्र.7 मधील खालील नमूद अ.नं.1 ते 9 कामे समाविष्ठ करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सन्मा.सदस्य/ सदस्या | प्र.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (लाखात) |
|---|---|---|---|---|
| 1. | श्री.सचिन भिमराव पाटील | 7 | प्र.क्र.7 मधील आशाबाबा नगर गट नं.81 मधील रस्ते डांबरीकरण करणे | 40 |
| 2. | | | प्र.क्र.7 मधील आशाबाबा नगर गट नं.82 मधील रस्ते डांबरीकरण करणे | 55 |
| 3. | | | प्र.क्र.7 मधील आशाबाबा नगर गट नं.79मधील रस्ते डांबरीकरण करणे | 55 |
| 4. | | | प्र.क्र.7 मधील आशाबाबा नगर गट नं.85 मधील रस्ते डांबरीकरण करणे | 40 |
| 5. | | | प्र.क्र.7 मधील आशाबाबा नगर गट नं.86 मधील रस्ते डांबरीकरण करणे | 55 |
| 6. | | | प्र.क्र.7 मधील आशाबाबा नगर गट नं.88 मधील रस्ते डांबरीकरण करणे | 40 |
| 7. | | | प्र.क्र.7 मधील आशाबाबा नगर गट नं.89 मधील रस्ते डांबरीकरण करणे | 55 |
| 8. | | | प्र.क्र.7 मधील आशाबाबा नगर गट नं.91 मधील रस्ते डांबरीकरण करणे | 50 |
| 9. | | | प्र.क्र.7 मधील आशाबाबा नगर गट नं.95 मधील रस्ते डांबरीकरण करणे | 45 |
| | | | **एकुण :-** | 435 |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** **६४**

**सूचक** **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक** **:- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १०:-** शासनाच्या पर्यटन विभागा अंतर्गत जळगांव ता.जि.जळगांव येथिल मेहरुण तलाव परिसरातील शिवाजी उदयान सुशोभिकरण व विकसित करणे कामी निधी उपलब्ध होणेचा प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत मा.महापौर,मनपा,जळगांव यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई मला एक विचारयचे होते. आपण ठराव करतो कोटींच्या कोटींचे ठराव होतात याच्यात आपण आपलीपण फसवणुक करतोय आणि नागरीकांची पण फसवणुक करतोय.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** असे बरेच ठराव झालेले आहेत.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** ५८ कोटींचा जो ठराव झालेला आहे आपला त्याचे काम कुठपर्यंत आले आहे.

**सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते. त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.**

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण प्रत्येक मिटींगला कोट्यावधी रूपयांचे ठराव करतो. परंतू ज्या कामांसाठी शासनाने निधी मंजुर करून दिला आज त्यास जवळपास ४ वर्षांचा कालावधी झालेला आहे. ४ वर्षांच्या कालावधीमध्ये १०० कोटी रूपये मा.देवेंद्र फडणवीस साहेबांनी मंजुर केलेले होते. ते मुख्यमंत्री पदावरून गेले पुन्हा उपमुख्यमंत्रीपदावर येवुन गेले. परंतू आपला निधी जो आहे त्याच्यातील आपला एक रूपयाही खर्च झालेला नाहीये. ही खरच मोठी शोकांतिका आहे. आज ५८ कोटी रूपयांच्या प्रस्तावाच्या संदर्भात वास्तविक बघितले मी आता आठ दिवसांपुर्वीच गिरगांवकर साहेबांना बोललो होतो. सन्मा सदस्य विष्णुभाऊ भंगाळे त्यांना सुध्दा सुखसोई पुरविण्यासाठी १ कोटी रूपयांचा निधी मिळणे हा अपेक्षित आहे. सन्मा.सदस्य पोकळे साहेब असतील, नवनाथ दारकुंडे असतील यांना सुध्दा १ -१ कोटी रूपयांचा निधी मिळुन आता जवळपास एक-दिड महिन्याचा कालावधी हा होवुन गेलेला आहे. तर हे प्रस्ताव जवळपास ८ महिन्यांपुर्वी विष्णुभाऊ भंगाळे यांना मिळालेल्या निधीचा प्रस्ताव निविदा प्रक्रीयेपर्यंत पोहोचलेला आहे. म्हणजे एकीकडे शासन पैसा देण्याला तयार आहे, शासन पैसा देतो आहे आणि पालकमंत्र्यांनी पैसा दिला आहे. परंतू या कागदांवर फिरवण्याच्या संदर्भात प्रचंड मोठ्या प्रमाणावर विलंब आपल्या महानगरपालिका प्रशासनाकडुन होत आहे. मी मॅडमांना ही बोललो या विषयाच्या संदर्भात आणि चार दिवसांपुर्वी गेलो होतो त्यावेळीही बोललो कारण काय होत सर्व सन्मा.सदस्य आपले प्रस्ताव घेवुन सातत्याने पाठपुरावा करतात. दुसऱ्या दिवशी तो सन्मा.सदस्य पाठपुरावा करतो तोपर्यंत प्रस्ताव कुठेतरी गायब झालेला असतो. म्हणजे टेक्निकल सेंक्शन होत नाही. ईस्टिमेट मिळत नाही, निविदा प्रक्रीया होत नाही. म्हणजे मला सांगा की जर कोट्यावधी रूपयांचा निधी येवुन पडलेला असतो शासनाने दिलेला आहे आणि तो जर आपल्याकडुन खर्ची पडत नसेल तर हि सामान्य जनता आपल्याला ज्या शिव्या घालते त्यात काही गैर नाहीये. कुठेच चुकीचे नाहीये हा जर निधी नसेल आणि त्यावेळेला मात्र ज्यावेळेला नागरीक शिव्या घालत असतील तर त्यावेळेला कोणते दायित्व आहे तर आपण त्यांना त्यावेळेला सांगु की

आमची महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नाहीये म्हणुन आम्ही विकास साध्य करू शकत नाहीये. परंतू निधि असतांना सुध्दा जर कधी अश्या पध्दतीने प्रशासनाकडुन प्रस्तावाला गती दिली जात नसेल तर याला काय करायच आता, कोट्यावधी रूपयांचा निधी आलेला आहे. परंतू प्रस्तावच येत नाही वेळेवरती हा ५८ कोटी रूपयांचा प्रस्ताव आहे मला सांगा की एकदा तरी प्रशासनाकडुन या संदर्भात कोणी विचारणा केली का ? की ५८ कोटी रूपयांचे, १०० कोटी रूपये मंजुर झाले होते. ४२ कोटींला मान्यता देतांना सुध्दा राज्य शासनाने जो निर्णय घेतला त्या निर्णयामध्ये नमुद केलेले आहे की, ५८ कोटी रूपयांचा प्रस्तावाचे हे काम सुरू झाल्यावर पाठवा. परंतू अजुनपर्यंत त्या प्रस्तावाला कुठेच काही नाहीये. त्या प्रस्तावाच्या याद्या तयार आहेत. परंतू याद्या प्रशासनाकडे द्यायच्या परंतू त्या याद्यातरी ठिकाणावर राहीले का याबाबत काही खर नाही. कारण जे सदस्य त्या याद्या हातात घेवुन फिरतात त्यांचे प्रस्ताव वेळेवर मिळत नाहीये. मी स्वत: एक एक प्रस्तावाकरीता दिवसातुन चार चार वेळा फोन करतो. परंतू पुन्हा हेच उत्तर मिळत की कैलास चौधरी नाहीये, आज हा नाहीये, आज टमुक नाहीये. मला सांगा हे कैलास चौधरी त्यांच उद्या दुर्देवाने काही बरे वाईट झाले तर या महानगरपालिकेच प्रशासन ठप्प होवुन जाईल का ? कुणी गांर्भीयाने घेतच नाहीये ना, म्हणजे ही महानगरपालिका आहे की ग्रामपंचायत आहे हेच कळायला मार्ग नाहीये.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** नितीनभाऊ ग्रामपंचायतचे उलट चांगले काम होत आहेत. हि शोकांतिका आहे लाज वाटते आपल्याला वॉर्डामध्ये जायला. तिथे रस्ते , गटारी काही नाही काय करायचे आता.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आहे ना कोट्यावधी रूपयांचा निधी आहे. निधीची कमतरता आहे अशातील भाग नाहीये. महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये मोठ्या प्रमाणात भर पडलेली आहे. काही कामं आपण मनपा फंडातुन मार्गी लावु शकतो. परंतू काय होत बेसिक कुठेतरी नियोजनामध्ये आपण कुठेतरी कमी पडतोय. म्हणजे आपण कुठल्यातरी व्यक्तीला दोष देतोय अशातील भाग नाहीये. एकंदरीत या सभागृहाला कुठेतरी या सर्व विषयांवर गांर्भीयाने विचार करायला पाहीजे. आता आजपासुन गृहीत धरुन घ्या की साधारणत: एक वर्षाचा कालावधीत आपल्याला निवडणुकीला सामोरे जाण्याच्या संदर्भातील परिस्थिती आहे आणि एक वर्षामधील हे दोन तिन महिने या पावसाळ्यात जातील आणि पावसाळ्यामध्ये काम होणार नाहीत. आज ताई आपण परिस्थिती पाहीली तर शहरामध्ये अत्यंत गंभीर परिस्थिती आहे. इतकी वाईट परिस्थिती आहे मी माझा एक फोन तुम्हाला ऐकवला. म्हणजे नागरीक आमच्या सारख्यांना नाही त्या अत्यंत त्या भाषेमध्ये बोलतात. ते सर्व निमुटपणे सहन करून घ्यावं लागत कारण त्यांना उत्तर काय देणार आपण , खड्डे बुजले जात नाहीत, पाण्याचा निचरा होत नाही, कुठे रस्ते नविन झाले, काही भाग खाली आहेत तिथे पाणी साचुन जात. म्हणजे नियोजन शुन्य जे काम चाललेल आहे ना याच्यावर कुठेतरी गिरगांवकर साहेब आपण अनुभवी आहात. चांगल्या महानगरपालिकेमध्ये आपण काम करून आलेले आहात. आपला पाहण्याचा दृष्टीकोन सकारात्मक आहे. कुठेतरी आपण या सर्व विभाग प्रमुखांची बैठक घेवुन , मी काल ताईंना बोललो की काल जस मी बोललो वर्कींग डे मध्ये आपण आपल्या अभियंत्यांना कधी पदाधिकाऱ्यांकडे बालवले जाते, कधी साईट व्हिजीटचा वेळ असतो. कधी आयुक्तांकडे बोलवल जात त्यामुळे कामांमध्ये वेळ लागतो. तर आता जे सुटीचे दिवस आहेत. दोन -दोन चार -चार तास जर आपण त्या अभियंत्यांना काही प्रस्ताव तयार करायचे असतील, ईस्टिमेट तयार करायचे असतील. निविदा प्रक्रीयेपर्यंत ते प्रस्ताव पोहचवायचे असतील. याच्या संदर्भात जबाबदाऱ्या या तुम्हाला कुठेतरी फिक्स कराव्या लागतील. कारण की आता हे सगळ नियोजन जे आहे की ही टर्म संपुन जाईल परंतू या टर्म च्या सत्तेशेवटी असल्यावर परिस्थितीमध्ये काहीच बदल झालेला दिसणार नाही. याच्यामध्ये मी तुम्हाला वस्तुस्थिती लिहुन देतो की याच्यामध्ये बदल होणार नाही. हे खुप गांर्भीयाने बघावे कारण येथे अधिकाऱ्यांचा आणि कर्मचाऱ्यांचा निष्काळजीपणा असेल किंवा कामचुकारपणा असेल तिथे आपण त्याच्यावर सक्तीने कार्यवाही करण्याच्या संदर्भातील भुमिका घेतली तरी आम्ही आपल्या त्या भुमिकेचं समर्थन करू. परंतू ही परिस्थिती बदलवण खुप गरजेच आहे. पुढच्या निवडणुकीला काय स्थिती असेल काय उभे राहतील कोण उभे राहतील कोण तो भाग वेगळा आहे. परंतू शेवटी आज या सभागृहातील सर्व सदस्यांना या जळगांव शहरातील जनतेने निवडुन दिल आहे. त्यांच दायित्व आहे की या परिस्थितीला बदलवण्याच काम त्यांनी करायला पाहीजे. आज आपण बघतो की त्या डि-मार्ट च्या रस्त्याची काय परिस्थिती आहे. मी नियोजन मंडळाच्या मिटींगमध्ये सुध्दा बोललो या विषयावर कारण तो तेवढा भाग जो आहे तो नॅशनल हायवे ऑथरीटीकडे वर्ग झालेला आहे. मी जिल्हाधिकारी महोदयांनाही विनंती केली. पालकमंत्री महोदयांनाही विनंती केली. कारण की त्याला बघा नॅशनल हायवे ऑथरीटी धुळयाकडे तो विषय आहे. मागच्या नियोजन मंडळाच्या मिटींगमध्ये पालकमंत्री

महोदयांनी आश्वास्त केले होते की या संदर्भात नॅशनल हायवे ऑथरीटीच्या संदर्भातील बैठक लावुन मला तेच कळल नाही जळगांव पासुन ते मनमाड, चांदवडपर्यंतचा रस्ता विकसित झाला. जवळपास ९० ते ९५ टक्क्यांपर्यंत त्या रस्त्याच काम पुर्ण झाले आहे आणि नेमकी अशी काय अडचण आली की त्या ४ किलोमिटरचा शहरी हद्दीतील रस्ता तो त्या नियोजनातुन का वगळयात आला ते गौडबंगाल आहे. तरी सुध्दा मी जिल्हाधिकाऱ्यांना विनंती केली. मा. जिल्हाधिकारी महोदय सकारात्मक होते. त्यामुळे मी व्यक्तिश: पाठपुरवा केला त्या विषयाचा परंतू जर कुठेतरी त्या विषयाच काम होत नसेल तर मनपाला त्यास्तरावर त्याविषयी तो विचार करावा लागेल. आपण फक्त तो हायवे ऑथरीटीकडे आहे म्हणुन आपण त्याच्याकडे दुर्लक्ष करू अस होवून चालणार नाही कारण तो प्रमुख मार्ग आहे आपल्या शहराचा म्हणजे तो जिल्हा मार्ग होता आता तो राज्य मार्ग झाला आणि आता तो नॅशनल हायवे झाला. परंतू आज त्या रस्त्याची अवस्था आज संपुर्ण शहरातील रस्त्यांपेक्षा अत्यंत वाईट परिस्थिती त्या रस्त्याची आहे. तर कुठेतरी याबाबतीत प्रशासनाने गिरगांवकर साहेब आपण स्वत: जिल्हाधिकारी महोदयांची भेट घेवुन त्यासंदर्भात नॅशनल हायवे ऑथरीटीशी पत्रव्यवहार करावा किंवा त्यांची भेट घेवुन यासंदर्भात काही अडचणी असतील अन्यथा महानगरपालिका आपल्या स्तरावर याच्याबाबतीत काय निर्णय घेवु शकते. तश्या पध्दतीचा निर्णय घेणे सुध्दा गरजेच आहे. त्याच पध्दतीचा आता जिल्हा परिषद चौकातील विषय आहे. PWD ला मी सांगीतले होते की पावसाळा सुरू होण्याच्यापुर्वी टॉवर पासुन ते जो स्लिपरोड जो पुलाच्या बाजुचा आहे आणि जिल्हा परिषद कडे जाणारा रस्ता आणि रेल्वे स्टेशनकडे येणारा रस्ता तो PWD ने करण्याच्या संदर्भात मान्यही केलेल होते आणि त्यांनी तशापध्दतीचे निर्देशही दिले होते. कमीतकमी तो पावसाळयापुर्वी रस्ता झाला असता. आज संपुर्ण शहरातील मध्यवर्ती भाग आहे. एकीकडे जिल्हा परिषद आहे, एकीकडे शास्त्री टॉवर आहे, एकीकडे मार्केट परिसर आहे, एकीकडे रेल्वे स्टेशनची बॉर्डर आहे . हजारोंच्या संख्येने लोक जातात तिथुन आणि त्या रस्त्याची अवस्था तुम्ही पाहाल तर सामान्य माणुस सुध्दा तिथे चालु शकत नाही अशी त्या रस्त्याची परिस्थिती आहे. कुठेतरी प्रशासनाने याबाबतीत विचार करून गांभींयाने कुठेतरी निर्णय घेणे हे गरजेचे आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आता हे जे चालु आहे. आता ठिकठिकाणी खड्डे खोदले जातात. आता गिरणाटाकीकडे खड्डे खोदलेले आहेत. आता पावसाळ्याचे दिवस आहेत पावसाळ्यात खड्डे खोदलेले आहेत ते कळत नाही. ते आता ४२ कोटींच्या विषयांमध्ये रस्त्यांचे ४२ कोटींचे रस्त्यांचे विषय मंजुर झाले होते ते अजुन झालेले नाहीयेत. म्हणजे काय चाललय प्रशासनाचे मॅडम तुमच्याकडुन अपेक्षा जास्त वाढलेल्या आहेत आता आपण लवकरात लवकर जे काही आहे ते प्रशासनाला सुचना करून मार्गी लावावे. जस आता अमृतच आहे तर त्यांना सुचना करा की ज्या ठिकाणी असेल त्या एकाच ठिकाणी सुरूवात करा. एक रस्ता जर केला तर एका रस्त्याच पुर्ण काम करा. हे अर्धे इकडे केले जाते, अर्धे तिकडे केले जाते. ते पुर्ण काम कोणतच होत नाहीये. तर अस न होता जर ती व्यवस्थित रचना जर लावली तर ते काम पुर्ण होईल आणि नागरीकांना पण त्रास होणार नाही आणि आम्हांलापण त्रास होणार नाही.

**ॲड. शुचिता हाडा :-** महापौर महोदया , आपल्या प्रत्येक कामाच एक थर्ड पार्टी ईन्स्पेक्शन व्हायला पाहीजे होत. अमृतच्या कामाच थर्ड पार्टी ईन्स्पेक्शन कोण करतय .

**मा.आयुक्त :-** MGP करतय.

**ॲड. शुचिता हाडा :-** MGP तर आपल्या सोबतच काम करणारी संस्था आहे. तर ती मग आता थर्ड पार्टी ईन्स्पेक्शन कशी काय करू शकणार आहे.

**मा.आयुक्त :-** MGP मार्फतच करण्यात येत आहेत ती काम आणि त्यांच्यकडुनच करू.

**ॲड. शुचिता हाडा :-** MGP च्या मार्फतच आपण करतो आहे पण

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई B & C पण आहे

**ॲड. शुचिता हाडा :-** पण नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणुन आपण त्यांच्यामार्फतच ते करतोय .

**ॲड. शुचिता हाडा :-** पण नितीनभाऊ MGP कडुन करू शकतो का आपण

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही ताई काहीतरी शासनाकडुन या संस्थांचे काम शासनाच्या निगराणीखालीच काम करत असते आणि या शासनाच्याच संस्था आहेत MGP थर्ड पार्टी ईन्स्पेक्शन केव्हा होईल की एखादा मक्तेदार आपल्या महानगरपालिकेच्या सुपरव्हिजनखाली काम करतोय तर तिच ऑडीट थर्ड पार्टी करेल. इकडे

महानगरपालिका काम करून घेते आणि MGP त्याच्यावर सुपरव्हिजन करतेय. म्हणजे MGP च थर्ड पार्टी ईन्स्पेक्शन आहे.

**ॲड. शुचिता हाडा :-** पण काय होत आहे नितीनभाऊ तुम्हाला सुध्दा ते मान्य होईल की , आता योगेश बोरोले इंजिनियर राहुन गेले याच्यामध्ये काय होते आहे आयुक्त महोदया , महापौरताई की या याच्यामध्ये सगळयात जास्त आपल्या सगळ्या लोकप्रतिनिधींना जी शिव्यांची लाखोली वाहीली जाते अमृतच्या कामावर, अमृतच्या कामांमध्ये होणाऱ्या चुका, अमृतच्या कामांमध्ये होणारा डिले ते खुप खेदाने आयुक्त महोदया येथे मी हे नमुद करते आहे की आपल्याकडे अनेक सिनियर इंजिनियर असतांना सुध्दा म्हणजे आता आपले रिटायर्ड झालेले लुले साहेब , भोसले साहेब , संजय पाटील , संजय नेमाडे साहेब खुप नांव सांगता येतील कुणालाच का दिली नाही ही जबाबदारी , एका नवख्या , ज्युनियर माणसावर ही जबाबदारी का टाकुन दिली ? या सगळयांचा परिणाम काय होतोय नितीनभाऊ की नागरीकांच्या रोषाला सामोरे कोणाला जाव लागतं आपल्याला , वर्षभरात आता ईलेक्शन्स येणार आहे. आपल्याला सगळयांनाच हे फेस करायच आहे. म्हणजे प्रशासनाने चुका करायच्या , प्रशासनाने गलथाण कारभार करायचा आणि सगळ्या कारणांचे खापर कोणावर फोडल जाणार आहे तर ते नगरसेवकांवर हे जे मुद्दे आहेत आयुक्त महोदया हे कुठेतरी थांबल पाहीजे हा खुप गंभीर मुद्दा मी मांडलेला आहे याच्यामध्ये आपण व्यक्तिश: लक्ष घाला. जबाबदारी देतांना आपण जबाबदारी पेलु शकणारी व्यक्ती आपण निवडा आपल्या महापालिकेतील आणि जिथे सिनियर माणस आहेत तर तिथे सिनियर माणसांना ते काम द्या. खुप महत्वाचा आहे हा विषय याच्याकडे आपण वैयक्तिक लक्ष द्या अशी आशा आहे आपल्याकडुन

**श्री.अनंत जोशी :-** मा.आयुक्त महोदय , महापौरताई दोन तिन महिने झालेले आहे काही अमृतचे काम व्हायला तर माझी विनंती आहे आपण जैन वाल्यांशी बोला आणि जे कॉन्ट्रक्टर आहेत त्यांच्याशी बोला आणि या दोन तिन महिन्यांमध्ये अमृतचे जे काही काम असतील. नळ जोडणी बाकी , नळ कनेक्शन बाकी आहे , पाईपलाईन टाकणे बाकी आहे, व्हॉल टाकणे बाकी आहे , टेस्टींग आणि म्हणजे सगळच काम बाकी आहे. मी आपल्या अधिकाऱ्यांना काय बोललो होतो की आता नविन रस्त्यांचे काम सुरू आहेत. तयार केलेले रस्ते फोडत होते मी बोललो की तुम्ही तयार केलेले रस्ते फोडले तर मी तुम्हाला फोडेल , तर आपल्या अधिकाऱ्यांनी त्याचा सोईस्कर अर्थ काढला आहे तर त्यांनी रस्तेच केले नाही म्हणजे उद्या उठुन त्यांना मला बोलायचीच गरज पडणार नाही. आजही माझ ईतके तमाशे केल्यानंतर सुध्दा मी त्यांच्या बरोबर फिरल्यानंतर सुध्दा त्यांनी केले नाही. आजही ते म्हणतात की त्याच फ्रॅकीग बाकी आहे , टेस्टिंग बाकी आहे हे आहे. मागील चार महिने झाले असतील नितीनभाऊ वर्कऑर्डर देवुन चार महिने झालेले आहेत म्हणजे नितीनभाऊंनी सांगीतल्याप्रमाणे मा.पालकमंत्री गुलाबभाऊ यांनी माझ्या प्रभागामध्ये १२ लाख आणि कमीत कमी ८ ते १० कोटी दिलेले आहेत. त्यांनी रस्ते केले नाहीत काँक्रीटीकरणचे आणि तो करू शकत नाही पाच महिने झाले वर्कऑर्डर झालेली आहे आणि काम करू शकत नाहीये निव्वळ गटारींमुळे आणि अमृतमुळे यांच्या गलथाण कारभारामुळे आणि माझी हात जोडुन विनंती आहे की कमीत कमी या तिन महिन्यांमध्ये पावसाळ्यापुर्वी रस्ते करू शकु आणि यामुळे लोकांच्या रोषाला आम्ही सामोरे जाव लागणार नाही.

**ॲड.शुचिता हाडा :-** महापौरताई मी येथे प्रशासनाला सक्त ताकीद देवु ईच्छिते की आता महाराष्ट्रामध्ये भाजपा शिवसेना युतिचे सरकार आलेल आहे आणि जळगांव महापालिकेचा प्रशासनाचा हा जो गलथाण कारभार चाललेला आहे आणि मी आता यांची लेखी तक्रार वरपर्यंत करणार आहे आणि प्रशासनाने तयार राहायला हव याची लेखी तक्रार झाल्यानंतर त्या विषयांना उत्तर देण्यासाठी .

**श्री. रियाज बागवान :-** महापौरताई , पाणीपुरवठा के बारेमे ऐ विषय दो साल से पेंडींग पडा हुवा है. पाणी पुरवठावाले बोलते है की ऐ विषय जेबी वालोके पास है. जेबी वाले बोलते है , पाणी पुरवठावाले करेंगे , ऐ विषय दो साल से पेंडिंग पडा हुवा है. बोरोलेसाहब को पुरा विषय पता है और महापौर मॅडम अभीतक वहापर अमृत की पाईपलाईन नही गिरी है. बोरोले साहब पुरा विषय बताईये.बौध्द वाडे से जो अपना बिल्डींग तरफ वहाँ १०० मकान बाकी है जिनको अभी तक पाईपलाईन कनेक्शनही नही मिला है. मेन पाईपलाईनही नही है. वो लॅण्ड का डिसप्युटेड मॅटर सॉल्व करो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आज सुप्रिम कॉलनीत साधारणत: १८ ते २० हजार पॉप्युलेशन आहे आणि सुप्रिम कॉलनीला १५ लक्ष लिटरची पाण्याची टाकी आहे आणि १५ लक्ष लिटरच सब आहे आणि ते १५ लक्ष लिटर पाणी खाली सबमध्ये घेतल जात आणि १५ लक्ष लिटर पाणी वरच्या टाकीमध्ये घेतल जात. ३० लाख लिटर

पाण्याची रोज उचल होते किती ३० लाख लिटर पाण्याची रोज उचल होते आणि त्याच्यावरून साधारणत: १७ ते १८ हजार लोकसंख्येला पाणीपुरवठा होतो. त्याच कॅल्क्युलेशन आपण कराल तर जवळजवळ हे प्रत्येक व्यक्तीला आपण १३५ लिटर पाणी देण्याच राज्य शासनाच व आपल धोरण आहे. १३५ लिटर पाणी प्रत्येक माणसाला रोज देण्याच्या संदर्भातील निर्णय दिलेला आहे. आता साधारणत: ३० लक्ष लिटर पाण्यामधुन साधारणत: २२ हजार लोकसंख्येला रोज पाणी पुरवठा केला जावु शकतो. ३० लक्ष लिटर पाण्यामधुन २२ हजार लोकसंख्येला नियमित प्रती माणशी १३५ लिटर पाणीपुरवठा हा केला जावु शकतो. परंतू आज परिस्थिती अशी आहे की , मी सकाळीच जे आपले त्या एरियातील नगरसेवक आहेत गणेशभाऊची माहिती घेतली , दुसरे अण्णा भापसे यांचा मुलगा आहे चंदु भापसे त्यांच्याकडुन माहिती घेतली. ३० लक्ष लिटर पाण्याची उचल होवुन दर दिवशी प्रत्येक माणसाला १३५ लिटर पाणी देवु शकतो. परंतू तिथला पाणी पुरवठा आज पाण्याचा सप्लाय केल्यानंतर साधारणत: पाचव्या दिवशी ते सहाव्या दिवशी दुसर रोटेशन मिळते. म्हणजे ३० लक्ष लिटर पाण्यामधुन रोज पाणी देवु शकतो तेवढ्या पॉप्युलेशनला पण तेवढ्या पॉप्युलेशनला पाचव्या ते सहाव्या दिवशी पाणी पुरवठा होतोय. मला सांगा आपण जर अडिचशे कोटी रूपयांचे बांधकाम करून ती योजना राबवली. आता आप्पासाहेब, भारतीताई महापौर होत्या त्यावेळेला सुप्रिम कॉलनीला पाणी पुरवठ्याचा शुभारंभ झाला. आज जवळपास दिड वर्ष झाले त्या गोष्टीला दिड वर्षामध्ये दररोज पाणी देण्याच काम आपल्याकडुन केल जात नाही. जो की तेवढ्या पाण्याची उचल रोज होत आहे. त्याच्यामागील बराचसा असा भाग आहे. सहावा दिवस काय ,सातवा दिवस काय , आठवा दिवस काय पाणीच मिळत नाही.उमराव नगर एक भाग आहे, जमजम नगर म्हणुन एक भाग आहे , त्याच्यानंतर एक प्रेमाबाई शाळेच्या मागचा भाग आहे. त्यांना पाणीच मिळत नाही. असे अनेक भाग आहेत की ज्यांना महानगरपालिकेच पाणीच उपलब्ध होत नाही. वास्तव तिथ एक अस भयानक आहे की संपुर्ण एमआयडीसीला लागुन भाग असल्याकारणाने एमआयडीसीचे नाल्यात केमीकल सोडलेल पाणी आणि त्या भागातील जर कधी नागरीकांनी बोरींगचे पाणी घेण्यासंदर्भातील निर्णय घेतला तर सगळ्या बोरींगला केमिकल युक्त पाणी येते. संमिश्र वस्तीचा भाग आहे सगळा परंतू मी गेल्या चार महिन्यांपासुन त्या विषयावर पाठपुरावा करत आहे. परंतू चार महिन्यांपासुन आजपर्यंत माझे समाधान झालेले नाहीये की त्या भागातील नागरीकांना मी समाधानकारक उत्तर सुध्दा देवु शकत नाहीये. रोज दहा / विस /पंचविस / पन्नास च्या संख्येने लोक माझ्या घरी येतात माझ्याकडे सुप्रिम कॉलनीचे नागरीक सन्मा. सदस्यांकडे सुध्दा रोज येतात की, आमच्याकडील पाणीपुरवठ्याचा विषय कोण मार्गी लावेल. तर नेमक त्याच नियोजन कुठे चुकलेले आहे म्हणजे मुळ जे जॉईन्ट असेल MJP ने केलेल, ते जॉईन्ट चुकीच आहे की ३० लक्ष लिटर पाणी आपण नागरीकांना जे उचल केल्यानंतरही देवु शकत नाही. तर पाणी जात कुठे आहे. म्हणजे सगळ अनवॉन्ट डिस्ट्रीब्युशन आहे. काही भागात सात / आठ तास पाणी मिळतय, काही भागांना अर्धा तास मिळतय, काही भागांना पाणीच मिळत नाहीये. तर याच्या संदर्भात सुध्दा काही विषय असेल तो या सभागृहासमोर स्पष्ट करावा. जेणेकरून त्या भागातील नागरीकांना किती वेळेत त्या भागामध्ये पाणी पुरवठा करू शकु आणि त्याच्यातील त्रुटी काय काय आहेत आणि त्या अडचणींना जबाबदार कोण कोण आहेत. या विषयाची माहिती या संदर्भात मिळावी म्हणजे सभागृहाला तर मात्र बर होईल.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** सुप्रिम कॉलनीतील जो प्राब्लेम आहे आणि तो जो प्रॉब्लेम होता आता आपण पाणी देतो ३० लाख लिटर मात्र ते जे लोक सुप्रिम कॉलनीतील आहेत ते सुरूवातीचे जुने जे कनेक्शन आहेत त्यांचे ते कनेक्शन बंद करायलाच तयार नाहीत. त्याच्याकरीता आपण जे तासाभराच पाणी देतोय तर त्यांनी ते बंद केले पाहीजे तर ते बंद करीत नाहीत याच्याकरीता शेवटच्या माणसापर्यंत पाणीच जात नाही. ज्यावेळेला आपण ते बळजबरी बंद करून पाहीले त्यावेळेला ते पाणी पोहोचते. पण आता ते बंदच करीत नसतील म्हणुन ते पाणी समोरच्या व्यक्तिला पोहोचत नाही हा विषय आहे त्या ठिकाणी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्याला काय करता येईल.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** भाऊ त्याला आपल्याला एकतर व्हॉल्व टाकुन बंद कराव लागेल तेवढच करू शकतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कस आहे की याला पाणीच मिळत नाहीये तर त्या माणसाने कुठे जायच. कारण शेवटी काही तरी कृती करावी लागेल तर ती प्रशासनालाच करावी लागेल ना.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** भाऊ त्याच्यामध्ये आपण काय केले आहे की टाकीवर जे आपण छोटे छोटे

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता मला सांगा की किती महिन्यांपासुन त्याचा पाठपुरावा करीत आहे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** जवळपास दोन महिन्यांपासुन करत आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी जवळपास चार महिन्यांपासुन या विषयी पाठपुरावा करीत आहे. कारण काय आहे की यांच्याशी बोलतांना मला मोबाईलचा स्पिकर फोन चालु ठेवावा लागतो कारण नागरीक माझ्यासमोर बसलेले असतात त्यांना ऐकवुन द्याव लागत कारण त्यांचा विश्वास आता आमच्यावरुनही उडत चाललेला आहे. प्रत्येक वेळेला आपण सांगतो अस होणार नाही , तस होणार आहे. पाईपलाईनचे बदल होणार आहे मग तुम्हाला पाणी मिळेल आणि ते परत १५ दिवसांनंतर येतात आणि मग त्यांना सगळ्या गोष्टी हॅन्डसफ्री वर ऐकुन द्याव्या लागतात. परंतू या सगळयांचा खटाटोप केल्यानंतरही एक रिझल्ट मिळत नाही तर उपयोग काय आहे. म्हणजे ही चर्चा नुसती फक्त ऑनपेपर असेल तर या चर्चेला काही अर्थच राहणार नाही. हे रिजल्टच्या बाबतीत काय धोरण आहे आपल

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** भाऊ आपण जे तयार करतोय व्हॉल्व छोटे छोटे तर ते टाकल्यानंतर पाण्याचा काही प्रॉब्लेम राहणार नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हे सगळे किती दिवसांत होवु शकतात.

**श्री.सचिन पाटील :-** भाऊ शहर अभियंते बोलुन चुकले आहेत आता त्यांनी योगेश बोरोलेंनी सांगावे हे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी तेच म्हणतोय ना कुठपर्यंत होईल.

**ॲड.शुचिता हाडा :-** याच कस आहे नितीनभाऊ मी आत्ता जस बोलली की हे जबाबदाऱ्यांच प्रेशर असत तर यांच्यावरील जबाबदाऱ्या कमी कराव्यात ही वस्तुस्थिती आहे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** नाही, नाही ताई हे त्या त्या भागातील जे इंजिनियर आहेत ना ते पाहतात तर मी स्वत: पाहात नाहीये ते काम कोणतेही असो तो इंजिनियरच पाहतो त्या भागातील.

**श्री.नितीन बरडे :-** तो इंजिनियर काहीच पाहत नाही हे लक्षात घ्या. तुम्ही खोट नका सांगु .

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** भाऊ  नाही नाही खोट नाही सांगत आहे.

**श्री.नितीन बरडे :-** नाही, नाही खोट नाही आहे त्या भागाचा इंजिनियर पाहतो ना मी सांगतोय ऐकुन घ्या तुम्ही.

**श्री. एम.जी.गिरगांवकर ,शहर अभियंता :-** मा.महापौर,सन्मा. सभागृह, पाणी पुरवठयाचे अमृत योजनेचे काम चालु आहे तर त्या अनुषंगाने सुप्रिम कॉलनीचा जो विषय आहे. मी तेथे स्वत: भेट दिली होती. सुप्रिम कॉलनीच्या दोन टाक्या तेथे ज्या आहेत त्यामधील एक जुनी होती व एक जी आहे ती  उंचावर आहे. ते अजुन ३ ते ५ किलोमिटर लांब आहे. आणि तो ग्रिन झोन मध्ये आहे. त्या अनुषंगाने ज्या अडचणी येत असतील पाणी कमी येत असेल तर त्या ठिकाणी मोठी पाईपलाईन टाकुन त्या ठिकाणी पाणी पुरविण्यात येईल. व्हॉल्वचा काही खर्च करून तर पण ते जर होत नसेल तर पाईपलाईन टाकुन ते करण्यात येईल आणि तेथील जे अभियंत आहेत त्यांना मी तसे सुचित करतो. जरी नागरीक तोट्या लावत नसतील तर आपण करू तरी पण तेथील तो भाग आहे तो उंचावर आहे आणि तेथुन जो नाला जातो आणि त्यामुळेही प्रॉब्लेम येतो आणि त्या भागात जी टाकी आहे. उंचावरील जो भाग आहे तर तो परिसर जो आहे जो आता नाल्यापलिकडील नविन भाग विकसित झालेला आहे तर तेथे टाकी बांधण्यासाठी जर जागा दिली तर ते आपण तर पंपींग करून डायरेक्ट तेथुन आपण तेथुन त्या भागाला कव्हर करू. आपण आता अमृतचे जे काम करून घेतोय त्याला दोन तिन महिने लागतील म्हणजे ते उंचावरून न्यायचे आहे त्या नाल्यावरून आपल्याला त्या भागाची पंपीग करून व व्यवस्था करून आणि पाईपलाईन टाकुन आपण त्या ठिकाणी पाण्याचे नियोजन करू आणि सन्मा.सदस्यांनी जे उपस्थित केले होते की आपले ४२ कोटींचे जे  १० रस्ते आहेत. ही वर्कऑर्डर जर पाहीली तर हे जे १० रस्ते होते तर त्या अनुषंगाने १० रस्त्यांची पाहणी केलेली आहे आणि १० रस्ते जे आहेत तर त्या रस्त्यांमध्ये काही अडचणी होत्या आता जस यांनी सांगीतले की ते क्लिअर करत जा तर काही रस्त्यांवरच अतिक्रमण क्लिअर केलेल आहे आणि याच्यामधील चार रस्ते याच्यामध्ये अमृतच कुठलही कनेक्शन दिलेले नाहीये. त्यामुळे त्याठिकाणी अमृतची पाईपलाईन नाही आणि कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांनाही कळविलेले आहे. हे चार रस्त्यामध्ये जिल्हा परिषद ते स्मशान भुमिपर्यंतचा रस्ता , निमखेडी शिवार पोलिस स्टेशनचा रस्ता , दुध फेडरेशन मुख्य रस्ता ते सिटी कॉलनीपर्यंचा रस्ता आणि कालंकामाता मंदिर ते जुना खेडी रोड पर्यंतचा रस्ता हे रोड अजुन बाकी आहेत आणि बांधकाम विभागाला पण सांगीतले आहे की या व्यतिरीक्त जे काम असतील तर पावसाळ्यामध्ये सुध्दा ते चालु ठेवावे. राहीलेले सहा रस्ते जे आहेत  दहा पैकी तर ते अजुन पुढच्या आठवडयापर्यंत क्लिअर करून देणार आहेत आणि उर्वरित जे आहेत म्हणजे १० रस्ते जे आहेत ते पुर्ण करून

देणार आहेत. अमृत अहवाल आल्याशिवाय बांधकाम विभागाच अस म्हणण आहे की जेणेकरून अमृतचा अहवाल आल्याशिवाय आम्हाला काम करता येणार नाही आणि झोन वाईज कनेक्शन देण्याकरीता ज्या अडचणी होत्या त्या मध्ये काही ठिकाणी अपार्टमेंटमध्ये ६ फ्लॅट आहेत , ८ फ्लॅट आहेत. तर त्या ठिकाणी करता येत नाहीत तर काही ठिकाणी टाकी बांधता येत नाही. त्याठिकाणी कनेक्शन देण्याच्या संदर्भात विषय निर्णया अभावी प्रलंबित पडला आहे. तर तो विषय निकाली काढण्यासाठी असा निर्णय घेतलेला आहे की , ६ असतील ,८ असतील किंवा २५ असतील तर आपण त्यांना मेन लाईन वरुन त्यांनी फिटींग चार्ज मंजुर करावा. त्याचा आढावा घेऊन पाईपलाईन डिटेल्स घेऊन त्यांना आपण त्यांना रितसर कनेक्शन द्यायच खाली. जे स्लम आहे त्या स्लम मध्ये लोकांना २ इंची लाईन, ३ इंची लाईन, ४ इंची लाईन जोडुन द्यायचे. पण ज्या भागात आपण देऊ शकत नाही. त्यांना लोकसंख्याचे प्रमाणाने मुख्यलाईन वरुन लाईन त्यांच्या घरापर्यंत द्यायची काही अडचण नाही. ती पण कुठली आता अमृतचे ७० ते टक्के काम पुर्ण झालेले आहे. तसेच रस्त्यांचे काम पुर्ण झालेले आहे. १५० किलोमिटर ची पाईपलाईन टाकुन झालेली आहे. तर निश्चितपणे आपल्या त्या भागामध्ये आता हे काम पुर्ण करणे अपेक्षित आहे. तर आता प्रामुख्याने आता तिथे बोरोले इंजिनियर होते तसेच ज्या काही अडचणी असतील त्याकरीता मी त्यांच्या सोबत सर्व स्थळ पाहणी केलेली आहे आणि ते सर्व लोकांना मी कामाला लावले आहेत. तर आपल्या अमृतच्या सर्व जोडणी झाल्यापासुन जसे आता खोटे नगर आहे , पिंप्राळा आहे या भागामध्ये जवळपास १५ दिवसांपासुन पुर्ण म्हणजे कामाची पाहणी चालु आहे जिथे पाणी पुरवठा चालु आहे असा टप्प्या टप्प्याने करत आहोत आणि रस्त्यांचे पण कुठले काम चालु आहे आणि आता साधारणपणे ऑक्टोंबर पर्यंत अमृतचे संपुर्ण काम करून घेण्याचे मी निश्चित केलेले आहे आणि रस्त्यांच्या बाबतीमध्ये ज्या अडचणी आहेत तर त्या वेळेवर त्या अनुषंगाने सांगु ईच्छितो की मंत्रालयात पाठविलेले आहे तर मंत्रालयातुन मंजुरी मिळाल्यानंतर ॲग्रेसिव्ह झाले तर २ लाख ,५ लाख , १० लाख यांची जी अंदाजपत्रक असतात त्याच्यासाठी आपल्याला खुप खेटे घालावे लागतात तसेच आपण तसे ईस्टिमेट करू तर करोडे रूपये डिपीडीसी कडुन मिळत असतात तर त्या निधीचा अपव्यव होणार नाही याबाबत मी स्वत: लक्ष घातलेले आहे आणि तर आमच्याकडे मागच्या १५ दिवसांमध्ये जेवढे मागणी प्रस्ताव डिपीडीसीचे असतील किंवा शासनाचे असतील. तर तेवढे म्हणजे याच्याविषयी शासनाचे निर्णय जे असतील तर याच्यात सांगीतल्याप्रमाणे सिमेंट रोडाचे जे ईस्टिमेट दिलेले आहे त्याची प्रक्रीया झालेली आहे आणि त्याच्या निविदा प्रक्रीया आपण लवकरात लवकर काढण्याचा प्रयत्न आपण काढुन दोन दिवसामध्ये, तिन दिवसांमध्ये MJP ची मान्यता झाल्यानंतर मॅडम आपण ते लगेच काढु त्यात काही अडचण नाही आणि दुसरी गोष्ट अशी की जे प्रस्ताव आहेत म्हणजे ज्यात क्युरी आहेत. ते ईस्टिमेट तर काढण्यात येतील आणि जे रस्त्यांचे ईस्टिमेट झालेले नसतील तर ते ईस्टिमेट नक्की करून घेईल आणि आता मॅडम याच्यामध्ये जे मोठे म्हणजे १ कोटी १.५० कोटी च्या जवळपास जे मोठे ईस्टिमेट असतील तर ते म्हणजे जे आपल्या अंदाजापेक्षा जे ईस्टिमेट मोठे असतील तसेच ज्याच्यामध्ये डिपीडीसी चा काही भाग असेल तर आता त्याबाबतही कार्यवाही करण्यात येईल. तसेच जे ईस्टिमेट आलेले आहेत ते पुर्ण करणे त्याच्या कामावर पण नियोजन करणं दोन्ही प्रक्रीया आपण करू शकतो. त्यामध्ये आता जे ईस्टिमेट आलेले आहेत आणि मंजुर झालेले आहेत ते निश्चितपणे आपण पुर्ण करण्याचे प्रयत्न करू आणि काही ईस्टिमेट झालेले नसतील तर कृपया डायरेक्ट माझ्याकडे यावे आणि द्यावे आणि निश्चितपणे मी ते करेल. जेणेकरून निश्चितपणे या पावसाळ्याच्या पिरियेड मध्ये जवळपास हे सर्व काम ही पुर्ण निविदाप्रक्रीया पुर्ण करू . प्रामुख्याने डिपीडीसी आणि जे इतर निधी आहेत तर त्याच्याप्रमाणे आपण ते पुर्ण करूया. धन्यवाद .

**श्री.नितीन लढ्ढा :-** बांधायची आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही , नाही भाऊ तुम्ही नविन टाकी बांधायचे म्हणत आहेत ना आता

**श्री.सचिन पाटील :-** आप्पासाहेब

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही आप्पा ती जी आहे ना ती योग्य ठिकाणी नाहीये का

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा ती जी होती ना

**श्री.कैलास सोनवणे :-** भाऊ आपण जेव्हा हा सगळा आराखडा तयार केला असेल तेव्हा ते झाले नाही का म्हणजे आपण टेक्निकली फेल झालो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही टेक्निकली काय होतय आप्पासाहेब , MJP ने ड्रॉईंग तयार केले आहे शहराचे

**श्री. एम.जी.गिरगांवकर ,शहर अभियंता :-** नाही नाही ती जी टाकी केलेली आहे ना ती उंचावर आहे दुसरी गोष्ट ती खुप लांब आहे पाईपलाईनी पासुन म्हणुन पण त्याच्यामध्ये काय आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** साहेब माझा एक छोटासाच प्रश्न आहे की जस तुम्ही आता म्हणत आहेत की उंच भागावर पाणी सप्लाय करण्याच्या दृष्टीकोनातुन ती ग्रिन झोन असल्यामुळे ती डिसकार्ड केली आहे.

**श्री. एम.जी.गिरगांवकर ,शहर अभियंता :-** नाही मला ती ग्रिन झोनमध्ये आहे किंवा नाही हे मला माहिती नाही. पण

**श्री.नितीन लढ्ढा :-** साहेब ती कशामुळे केली योगेश

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** नाही भाऊ आपण ज्यावेळी ती टाकी बनवली ना तिथे तेव्हा तिथे ग्रिन झोन आलेली नव्हती तेव्हा MJP कडेही आलेले नव्हते त्यावेळी त्याच्यानंतर मग ते

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही, नाही कस आहे आज आपण या पाणी पुरवठ्याचा आराखडा हा ६८ चौ. किलोमिटर धरून केला आहे ना पुर्ण शहराचा , मग जर कधी यावेळेला आपण अशा पध्दतीचे संपुर्ण शहराच पॉप्युलेशन २०५० पर्यंत किंवा २०४० पर्यंत असेल अस काही गृहीत धरूनच केले असेल ना.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** हो भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** मग या कुठल्याही योजना अशा तर काही नाहीयेत की आज इतके देतो आहे करून घ्या किंवा उद्या ईतके वाढवुन घ्या. ही सर्व इंटिग्रेटेड योजना होती संपुर्ण शहराची मग याच्यामध्ये त्रुट्या ज्या घडल्या, ज्या कॉलन्या सुटल्या, ज्या वाढीव ईस्टिमेटच्या कामांचा त्रुट्यांचा आपण समावेश केला मग या सगळ्या त्रुट्या राहील्या कशा आणि या त्रुट्या राहील्या तर त्याला जबाबदार कोण , याच जॉईंट तयार करायची जबाबदारी कोणाची होती आणि तिथे माहिती आहे की हा भाग उंचवट्यावर आहे तर तिथे जी टाकी प्रस्तावित केली गेलेली होती ती रद्द झाली तर तिला पर्यायी व्यवस्था का करण्यात आली नाही. कारण शेवटी जी सगळी कारण आहेत. ज्याच्यावर आपण चर्चा करतोय. परंतू या कारणांमुळे जे लोक अॅफेक्टेड होत आहेत. जे शहराच्या महानगरपालिका हद्दीमध्ये राहतात आणि रहिवास करत आहेत आणि २५० कोटींची योजना आहे ज्याचा मोठा गाजावाजा आपण सगळी कडे करतो आहे. परंतू त्या भागातील सामान्य नागरीकांना त्याचा लाभ मिळत नाहीये याला जबाबदार कोण, का की काही तरी चुकीच करा अस आम्ही बॉडी म्हणुन बोललो, मग त्याच्या जबाबदाऱ्या नेमक्या जोपर्यंत निश्चित होत नाही. तोपर्यंत चर्चा तर अशाच होत राहतील म्हणजे याला जो कोणी जबाबदार आहे ते ऑनपेपर यायला पाहीजे ना की याला MJP जबाबदार आहे की याला महानगरपालिका जबाबदार आहे किंवा याला मक्तेदार जबाबदार आहे. म्हणजे अस हे एक दुसऱ्यावर ढकलुन चालणार नाही आणि समस्येच्या मुळापर्यंत तुम्ही जाणार नाही तोपर्यंत ती समस्यांच मांडली जाणार नाही. कारण आता ही परिस्थिती जवळपास ४ महिने उन्हाळ्याचे निघुन गेले त्या नागरीकांचे आता पावसाळ्यात पाण्याची टंचाई त्यांना इतकी जाणवणार नाही. परंतू साधारणत: तिन महिन्यांमध्ये साधारणत: हा विषय मार्गी लागु शकेल का?

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** हो भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे आम्ही आजची तारीख नमुद करतो.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** नाही आम्ही साईटवर जावु ना साहेब आणि आम्ही पाठपुरावा करतोय भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** योगेश मी सातत्याने जवळपास ४ महिन्यापासुन शाळा सुरू होण्याच्या पुर्वी पासुन मी याचा पाठपुरावा करतोय. मी आजची तारीख नोंद करतो, मी आजच्या तिन महिन्यांनंतर पुन्हा या प्रश्नावर चर्चा करेल. तो पर्यंत सुप्रिम कॉलनीचा पाणी पुरवठ्याचा विषय हा संपुर्ण भागात पाणी टाकले गेले पाहीजे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** हो भाऊ

**श्री.कैलास सोनवणे :-** आता साहेब तुम्ही म्हणाले की व्हॉल्व टाकुन रोड पार करून कमी खर्चात करू शकता ना ते काम तुम्ही करा कारण ती व्यवस्था पण पुढे तुम्हाला करावीच लागणार आहे.

**श्री. एम.जी.गिरगांवकर ,शहर अभियंता :-** नाही कारण तिथली जी पाईपलाईन आहे ती नाल्या खाली आहे आणि ती जी टाकी आहे ती आपण लागले तर तिथे जावुन पाहुन घेवु या. तिथे एक जागा आहे त्यांनी जागा दिली तर ठिक आहे. नाही दिली तर पाईपलाईन बायपास करून आपण वरच्या भागात देवु.

**श्री.विक्रम सोनवणे :-** साहेब आपण ती नविन १६ इंची पाईपलाईन टाकली आहे ती कधी सुरू होईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ती सुध्दा अजुन झाली नाहीये दोन महिन्यांपुर्वी टाकलेली आहे.

**श्री.विक्रम सोनवणे :-** साहेब तेवढ बघा बर

**श्री.नितीन लढ्ढा :-** ती सुध्दा चालु झाली नाहीये. योगेश सव्वादोनशेची जी सुप्रिम कॉलनीची पाईपलाईन आहे ती चालु झाली नाही का अजुन

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** नाही काही पाईपलाईन बाकी आहेत भाऊ.

**श्री.विक्रम सोनवणे :-** ती तरी चालु करून द्या मग

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण ती दोन महिन्यांपुर्वी टाकलेली होती.

**श्री.दिलीप पोकळे :-** आता माझा एक विषय आहे मागच्या काही दिवसांपासुन दुध फेडरेशन ते स्टेशन पर्यंतचा जो रस्ता आहे. तर त्यांना आपल्या डिपार्टमेंटने एनओसी द्यावी. त्या ४२ कोटींपैकी दोन रस्ते हे माझ्या प्रभागातील आहेत. ४२ कोटींमध्ये दोन रस्ते माझ्या प्रभागातील आहेत. त्या रस्त्यांची एनओसी पाहीजे आहे. दुसऱ्या रस्त्याची पण करा ना तुम्ही.

**श्री. एम.जी.गिरगांवकर ,शहर अभियंता :-** नाही कारण काय आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** नाही मी माहिती घेतली की आपले जे कंत्राटदार आहेत अमृतचे जे मक्तेदार आहेत ते म्हणतात की एनओसी शिवाय काम होणार नाही म्हणे.

**श्री. एम.जी.गिरगांवकर ,शहर अभियंता :-** नाही तस नाहीये आपल्या विभागातील स्टाफ जे आहेत. तर त्यांना या पध्दतीने सुचना आहेत की पाईपलाईन पुर्ण झाल्यानंतर काम सुरू करावे आणि त्याला वेळ लागेल.

**श्री.दिलीप पोकळे :-** कारण आपला शिवाजी नगर परिसर , शिवाजी नगर उड्डाणपुल तर तो चार वर्ष झाले पुर्णच होत नाही त्या शिवाजी नगरच्या लोकांसाठी काहीच होत नाहीये. म्हणजे शासनाकडुन , लोकांकडुन आदोंलन करून पण होत नाहीये म्हणुन आता तो पुल दहा वर्षातही पुर्ण होईल की नाही लोकांनी ती आशाच सोडुन दिलेली आहे. तुम्ही पाहीले की तुमच्या लक्षात येईल त्या रस्त्यांवर इतके खड्डे आहेत की दुध फेडरेशन ते रेल्वे स्टेशनपर्यंतचा रस्ता

**मा.आयुक्त :-** ते काम जे आहे , मला एक मिनिंट

**श्री.दिलीप पोकळे :-** मला एकच मिनिंट द्या.

**मा.आयुक्त :-** मी गिरगांवकर साहेबांना तशा सुचना दिलेल्या होत्या आणि ताकीद देवुनच त्यांना सांगीतले होते.

**श्री.दिलीप पोकळे :-** त्यांनी एनओसी दिलेली आहे.

**मा.आयुक्त :-** एमजेपी कडे जावुन त्या कामांकडे लक्ष द्या. कारण ते एमजेपीचच काम असल्यामुळे ते इंजिनियरच त्यांना सोल्युशन देवु शकतात. आपले इंजिनियर किंवा एमजेपी वेळ देवु शकत नाही किंवा आपल्या इंजिनियरकडे वेळच नाहीये. म्हणुन आणि कलेक्टर साहेबांकडे , पालकमंत्री साहेबांकडे सुध्दा याची बैठक झाली होती म्हणुन आपण गिरगांवकर साहेबांना जिथे आपले स्पेसिफीक काम प्राब्लेमेटीक म्हणजे आपण जिथे अडकलेलो होतो ते एमजेपीला सॉल करण्यासाठी जाणार होते. त्यानंतर ४२ कोटींचे दहा रस्त्यांच्या एनओसीच ही मी त्यांना सांगीतलेल्या होत्या . त्यानंतर डिपीडिसीचे जे रस्ते होते गिरगांवकर साहेब आता त्या एनओसीच्या आपण मागे लागुया म्हणजे ते रस्ते एक करून आपण कंम्पलीट करून घेवु या. पाईपलाईनचा जो विषय आहे हा स्टेट गर्व्हमेंट कडे अडकलेला असुन तरी सुध्दा आम्ही जैन ईरिगेशनला भेटुन आम्ही त्यांना विनंती केलेली आहे की हा विषय आपला जरी नसला तरी सुध्दा जळगांव शहर आपलच आहे म्हणुन त्याचा सप्लाय सुरू करणेबाबत आम्ही आणि नितीनभाऊंनी विनंती केलेली आहे. ते अमृतच्या पाईपलाईनींमुळे आपल्याला अडचणी येणार आहेत. ९० टक्के ते ९५ टक्के आपल काम झालेले आहे. ज्यावेळी आपण एखादी योजना बंद करून आपण शिफ्ट होतो त्यावेळेस आपल्याला या योजना पुर्णपणे यशस्वीच कराव्या लागणार आहेत.

**श्री.दिलीप पोकळे :-** मॅडम

**मा.आयुक्त :-** एक मिनिंट सर , दुसरा प्रश्न डिले होत का आहे कामाला त्याच कारण अस आहे की ज्या काही ॲडमिस्टेटिव रीफॉर्म्स आपल्याला करायला पाहीजे होते त्या केलेल्या नाहीत. जसजस आपल्याला लक्षात येत. ज्या प्रोसिजर गॅप ज्या आहेत. त्या आपल्या फाईल्स लावतांना , प्लॅन सेंक्शन होतांना त्या विविध गॅप सुध्दा आपण काढत आहोत. त्या विषयी सरांनी सांगीतले कुणाच्या लक्षात नाही आल की ईस्टिमेट करत असतांना

कन्संलटंट ची मदत घेवुन ईस्टिमेट करता येतील का एक टेंडर सिल, टेंडर फॉर्म सिल करता येतील का हे सुध्दा आपण विचार करतोय. हे जे सगळे डिले प्रश्न होताहेत ना याला एकमेव कारण म्हणजे आपल्याकडे कर्मचारी नाहीयेत. कर्मचाऱ्यांचा तुटवडा हे एकमेव कारण आहे. त्याला सुध्दा आपण त्याच्यासाठी बांधकामचे काम करण्यासाठी आपण कंन्सलटंट चा विचार करतोय आणि आपले जे अॅडमिस्ट्रेटिव काम आहेत यासाठी आपण एक टेंडर काढुन त्यातुन काही कर्मचारी घेता येतील का हा एक प्रयत्न करतोय आणि तिसरा एक की आपले जे रिटायर्ड कर्मचारी जे चांगले होते तर त्याचाही आपण ठराव केलेला आहे की आयुक्तांनी निर्णय घ्यावा. परंतू आपली त्यात  एक वाक्यता होत नाही काही ऑब्जेक्शन घेत आहेत. काही हरकती घेत आहेत म्हणुन या मानधनाच्या प्रस्तावावर अजुन अंतिम निर्णय नाही झालेला आहे. या पध्दतीने आपण या सगळयांचा विचार करता पुढील दोन तिन महिन्यांमध्ये या सगळ्या प्रश्नांचा निकाली काढण्याचा प्रयत्न करत आहोत.

**श्री.दिलीप पोकळे :-** मॅडम  माझ्या प्रभागातील चारही विषय त्या पाईपलाईन मुळे थांबलेले आहेत. त्याची एनओसी होवुन गेली आहे . आता डेटा क्लिअर लिहुन गेलेले आहेत तो १५ दिवसात येणार आहे. तर संबंधित मक्तेदाराला सांगुन ४२ कोटींचे याच्यातील काम पावसाळा झाल्यानंतर आपण हे काम केव्हा सुरू करणार आहे. केव्हा सुरू होईल मॅडम ते काम

**मा.आयुक्त :-** एक व्हिजीट करू सर आपण

**श्री. एम.जी.गिरगांवकर ,शहर अभियंता :-** पाहाणी करून घेवु आपण काय करता येईल त्याबद्दल

**श्री.दिलीप पोकळे :-** इतक पाणी झाल आहे ना सर काय सांगु. एनओसी दिली गेली आहे त्या मक्तेदाराला ते काम केव्हा सुरू करतील मला ते सांगा.

**श्री. एम.जी.गिरगांवकर ,शहर अभियंता :-** पाहाणी झाल्यानंतर

**श्री.दिलीप पोकळे :-** एक तर आता पावसाळा आहे म्हणुन लोक थांबलेले आहेत. पावसाळा आहे म्हणुन काम होत नाही म्हणुन आपण थांबाव आणि शिवाजी नगर भागाचे काम जर चालु झाले तर महानगरपालिकेचे नांव होईल.

**श्री. सचिन पाटील :-** महापौरताई , नितीनभाऊ ते आमच्या अपार्टमेंट धारकांचा जो नळ कनेक्शनचा प्रश्न होता तर तो त्यांनी खरोखर चांगल्या प्रकारे सॉल केला आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदन आणि आमच्या भागातील काही जे बारा अपार्टमेंटची जी मागणी आहे ती त्यांनी करून द्यावी ही याठिकाणी मी अपेक्षा करतो.

**श्री. नितीन लढ्ढा :-** आता विषयामध्ये अपार्टमेंट मध्ये ज्यांना रिक्वॉयरमेंट आहे त्यांना आपण कॉमन दोन इंचीचे कनेक्शन देवु त्यांच्या रिक्वायरमेंट नुसार , परंतू दोन इंची कनेक्शनचे दर जे आपण ठरवलेले आहेत. ते खुप अवास्तव असे दर आहे. तर साधारणत: त्याच सुध्दा कॅल्क्युलेशन करून प्रशासनाने एखादा परिपुर्ण प्रस्ताव जो आहे. तो महासभेसमोर सादर करावा कारण निर्णय घ्यावा लागेल. किती आहे त्याचा दर योगेश.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता:-** तिस हजार ते दोन लाख असा फरक आहे.

**श्री. नितीन लढ्ढा :-** तिस हजार ते दोन लाख रूपये वार्षिक आहे. दोन लाख रूपये आहेत. आता जस तुम्ही बोललात की आता समजा २० फ्लॅट असतील तर २० फ्लॅट धारकांना जर कधी इक्वल कॅपेसिटी मध्ये कनेक्शन दिले तर त्याचे ४० हजार रूपये लागतील आणि २ इंचीच कनेक्शन तुम्ही त्यांच्या सम मध्ये दिल तर त्यांना दोन लाख रूपये मोजावे लागतील. तर याच तुलनात्मक कॅल्क्युलेशन करून कुठेतरी त्याच्याबाबतीतले दर जे आहेत. ते विचारपुर्वक त्या ठिकाणीच करावे लागतील. अन्यथा काय होईल की ते दर बघुन पुढे ते २ इंची कनेक्शन ते घेणार नाहीत आणि पुन्हा त्यांचा आग्रह तोच राहील की आम्हाला अर्धा इंची इनडिव्हीजल कनेक्शन द्याव.

**श्री. एम.जी.गिरगांवकर ,शहर अभियंता :-** ज्यांचे दर जास्त आहेत ना आपण त्याच्यावर कुणी विचार करत नाही. आपण त्या फ्लॅटला लावणार आहे. त्यावर आपण उपाय काढणार आहेत. तर आपण समजा की दहा फ्लॅट राहीले तर त्यांना आपण देणार.

**श्री. नितीन लढ्ढा :-** अच्छा म्हणजे समजा दहा फ्लॅट असले तरी आपल्याला त्याच्यामध्ये सुधारणा करावी लागेल.

**श्री. एम.जी.गिरगांवकर ,शहर अभियंता :-** हा जो दर आपण करतोय ना हे डिस्ट्रीब्युशनचे जे विषय असतील तर हे आपल्या इंजिनियर लेव्हल वर निश्चित करून पाणी पुरवठा देणार आहेत. म्हणजे याच्यामुळे त्यांना पाणी कमी मिळेल म्हणुन आम्ही त्यांना जे २५ फ्लॅटला देणार पाणी आता हे केव्हा देणार पाणी जेव्हा पुर्ण प्रक्रीया झाल्यानंतर देवु शकतो.

**श्री. नितीन लढ्ढा :-** साहेब तुमची भुमिका सकारात्मक आहे योग्य आहे. परंतू पुन्हा त्या ठरावाची अंमलबजावणी करतांना असा विषय येईल त्यावेळेला खालचे अधिकारी किंवा कर्मचारी तसेच म्हणेल की येथे देण्यात आलेले २ इंची कनेक्शन मागील झालेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने त्यांना २ लाख रूपयांची आकारणी करणे योग्य राहील. तर तो निर्णय बदलविण्याच्या दृष्टीकोनातुन प्रशासनाला तसा प्रस्ताव द्यावा लागेल आणि ते धोरण बदलवावे लागेल.

**श्री. एम.जी.गिरगांवकर ,शहर अभियंता :-** नाही त्याच्यामध्ये कस आहे की हे धोरण आपण महासभेमध्ये ठरवुन देतो. त्यांना आपण धोरण बदलवितांना त्यांना आपण काय करू की महासभेमध्ये जरी २ इंची कनेक्शन असेल तरी आपण त्यांना जे चार्जेस असतील त्याची आकारणी करू.

**श्री. नितीन लढ्ढा :-** तर तसा प्रस्ताव द्या. तसा प्रस्ताव आल्यानंतर आपण धोरणात्मक निर्णय घेवु.

**मा.आयुक्त :-** आपण तसा प्रस्ताव तयार करू.

**श्री. नितीन लढ्ढा :-** तर तसा प्रस्ताव द्या. तसा प्रस्ताव आल्यानंतर आपण धोरणात्मक निर्णय घेवु. याच्यापुर्वी तुम्ही बघा अनेक आयुक्तांनी निर्णय घेण्याविषयी फ्लॅटच्या स्किम संदर्भात परंतू काय झाल की ते आले आणि गेले. परंतू ते आदेश बऱ्याच अंशी काही त्रुटी राहील्या. अनेक दिवस त्या त्रुटी असल्यामुळे आणि अनेक दिवस जो घोळ चालला ना फ्लॅट स्किमचा तो याच्यामुळेच चालला आणि अनेक नगरसेवकांच्या ओरड आहेत की आमच्या ईथले फ्लॅट सिस्टिमचे कनेक्शन बाकी आहे आणि तिथली काम मंजुर झालेली आहेत. तर जो काही निर्णय घ्यायचा असेल ना तर सर्व ऑन पेपर घ्या जेणेकरून अधिकारी / कर्मचाऱ्यांना याबाबतचा प्रस्ताव सादर करतांना तांत्रिक अडचणी येणार नाहीत.

**श्री. एम.जी.गिरगांवकर ,शहर अभियंता :-** नक्की

**श्री. सचिन पाटील :-** मॅडम आता जस भाऊ आता बोलले की यापुर्वीच्या आयुक्तांनी याबाबत काही तोंडी व काही अस्पष्ट आदेश काढलेले होते , बरोबर आहे ना भाऊ

**श्री. नितीन लढ्ढा :-** हो

**श्री. सचिन पाटील :-** या अमृतच्या अपार्टमेंटच्या कनेक्शनच्या बाबतीत त्या दोन मध्ये तिसर कोणी ॲडीशन होवु नये. तर मी सभागृहासमोर आपल्याला एक विनंती करतोय की हे साहेबांनी जे धोरण ठरवलं आहे की इंन्डीव्हिजल कनेक्शन देता येईल. तर हे कनेक्शन दिले गेले पाहीजे इंन्डीव्हिजल त्या अपार्टमेंटला तर ती सुविधा करावी आणि त्या अपार्टमेंटला सुविधा आहे . तर त्याची कनेक्शन देण्यासाठी संबंधितांना सम परवानगी द्यावी आणि त्याठिकाणी कनेक्शन द्याव. या धोरणावर तरी या सभागृहामध्ये चर्चील्याप्रमाणे आयुक्त आणि सिटी इंजिनियर यांनी कायम राहाव ही आमची एक अपेक्षा आहे आणि ते कनेक्शन नोव्हेंबर महिन्यापर्यंत तिन महिन्यात ते पुर्ण कंम्पलिट करून द्यावे.

**श्री. नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे.

**श्री. सचिन पाटील :-** आणि त्या एरियातील जे रस्ते आहेत तेथील विकास कामांना सुरूवात करावी.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय, पोकळे साहेबांच्या वॉर्डात, माझ्या वॉर्डात किंवा पिंप्राळा हुडको तर हुडकोंच्या संदर्भात तुम्ही अमृतच्या संदर्भात कशी काय उपाययोजना केली आहे. त्या लोकांना कनेक्शन देण्यासाठी, त्याठिकाणी पाईपलाईन झालेल्या आहेत. त्या लोकांना कनेक्शन कसे देणार तुम्ही त्याचे नियोजन केले आहे का आपण

**मा.आयुक्त :-** सर आता स्लम भागातील कनेक्शन च्या बाबत आपला असा एक विचार आहे की आपण सन्मा.सदस्यांना विचारात घेवुन कनेक्शनचे दर विचारात घेवुन त्याच्यामध्ये आपल्याला दर कमी करता येतील त्यासंदर्भात आपण पुढच्या सभेसमोर आपण हा प्रस्ताव मांडु.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** नाही मॅडम आता जी अडचण आपल्याला येत आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई

**मा.महापौर :-** दोन मिनिंट ताई

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई , आता हे जे आपले अधिकारी/ कर्मचारी जे सेवानिवृत्त झालेले आहेत त्यांना परत घेण्याच्या संदर्भात एकमत होत नाहीये. तर हे कस आहे की आता आपले जे पाच व्हॉल्वमन आहेत तर ते पाच व्हॉल्वमन विस वर्षांपासुन काम करत आहेत. तर त्यांना आपण

**मा.आयुक्त :-** मॅडम याच्यामध्ये अस आहे की ते रेकॉर्डवर नाहीयेत म्हणुन त्यांना घेण्यामध्ये त्यामुळे आपल्याला एक तांत्रिक अडचण निर्माण होते म्हणुन सोल्युशन नाहीये कारण ते काम करीत असल्याचा एकही कागद आपल्याकडे नाहीये मॅडम तसेच त्यांची कुठेही सही नाहीये म्हणुन आपल्याला त्या अडचणी येतात आणि आपण एक प्रशासकीय मार्ग सुचविलेला आहे तो जर वर्कआऊट झाला तर आपण त्यांना नियुक्त्या द्यायला अडचण नाही आणि आपण सोल्युएशन काढु त्यावर.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** कस आहे मॅडम ते लोक आपल्याला विस वर्षांपासुन सेवा देताहेत .

**मा.आयुक्त :-** बरोबर आहे मॅडम

**सौ.उज्वला बेंडाळे :-** याबाबत विचार करण्यात यावा. कारण आपण दुसऱ्यांना देतोय तर यांना काय अडचण आहे.

**मा.आयुक्त :-** पुढचा विषय घेवुयात.

**मा.महापौर :-** सदस्यांच्या ज्या भावना आहेत त्या सर्व अधिकारी वर्गाने जाणुन घ्याव्यात आणि त्यापध्दतीने काम कराव जर आपल्याला शुक्रवारपर्यंत कामकाज करतांना अडचणी येत असतील तर शनिवार आणि रविवार तिन तिन टेबल लाईनशिर लावा पण त्या फाईल्स पेडींग आहे तर त्यांचा तिथल्या तिथे निपटारा करा. आता तिथे ती  आठ आठ दिवस फाईल एकाच टेबल राहते. आता त्यानंतर दुसरा विषय असा आहे की मी खड्डयांसाठी भर करण्यासाठी , खड्डे बुजविण्यासाठी जवळपास दोन महिन्यांपासुन पावसाळयाच्या अगोदर त्याची टेंडर प्रोसेस करा त्यांना मुरुम घ्यायचा की कच घ्यायचा त्याच्यासाठी गिट्टी घ्यायची. त्याच्यामध्ये आपण त्याची प्रोविजन करा आपण सगळया चारही प्रभागांमध्ये याचे ईस्टिमेट मागविले होते. पण ईस्टिमेट आतापर्यंत आलेच नाहीत. एखाद ईस्टिमेट बद्दल विचारल तर ते म्हणतात की मॅडम ईस्टिमेट तयार आहे. पण पुढची प्रोसिजर काय आहे ती होत नाही. दुसरा असा विषय आहे की डि-मार्ट पासुनचा जो रस्ता आहे ईच्छादेवी पर्यंतचा तो माझ्या प्रभागामध्ये येतो. अक्षरश: आज महापालिकेत येतांना म्हणजे महासभेला येतांना त्याठिकाणी माझी गाडी एका रिक्षावाल्याने थांबवली आणि त्यावेळेस त्याने तिथे अक्षरश: संताप व्यक्त केला की आम्हाला लाज वाटते जळगांवमध्ये राहायला तुम्ही कसे राहतात तुम्हालाही लाज वाटली पाहीजे. सगळया बाजुला जिथे गाडी थांबली तिथे आजुबाजुला लोक होते. मला अक्षरश: शरमेने मान खाली घालावी लागली. तिथे चुक नागरीकांची नाहीये. चुक सन्मा.सदस्यांची नाहीये. आपण जो विलंब करतो जोपर्यंत फाईलचा निपटारा होत नाही तोपर्यंत काम प्रलंबित राहतात.मागे मंजुर रस्त्यांकरीता डिपीडीसीचा पैसा जो आलेला होता त्याचे काम आपण अमृतच्या कामांमुळे काम करू शकलो नव्हतो. आताही तिच परिस्थिती आहे की ४२ कोटींची १० रस्त्यांची कामे ते १० रस्ते अजुनही पुर्ण झालेले नाहीत. चार महिने आता पावसाळा आहे. आपल्या सगळयांना हा विषय वाटतो पण या चार महिन्यांमध्ये आपले अमृतचे काम असतील हे सगळे क्लिअर करायचे. त्यानंतर आता डागडुजी संदर्भात आपण काय निर्णय घ्यायचा आहे ते सुध्दा येथे क्लिअर करायचे आहे. आता आपले सगळे विषय क्लिअर झाल्यानंतर संपुर्ण जळगांव शहरामध्ये सध्या डागडुजी करणे गरजेचे आहे आणि नाहीतर सर्व आयुक्त असेल , महापौर असेल किंवा सन्मा.नगरसेवक असतील यांच्या नावानिशी आम्हाला शिव्याशाप खाव्या लागतात. तुम्हाला कोणीच विचारत नाही तुमच नांव कुठेही येत नाही. तुमच्यामुळे आम्हाला शिव्या खाव्या लागतात म्हणुन आपल्याला नम्रपणे विनंती आहे. जर पावसाळयांनतर ज्यांची वर्कऑर्डर बाकी आहे. त्याची पुर्ण प्रोसेस करा. त्यांची वर्कऑर्डर देण्याच्या संदर्भामध्ये पावसाळयामध्ये पुर्ण करा. तेवढा वेळ तुमच्याकडे आहे. अमृतचे काम पावसाळयामध्ये पुर्ण करा. जर पावसाळयानंतर कुठलेच एक्सक्युज ऐकल जाणार नाही आणि जर यानंतर काही काम पेंडींग राहीले तर आयुक्त मॅडमपुढे सर्व सन्मा. सदस्य आहेत. यामध्ये ज्यांनी कामामध्ये कुठलीही कुचराई केली असेल तर त्यांचेवर जबाबदारी निश्चित करावी अस मी आयुक्त मॅडमांना सर्व सदस्यांच्या वतीने मी आज येथे सांगु ईच्छिते. पावसाळयानंतर काम झाली पाहीजे. आपल्याकडे कालावधी कमी आहे याची आयुक्त मॅडम आणि सर्व जे असतील अधिकारी / कर्मचारी त्यांनी नोंद घ्यावी. पुढील विषयाला सुरूवात करावी.

**श्री.अनंत जोशी :-** महापौरताई ह्या रस्त्यांच्या व अमृतच्या बाबतीत फक्त आपल्याला एक विनंती आहे की या पावसाळ्यापुर्वी कारण की आपल्याकडे आता कालावधी कमी आहे याच्यानंतर तिन महिन्यांनंतर जे आपल्याला आता आपण काहीतरी ठोस निर्णय याबाबत घेतला पाहीजे जी शहरात लाजेने मान खाली घालावी लागते ना खुप लाजीरवाणे आहे. तिन महिने खुप होता जर याच्यात सुधारणा नाही झाली तर तिन महिन्यानंतरची भुमिका आपण ठरवली पाहीजे महापौर म्हणुन आम्ही सगळे आपल्या सोबत आहोत.

**मा.महापौर :-** तिन महिन्यांनतर जबाबदारी निश्चित केली जाईल आणि यामध्ये कुठल्याही कामांबाबत काम पेंडींग रहायला नको. कामांच्या बाबतीत आता सगळयांनी म्हणजे सगळे काम जे आहे याबाबत सगळ्या अधिकाऱ्यांना आता जवळजवळ क्लिअर झाल असेल आणि दुसरा असा विषय की तो जो रोड आहे डि-मार्ट ते ईच्छादेवी त्याचे काम लवकरात लवकर सुरू करा. त्याठिकाणी जी परवाची घटना जी घडली आहे. त्यामुळे तेव्हापासुन माझ्या घरावर मोर्चेचे मोर्चे येत आहेत. तर तिथे आमच्यावर आरोप होतात. महापौर असुन सुध्दा मी काम करू शकत नाही असे माझ्यावर वेगवेगळे आक्षेप घेतले जातात. त्यामुळे मी आपल्या सगळयांना नम्र विनंती करते विशिष्ट म्हणजे मी आपले हातपाय पडते पण जळगांव शहराच्या नागरीकांना वेठीस धरु नका. अक्षरश: तो जो रिक्षावाला जो गृहस्थ होता त्याचा वडिलांचा हात फ्रक्चर झाला त्यांच्या बॉलला काहीतरी झाले तर ते हॉस्पीटीलाईज झाले आणि हात निकामी झाला आहे. आपल्याही वडीलांचे झाले असते तर साहजिकच आपल्याला संताप होणार आहे. तर त्या माणसाने इतका संताप माझ्यावर सगळयांसमोर व्यक्त केला मी एकही शब्द न बोलता फक्त मान खाली घातली. तर आता मी नाराज आहे आपले प्रशासकीय अधिकारी व इतर सगळयांवर तुम्हाला फक्त ईस्टिमेट तयार करायला सांगतीले तरी १५ ते २० दिवस जातात. मी तुम्हाला साधे टेंडर काढायला सांगते तरी त्याला दोन-दोन तिन-तिन महिने लागतात ही कोणती प्रोसेस आहे आम्हालाही समजवुन सांगा. मॅडम तुम्ही यांना सगळयांना एक टेबल शनिवार आणि रविवार लावुन द्या आणि यांच्या फाईली फिरल्या पाहीजे.या पध्दतीने काहीतरी प्रोविजन करा. चला पुढचा विषय घेण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** भाऊ आपण ते १० नंबरच्या विषयावर काहीतरी बोलणार होते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. १० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**नगरसचिव विषय क्रं. ११ :-**

**ॲड. शुचिता हाडा :-** महापौरताई

**श्री.विशाल त्रिपाठी :-** महापौरताई विषय क्रं.१० आणि ११ चे जे आहे ना ते ९ मध्ये आलेले आहे ते विषय

**ॲड. शुचिता हाडा :-** महापौरताई तुमच्या लक्षात आणुन देते की विषय क्रं. ९ मधील अ.क्रं. ७१,७२,७३,७४,७५

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ७६ पण आहे ताई

**ॲड. शुचिता हाडा :-** आणि ७६ मध्ये ११ नंबरचा विषय आहे यामध्ये आपण मेहरूणचं उद्यान विकसित करण्याच म्हंटलेल आहे तरी हे आपण विषय क्रं. ९ मध्ये आपण ऑलरेडी घेतलेले आहे. तर पुन्हा पुन्हा ही पुनरावृत्ती का आणि अजुन एका विषयाबाबत अवगत करते ताई विषय क्रं. १० मध्ये आपण एक संदर्भ घेतलेला आहे. मेहरूण परिसरातील ब्रिटीशकालीन पुरातन असलेली मंदिर बांधणे. म्हणजे मला कळले नाही तर ब्रिटीशकालीन शब्द का दिला आहे. मला तो संयुक्तिक वाटत नाही म्हणजे मला हे कळत नाही की ब्रिटीशांच आणि या मंदिराचा काय संबंध आहे. मला सांगा हे एक मंदिर आहे ते पुरातन आहे हे मान्य आहे. परंतू ते ब्रिटींशानी मंदिरे बांधलेले नाहीत , त्यांचे संवर्धन केले नाही किंवा काहीच केलेले नाहीये. तर तो शब्द एक वगळावा अस मला वाटत आणि अजुन एक विचारावस वाटत महापौरताई की, साधारण चारशे फुटाच बांधकाम आहे त्याच्यावर आपण अडीच करोड रूपये खर्च करायच्या संदर्भात आपण येथे नमुद केलेले आहे. आपल्या जळगांव शहरामध्ये अनेक जुने मंदिर आहेत. तर जसे आपलं राम मंदिर आहे , जुन्या जळगांवातील विठ्ठल मंदिर आहे, जुन्या जळगांवातील बालाजी मंदिर तर याकडे सुध्दा आपण लक्ष दिलं पाहीजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई याच्यामध्ये अस आहे की , आपण याच्याबाबतीतला प्रस्ताव आणि एक पत्रव्यवहार शासनाकडे केलेला होता आणि झालेला ठराव एक ऑपचारिकता म्हणुन आपल्याला त्यांना पाठवायचा आहे.

**ॲड. शुचिता हाडा :-** फक्त ९ आणि १० हा मर्ज करावा कारण त्या दोन्ही गोष्ट एकच आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई ठराव एकच होईल कारण दोन जरी झाले तरी आपल्याला एकच

**ॲड. शुचिता हाडा :-** हो ना पण आपण हे अननेसेसरी पणे आणायचाच नव्हता कारण ९ मध्ये जो आहे तो १० मध्ये पण आहे आणि ११ मध्येपण तोच आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई ठराव जरी दोन झाले ना तर त्याने काही फरक पडणार नाही कारण शेवटी अंमलबजावणी एकाच ठरावाची होईल.

**ॲड. शुचिता हाडा :-** काय आहे नितीनभाऊ या विषयाला कोणताच विरोध नाही कारण मी ज्यावेळी स्थायी समिती सभापती होते. त्यावेळी काय झाले त्यावेळेला मेहरूणचे सुशोभिकरण कराव त्यावेळी आपण जळगांव जिल्ह्याचे वैशिष्ट्य पाठ कराव आणि हे सगळ केल होत दुर्देवाने कोरोना आला आणि त्यावेळेला आपण ते करू शकलो नाही आणि कोणत्याही रितीने होवु द्या कोणत्याही पध्दतीने होवु द्या. त्याला पण या दोन चार गोष्टींच पालन करायला पाहीजे. कस आहे मला हा शब्द खटकला तो ब्रिटीशकालीन तो वगळावा कारण आणि या विषयामध्ये आपल्या जळगावातील जी जुनी मंदिर आहेत. जुन्या जळगांवातील राम मंदिर , विठ्ठल मंदिर आहे , बालाजी मंदिर आहे. तर याकडेसुध्दा आपण लक्ष द्यावे. कारण यामध्ये जी आपण या मंदिराची जी अडीच करोड रूपयांची प्रोवीजन जे करतो आहोत. तर ते काही संयुक्तिक वाटत नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई आपण फक्त मागणी करतोय त्यासाठीची

**ॲड. शुचिता हाडा :-** मागणी करतो आहे आपण ते ठिक आहे ना

**श्री.नितीन लढ्ढा :-** हा जो ठराव आहे या मंदिराच्या बाबतीतला तो

**मा.महापौर :-** पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८४९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील मेहरुण तलाव हा एकमेव ब्रिटीशकालिन पर्यटन स्थळ आहे तेथे शिवाजी उदयान स्थित आहे. सदर ठिकाणी शहरातील तसेच शहरा लगतच्या उपनगरे, गावांमधून मोठया प्रमाणात पर्यटक येत असतात. त्यामुळे जळगांव ता.जि.जळगांव शहरातील तलाव परिसरातील शिवाजी उदयान मुख्य पर्यटन स्थळ आहे. सदर उदयानात सकाळ सायंकाळी नागरीक मोठया प्रमाणात फिरायला व मॉर्निंग, ईव्हनिंग वॉकला येत असतात. तसेच शिवाजी उदयान परिसरात पर्यावरण पुरक झाडे, झुडपे, वनस्पती असल्यामुळे दरवर्षी ऋतु बदलाच्या वेळी मोठया प्रमाणावर विदेशी पक्षी येत असतात.

नागरीकांना शहरात अस्तित्वात असलेले शिवाजी उदयान सुशोभिकरणासह विकसित करुन देणेची बाब विचारात घेता मेहरुण तलाव शिवाजी उदयान पर्यटनाच्या दृष्टीकोनातून विकास होणे आवश्यक आहे. मात्र सदयस्थिती महानगरपालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता सदर बाबी शक्य नाही.

करीता शासनाच्या प्रादेशिक पर्यटन विकास योजने अंतर्गत जळगांव ता.जि.जळगांव मधील जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील मेहरुण तलाव परिसरातील शिवाजी उदयान सुशोभिकरण व विकसित करणे कामी खालील नमूद १ ते ६ कामांना निधी उपलब्ध करुन देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | शिवाजी उदयानामध्ये झाडे लावून त्यांची देखभाल दुरुस्ती करुन उदयान विकसित करणे. | १,५०,००,०००/- |
| २ | शिवाजी उदयानामध्ये रेनवॉटर हार्वेस्टींग व पाणी पुरवठा व्यवस्था करणे. | १,००,००,०००/- |
| ३ | शिवाजी उदयानामध्ये मनपा कार्यालय, वॉचमन रुम व स्वच्छता गृहे, पंप हाऊस व इलेक्ट्रीक रुम बांधणे. | १,०५,००,०००/- |
| ४ | शिवाजी उदयानामध्ये संपुर्ण परिसरात विदयुतीकरण करणे. | १,५०,००,०००/- |
| ५ | मेहरुण परिसरातील ब्रिटीशकालिन पुरातन विठ्ठल मंदीराची पुर्नबांधणी करणे. | २,५०,००,०००/- |
| ६ | जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील मेहरुण उदयान सुशोभिकरण व पर्यटन स्थळ विकसित करणे. | ६,००,००,०००/- |
| | एकुण रक्कम रुपये - | १३,५५,००,०००/- |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** **६४**

**सूचक** **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक** **:- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. ११ :-** जिल्हा नियोजन समिती निधी किंवा नागरी दलितेत्तर निधी किंवा शासनाकडून वेळोवेळी विविध शिर्षाखाली प्राप्त होणाऱ्या निधी अंतर्गत प्र.क्र.११ किलबिल शाळेपासून ते काशी विश्वेश्वर मंदीर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.३० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.महापौर,मनपा,जळगांव यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**ॲड. शुचिता हाडा :-** आपण हा प्रस्ताव मंजुर केला आहे. हा विषय जो आहे ११ हा विषय क्रं. ९ मध्ये अ.क्रं. ७३ वर घेतलेला आहे आणि त्याची मंजुरी झालेलीच आहे म्हणजे ऑलरेडी ते क्लब करा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ज्या कामामध्ये रिपीट होत असतील तर ते एका ठिकाणावरील वगळण्यात यावे. जी काम एकाच ठिकाणावरील असतील आणि ती काम या विषयामध्ये जी आलेली असतील ना जी ९ नंबर मध्ये आलेली असतील ना तर ती काम वगळण्यात येतील.

**ॲड. शुचिता हाडा :-** चालेले भाऊ

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ११ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८५० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्र.११ मधील खालील नमुद कामे नागरीकांना विविध सोईसुविधा पुरविणे तसेच रहदारी व वाहतूकीच्या सेवा पुरविणे कामी करुन घेणे गरजेचे असून याबाबत सदर परिसरातील नागरीकांकडून सदर कामांना लवकरात लवकर करणे बाबत सतत मागणी होत असल्यामुळे खालील नमुद कामे जिल्हा नियोजन समिती निधी किंवा नागरी दलितेत्तर निधी किंवा शासनाकडून वेळोवेळी विविध शिर्षाखाली प्राप्त होणाऱ्या विविध निधी अंतर्गत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.११ किलबिल शाळेपासुन ते काशी विश्वेश्वर मंदीर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ३०,००,०००/- |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** **६४**

**सूचक** **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक** **:- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १२ :-** शासन निर्णय क्र.मनपा-२०२२/प्र.क्र.१२१(०२)/नवि-१६ दि.२०/०५/२०२२ अन्वये वार्ड क्र.२,८,९,१६ व १९ मध्ये महानगरपालिका क्षेत्रात शासनाने निश्चित केलेली १७ कामांव्यतिरिक्त ०९ कामे मनपा २५ टक्के हिश्यातील व मनपा हिश्यातील १०० टक्के निधीतील ०१ कामे अशी एकत्रित २७ कामांची निविदा प्रक्रिया राबविणे कामी मा.विरोधी पक्षनेता,मनपा,जळगांव यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**ॲड. शुचिता हाडा :-** यादी जी आपण सुनिलभाऊ बनवली आहे तर ती थोडी परत तीच काम याच्यामध्ये आलेली आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई यादी जरी बनवली असली ना आणि जी रिपीट असतील ना तर ती वगळण्यात येतील.

**श्री.जितेंद्र मराठे :-** यामध्ये आपण मनपा निधी २५ टक्के वापरणार आहेत काही याच्यामधुन आपण १०० टक्के वापरणार आहे अस काय आहे.

**मा.महापौर :-** १०० टक्क्यांच एक काम म्हणजे

**श्री.जितेंद्र मराठे :-** १०० टक्क्याच एक काम आणि बाकी २५ टक्के निधी वापरायचा. गेल्या दोन वर्षापासुन माझ्या प्रभागामध्ये रायसोनी नगर ते देवेंद्र नगर , नविन विस्तार झालेला परिसर या ठिकाणी तुम्ही मागचे आयुक्त आणि इंजिनियर यांच्या चार चार वेळा चकरा मारून झालेल्या आहेत. लोकांना सांडपाण्याचा इतका त्रास होतोय आणि त्या गटारी बांधण्यासाठी मनपा फंडातुन ठेकेदार जे आहेत नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** जितुभाऊ ५० लाख रूपयांच्या गटारी दलितवस्ती मध्ये टाकलेल्या आहेत बघा.

**श्री.जितेंद्र मराठे :-** नितीनभाऊ हा विषय आताचा आहे, दोन वर्षापासुन आम्ही फॉलोअप घेतोय. ठेकेदार त्यांना ॲफिडेव्हिट करून द्यायला तयार आहे की आम्हाला दोन वर्ष काय पाच वर्ष पैसे देवु नका. तरी सुध्दा आम्हाला येथुन आयुक्त स्तरावरून मान्यता मिळत नाहीये. नागरीकांनी त्याठिकाणी १५ ते १६ ठिकाणी शोषखड्डे त्यांनी केलेले आहेत. मॅडम आपण प्रशांत पाटील साहेब राहतात त्याभागामध्ये आपण राहतात ना रायसोनी नगरला यांना विचारा त्या भागामध्ये परिस्थिती काय आहे तर तिथे

**श्री.नितीन लढ्ढा :-** जितुभाऊ आपण ५० लाख रूपयांच्या गटारी दलितवस्ती मध्ये

**श्री.जितेंद्र मराठे :-** नितीनभाऊ आमच काय म्हणण आहे की, हे काम पण करा ना जर ठेकेदार जर तयार आहे तर मग करायला काय अडचण आहे. तुम्ही का करत नाही मंजुर

**मा.आयुक्त :-** सर

**श्री.जितेंद्र मराठे :-** मॅडम एक मिनिंट, बाहेती शाळेमध्ये नितीनभाऊ बरडे काम बघतात. तर त्या शाळेच काम बघतात तिथले तर त्या बाहेती शाळेजवळ २५ ते ३० फुटाच्या उंचावरील कॉक्रींटचे रस्ते तयार झालेले आहेत. नितीनभाऊ , सुनिलभाऊ आपल्याला पण माहिती आहे की हा विषय गिरीषभाऊंपर्यंत गेला आहे या विषयासाठी गेलो होतो मी , तिथे शाळा सुरू आहे. रस्त्यांच्या खालुन मुरूम पुर्ण निघुन गेलेला आहे आणि कॉक्रीटींकरणाचा जो रस्ता झालेला आहे तो खाली आणि तो ढासळणार , जिवित हानी होणार आणि तो पर्यंत आपण वाट बघायची का तर आम्ही मनपा फंडामधुन ते काम करण्यासाठी ठेकेदाराला सुध्दा पुढे आणलं. पण आपल्याकडुन त्याचा काहीच पाठपुरावा झालेला नाहीये म्हणजे आपण वाट बघायची जिवितहानी होण्याची आणि मग काहीतरी कारण पुढे येत, अधिकारी नाहीये , कर्मचारी नाहीये हेच रडगाण आयुष्यभर चालु ठेवायच का ? आकृतीबंध होईल तेव्हा होईल दुसऱ्या उपाययोजना आहेत ना आपल्याकडे तर करायला काय अडचण आहे आपल्याला.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मॅडम तुमचे बघितले ना, रणरागीणी ज्याला म्हणतो आपण आणि खरच मुख्याधिपिकेचा रोल आपण आज ईथे निभावला आहे. म्हणजे आज जे तुम्ही मनापासुन बोलले की जो संताप केला हे आम्ही गेल्या वर्षभरापासुन सभागृहामध्ये करतोय. त्याच कारण अस आहे.

**श्री.सचिन पाटील :-** कायम ठेवा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हो कायम ठेवा. फक्त हि संतप्त भावना

**श्री.जितेंद्र मराठे :-** ज्या प्रमाणे आपण महापौरांनी दाखवली त्याप्रमाणे ती नैतिकता विरोधी पक्ष नेत्यांची होती की त्यांनी त्या समस्या येथे मांडायला हव्या होत्या.

**श्री.सुनिल महाजन, विरोधी पक्ष नेता :-** नैतिकता हा शब्द वापरू नका,

**श्री.नितीन लढ्ढा :-** एकाच कुटुंबातील सदस्य असले तर एकाच विषयावर उत्तर देत नाहीत.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** पण विषय आता जो सुरू झालेला आहे. खरच मी हेच सांगेल या सभागृहाच्या भावना आहेत. पण मला एक उत्तर सभागृहात मिळायला पाहीजे की पैसा महत्वाचा आहे की शहराचा विकास महत्वाचा आहे.

**श्री.अनंत जोशी :-** शहर महत्वाचे आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** शहर महत्वाचे आहे. मी वारंवार या सभागृहामध्ये म्हणतोय आज पुन्हा म्हणतोय सर्व सन्मा.सदस्यांच्या वतीने की अजुनही वर्ष बाकी आहे. या छोट्या छोट्या समस्या , मोठ्या तर लोकं सहन करून राहीले आहेत. पण या त्यांच्या छोट्या छोट्या समस्यांच निराकरण जरी झाल तरी या शहरातील नागरीक समाधानी होईल आणि पुन्हा माझी सभागृहाला मागणी आहे आजच्या तारखेत की प्रत्येक नगरसेवकाला ५० लाख रूपये निधि द्या. तुम्ही ऐका एक वर्षानंतर प्रत्येकाला निवडणुकीला सामोरे जायच आहे आणि निवडणुक

महत्वाची नाहीये. लोकांच्या भावना महत्वाच्या आहेत आणि त्या महापौरताई बोलल्या ना जिव तोडुन की त्या रिक्षावाल्याची भुमिका काय होती ती मांडली या सभागृहासमोर या आणि ज्या दिवशी पहिला रस्ता खोदला त्या दिवशी माझ्या गल्लीतील मुलगी पडली आणि तिचा पाय फ्रक्चर झाला.अमृत योजनेच्या खड्डयामुळे आणि गाऱ्यामुळे तर आम्ही या संतप्त भावना आम्ही त्यांना समजवुन आलो भेटुन आलो. मी बोललो की शहरात विकासाच काम चालु आहे. अमृत योजना सुरू आहे. पण आपल्याला पण अपेक्षा नव्हती की अमृतच काम इतके वर्ष पुढे लोटल जाईल आणि त्याचा त्रास आपल्याला सहन करावा लागेल. म्हणुन मी परत सभागृहाला विनंती करतो की ५० नाहीतर कमीत कमी २५ लाख रूपये द्या. तुम्ही प्रत्येक नगरसेवकाला निधी द्या या छोट्या छोट्या कामांसाठी आणि काही रस्ते आपले काही रस्ते आपण ४२ कोटींमध्ये पण घेतलेले आहे. आपण ६१ कोटींमध्ये पण बरेचशे रस्ते घेतलेले आहेत. काही मोठी अमाऊंट होणार नाहीये. नितीनभाऊ २५ लाख आणि ८० नगरसेवक तुम्ही करून घ्या आणि कोणते तुम्हाला आजच पेमेंट द्यायचे आहे. आज तो काम करेल बिल तयार होईल, ईस्टिमेट तयार होईल. एक वर्ष त्याच्यात निघुन जाणार आहे.

**श्री.अनंत जोशी :-** मी काय म्हणतो भाऊ अडिच वर्षाच्या वर झाले आहे पण त्याची प्रोविजन आहे का.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आहे ना खर्च जो आहे ना मार्च पर्यंत आपला पुर्ण होईल

**श्री.अनंत जोशी :-** नाही पण मला सांगा

**श्री.विशाल त्रिपाठी :-** खर्च नाहीये तो ॲडव्हांस आहे तो

**श्री.अनंत जोशी :-** नाही भाऊ पण

**श्री.विशाल त्रिपाठी :-** भाऊ तुम्हाला २५ लाख नकोय तुम्ही नका घेवु. ज्याला २५ लाख नकोय त्याने घेवु नये. त्याने स्पष्ट महापालिकेला पत्र द्यावे की मला आम्हाला नकोय.

**श्री.अनंत जोशी :-** विशालभाऊ तुम्हाला विरोध करत नाहीये. तुम्हाला विचारतोय मी की

**श्री.विशाल त्रिपाठी :-** भाऊ

**श्री.अनंत जोशी :-** निधी कुठुन आणणार तुम्ही सांगा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** तुम्हाला सांगतो मी निधी , तुम्ही पॉझिटिव्ह थिंकींग ठेवत नाही. मागच्या सभेमध्ये तुम्ही होते नाही. मी सांगतो तुम्हाला की बोललो होतो की तुम्ही पॉझिटिव्ह थिकींग ठेवा.

**श्री.अनंत जोशी :-** भाऊ मी काय म्हणतोय.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** घरपट्टी वाढली नाही का नितीनभाऊंनी सांगावे, घरपट्टी वाढली नाही का , कर्मचारी किती रिआयर झाले तुमचे त्यांचा पगार वाचत नाहीये का ,

**श्री.अनंत जोशी :-** भाऊ मी काय म्हणतोय पण

**श्री.विशाल त्रिपाठी :-** गाळ्यांचा प्रश्न ,मला बोलु द्या बंटी भाऊ , गाळ्यांचा प्रश्न या दोन महिन्यात मिटणार आहे तुम्हाला सांगतो मी दोन महिन्यात या महापालिकेत पैसे येणार आहेत. तुम्ही माझ्या भावना समजुन घ्या. तुम्ही याचे हास्य करू नका.

**श्री.अनंत जोशी :-** भाऊ मी

**श्री.विशाल त्रिपाठी :-** तुम्ही मला सांगा की २५ लाख रूपये आजच्या तारखेला

**श्री.नितीन लढ्ढा :-** विशालजी की महानगरपालिकेला हा पैसा कुठुन काढायचा आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नितीनभाऊ मी सांगतो तुम्हाला आता १०० कोटी रूपयांचा निधीचा जो तुम्ही हा विषय करता आहेत ना बऱ्याच प्रभागात आतापर्यंत तुम्ही वाचा त्याचे आकडे पाहा आतापर्यंत १०० टक्के निधी शासनाचे निधीतुन काम मंजुर झाली आहेत ना हेच आहे ना सांगा बर २५ लाख रूपयाप्रमाणे किती अमाऊंट होते.काय विषय आहे म्हणजे मला समजत नाहीये. म्हणजे ठराविक प्रभागामध्ये जो शासनाचा निधी आणतो त्या मध्ये त्याचा हिस्सा आणि बाकीचे नगरसेवक शहराचा विषय , स्लमचा विषय आहे छोटासा आमच्या घराजवळचा विषय आहे. आम्ही फक्त छोटासा निधी मागतोय.

**श्री.अनंत जोशी :-** भाऊ मी काय म्हणतोय याची प्रोविजन आहे का

**श्री.विशाल त्रिपाठी :-** प्रोविजन आहे ना

**श्री.अनंत जोशी :-** भाऊ मी तुम्हाला विरोध करत नाहीये. हे कस करायच हे विचारतोय माझ्या आधीपण तुम्ही होते म्हणुन मी तुम्हाला विचारातोय. खर्च कुठुन होईल तो

**श्री.विशाल त्रिपाठी :-** भाऊ आहे प्रोविजन आहे ना खर्चही होईल

**श्री.अनंत जोशी :-** सांगा

**श्री.विशाल त्रिपाठी :-** १ कोटी रूपये जेडीसीसी बँकेचे तुमचे वाचत आहे भाऊ हे लक्षात घ्या बंटीभाऊ मी तेच सांगतोय तुम्हाला परत तुम्ही करून घ्या ८० गुणीला २५ लाख ४ कोटी रूपये होणार नाही का प्रत्येक प्रभागाला

**श्री.अनंत जोशी :-** विशालभाऊ मी काय म्हणतोय.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ४ कोटी रूपये नाहीये का महापालिकेकडे, ५ कोटीपण नाहीये का.

**श्री.सुनिल महाजन,विरोधी पक्ष नेते :-** विशाल भाऊ मी काय म्हणतोय माझे म्हणणे ऐकुन घ्या आता हा ही विषय करा की २५ -२५ लाख रूपये मनपा फंडातुन प्रत्येक नगरसेवकांना देण्याचा आणि दुसरा विषय असा करा की जळगांव महानगरपालिकेसाठी एक चार्टड प्लेन घ्यायच आणि ते जळगांव विमानतळावर स्टँडबाय ठेवायचे. कुठल्या अधिकाऱ्याला किंवा सन्मा. नगरसेवकांना किंवा सन्मा पदाधिकाऱ्याला कुठे जायची गरज पडली तर ते चार्टड प्लेन तयार राहील आणि त्याचा एक ठराव करून घ्या आता

**(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत असतांना निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पस्ष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.विशाल त्रिपाठी :-** भाऊ सर्वांना कामात येईल ना, सगळे जाऊ, तुम्ही म्हणाल ना मोटर सायकलवर जाऊ आपण, कशाला चार्टड प्लेन घ्यायचे प्रशासनाचे पैसे वाया घालवायचे.मी यायला तयार आहे मोटर सायकलवर तुम्ही म्हणाल ना सायकलवर यायला तयार आहे मी.

**श्री.अनंत जोशी :-** गोवाहाटी जातात ना लोकं चाटर्ड प्लेनने.

**श्री.जितेंद्र मराठे :-** गोवाहाटी जायच आहे का सुनिलभाऊ

**मा.महापौर :-** सर्व सन्मा. सदस्यांनी बसुन घ्यायचे आहे. विषय क्रं.१२ मंजुर करण्यात येत आहे. विषय क्रं. १३ घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८५१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शासन निर्णय क्र.मनपा-२०२२/प्र.क्र.१२१(०२)/नवि-१६ दि.२०/०५/२०२२ अन्वये वार्ड क्र.२,८,९,१६ व १९ मध्ये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोईसुविधांचा विकास योजना अंतर्गत शासनाने रुपये ०५.०० कोटीचा निधी देणे बाबत शासन निर्णय पारित केलेला आहे, मात्र सदर शासन निर्णयात अट क्र.३ मध्ये प्रकल्प खर्चाच्या ७५ टक्क्याचा शासनाचा व मनपा हिस्सा २५ टक्के राहणार आहे. मात्र अशी धारणा आहे कि, शासनाने ७५ टक्के प्रमाणे सदर योजने अंतर्गत रुपये ०५.०० कोटी निधी वितरीत करण्यास मान्यता देतांना रुपये ०५.०० कोटी ही ७५ टक्के रक्कम ही शासनाची राहील व याव्यतिरिक्त २५ टक्के म्हणजेच रुपये १.२५ कोटीची उर्वरीत कामे मनपा निधीतील असतील या करीता शासन निर्णयात नमुद खालील १७ कामांव्यतिरिक्त ०९ कामे मनपा २५ टक्के हिश्यापोटी व मनपा १०० टक्के निधीतील ०१ कामे उपरोक्त नमूद विविध शासकीय योजनांच्या निधीमधून करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**वरील शासन निर्णयाच्या व्यतिरिक्त जळगांव मनपाच्या २५ टक्के निधीतील कामे**

| | | |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१९ राम नगर व सदाशिव नगर मध्ये आरसीसी गटार व कल्व्हेट बांधणे. | २३,००,०००/- |
| २ | प्रभाग क्र.८ निमखेडी गट क्र.११८/३ मध्ये गटारी बांधणे. | १६,००,०००/- |
| ३ | प्रभाग क्र.८ निमखेडी गट क्र.२५/१/२/३ मध्ये गटारी बांधणे (शिवधाम मंदीर परिसर) | २०,००,०००/- |
| ४ | प्रभाग क्र.९ मुक्ताई नगर गट नं.३४ अॅड बोरोले (पाण्याची टाकी) ते हिरे मॅडम यांचे घर ते अशोक पाटील यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १३,००,०००/- |
| ५ | प्रभाग क्र.९ मुक्ताई नगर गुरुदत्त गार्डन ते मयुरेश प्लॉझापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १२,००,०००/- |
| ६ | प्रभाग क्र.९ निवृत्ती नगर मधील महाजन यांचे घरापासुन ते मराठा हॉल पर्यंत रस्ता डांबरी करणे. | ११,००,०००/- |
| ७ | प्रभाग क्र.१६ लक्ष्मी नगर मध्ये परिसरात रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | १०,००,०००/- |
| ८ | प्रभाग क्र.१६ लक्ष्मी नगर मध्ये परिसरात आरसीसी गटार बांधणे. | ७,००,०००/- |
| ९ | प्रभाग क्र.१६ वर्षा कॉलनीमध्ये गटारी कॉंक्रीटीकरण करणे. | १२,००,०००/- |

**तसेच याव्यतिरिक्त मनपा १०० टक्के निधीतुन खालील प्रमाणे नमुद कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.२ दालफळ जुन्या मुत्री पासुन शिवमंदीर ते मोठया मस्जिद पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ४२,००,०००/- |

**शासन निर्णय क्र.मनपा -२०२२/प्र.क्र.१२१(०२)/नवि-१६ दि.२०/०५/२०२२ अन्वये समाविष्ट असलेली कामे**

| | | |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.८ मधील साईमंदिर गट नं.९० ते टिळक नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | ४५,००,०००/- |
| २ | प्रभाग क्र.८ मधील दत्त रेसिडन्सी व परिसरामधील निमखेडी शिवार डांबरीकरण करणे. | २०,२०,०००/- |
| ३ | प्रभाग क्र.८ मधील निमखेडी गट नं.९९/३-ड/१/सहयाद्री कॉलनीतील रस्ते रिफेसिंग करणे. | १३,७५,०००/- |
| ४ | प्रभाग क्र.८ मधील तालुका पोलीस स्टेशसनला लागून उत्तरेकडील रस्ता व गट क्र.११२ मधील पूर्व व पश्चिम रस्ता डांबरीकरण करणे. | २३,९३,०००/- |
| ५ | प्रभाग क्र.८ मधील शिवराज रेसिडेन्सी परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे | |
| ६ | प्रभाग क्र.१९ मेहरुण स.नं.२७३, स.नं.२७४ (पूर्वेकडील भाग) या भागात आर.सी.सी.गटार स्लॅब कल्व्हेट बांधणे. | ५७,००,०००/- |
| ७ | प्रभाग क्र.१९ मेहरुण स.नं.२४९ एमडीएस कॉलनी मध्ये आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे. | ३५,००,०००/- |
| ८ | प्रभाग क्र.९ अंतर्गत गट नं.३५ डॉ.गोरख पाटील ते हिरे मॅडम यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १८,६०,०००/- |
| ९ | प्रभाग क्र.९ अंतर्गत गट नं.३२ बहीरम सर ते स.नं.३४ बेंडाळे ओपनस्पेस ते देशमुख यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | |
| १० | प्रभाग क्र.९ अंतर्गत गट नं.३४ गुरुदत्त गार्डन ते कृष्णा टेंट नविन कल्व्हेट पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २०,४८,०००/- |
| ११ | प्रभाग क्र.९ अंतर्गत गट नं.२८ मधील संजय पाटील यांचे घरापासुन ते बोरसे यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ३०,००,०००/- |
| १२ | प्रभाग क्र.९ नं.२९-३० मधील रस्ते डांबरीकरण करणे. | ३०,००,०००/- |
| १३ | प्रभाग क्र.२ मधील कंक यांचे घरापासुन ते क्रांती चौका पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ३५,००,०००/- |
| १४ | प्रभाग क्र.२ मधील क्रांती चौकापासुन ते शिवमंदीरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | २५,००,०००/- |
| १५ | प्रभाग क्र.२ मधील क्रांती चौकापासुन ते हुडकोच्या कोपऱ्यापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ५०,००,०००/- |
| १६ | प्रभाग क्र.१६ मध्ये रचना कॉलनी येथे रस्ते डांबरीकरण करणे. | ४२,००,०००/- |
| १७ | प्रभाग क्र.१६ जुनी सम्राट कॉलनी गट नं.५१०/१, ५१०/२ येथे रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | ५४,०४,०००/- |

तसेच सदर कामी शासनाने निश्चित केलेली १७ कामे वरील प्रमाणे २५ टक्के मनपा हिश्यातील ०९ कामे व १०० टक्के मनपा हिश्यातील ०१ कामे अशी एकत्रित २७ कामांची निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६४**
**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १३ :-** शासन निर्णय क्र.मनपा-२०२२/प्र.क्र.१२१(०६)/नवि-१६ दि.२१/०५/२०२२ अन्वये वार्ड क्र.११ व १४ मध्ये महानगरपालिका क्षेत्रात शासनाने निश्चित केलेली ०२ कामांव्यतिरिक्त ०१ कामे मनपा २५ टक्के हिश्यातील व मनपा हिश्यातील १०० टक्के निधीतील ०२ कामे अशी एकत्रित ०५ कामांची निविदा प्रक्रिया राबविणे कामी मा.विरोधी पक्षनेता,मनपा,जळगांव यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा आणि जो निधी मंजुर होवुन येईल त्यामधुन हे काम करण्यात यावे.

**श्री.सुनिल महाजन, विरोधी पक्ष नेता :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं.१३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८५२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शासन निर्णय क्र.मनपा-२०२२/प्र.क्र.१२१(०६)/नवि-१६ दि.२१/०५/२०२२ अन्वये वार्ड क्र.११ व १४ मध्ये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोईसुविधांचा विकास योजना अंतर्गत शासनाने रुपये ०५.०० कोटीचा निधी देणे बाबत शासन निर्णय पारित केलेला आहे, मात्र सदर शासन

निर्णयात अट क्र.३ मध्ये प्रकल्प खर्चाच्या ७५ टक्क्याचा शासनाचा व मनपा हिस्सा २५ टक्के राहणार आहे. मात्र अशी धारणा आहे की, शासनाने ७५ टक्के प्रमाणे सदर योजने अंतर्गत रुपये ०५.०० कोटी निधी वितरीत करण्यास मान्यता देतांना रुपये ०५.०० कोटी ही ७५ टक्के रक्कम ही शासनाची राहील व याव्यतिरिक्त २५ टक्के म्हणजेच रुपये १.२५ कोटीची उर्वरीत कामे मनपा निधीतील असतील या करीता शासन निर्णयात नमुद खालील ०२ कामांव्यतिरिक्त ०१ कामे मनपा २५ टक्के हिश्यापोटी व मनपा १०० टक्के निधीतील ०२ कामे उपरोक्त नमूद विविध शासकीय योजनांच्या निधीमधून करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**वरील शासन निर्णयाच्या व्यतिरिक्त जळगांव मनपाच्या २५ टक्के निधीतील कामे**

| | | |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.१४ मधील मेहरुण स.क्र.२५० हनूमान मंदीर परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | १,२५,००,०००/- |

**तसेच याव्यतिरिक्त मनपा १०० टक्के निधीतुन खालील प्रमाणे नमुद कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.१४ मधील मेहरुण परिसरातील स्वामी समर्थ केंद्राजवळील मागील व पुढील गल्लीत रोड कॉक्रीटीकरण करणे. | ३५,००,०००/- |
| २ | प्र.क्र.१४ मेहरुण गट क्र.२५१/३अ राम नगर परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | ४०,००,०००/- |

**शासन निर्णय क्र.मनपा-२०२२/प्र.क्र.१२१(०६)/नवि-१६ दि.२१/०५/२०२२ अन्वये समाविष्ट असलेली कामे**

| | | |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.१४ मध्ये शिवाजी उदयान सुशोभित करुन विकसित करणे. | ४,५०,००,०००/- |
| २ | प्र.क्र.११ मधील १०० फुटी रोड घटडी पासून ते पठाण बाबा दर्ग्यापर्यंत रस्त्याच्या दोन्ही आरसीसी गटार बांधणे, पाथवे करणे, बांधुन त्यामध्ये बसविणे व रस्ता डांबरीकरण करणे. | ५०,००,०००/- |

तसेच सदर कामी शासनाने निश्चित केलेली ०२ कामे वरील प्रमाणे २५ टक्के मनपा हिश्यातील ०१ कामे व १०० टक्के मनपा हिश्यातील ०२ कामे अशी एकत्रित ०५ कामांची निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६४**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडु**

**नगरसचिव विषय क्रं. १४ :-** प्रभाग समिती क्रं.०२ अंतर्गत अर्जदार डॉ.अवधूत नामदेव चौधरी,रा.विठ्ठलपेठ यांचे मिळकतीवरील मोठया निवासी इमारतीवरील कर आकारणी रक्कम रु.२९,८६५/- मात्र निर्लेखीत करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**श्री.महेश चौधरी :-** महापौरताई
**मा.महापौर :-** विषयाशी संबंधित असेल तर बोला.
**श्री.महेश चौधरी :-** हो ताई विषयाशी संबंधित आहे. त्यावरच बोलतोय मी वेगळ बोलत नाहीये.
**मा.महापौर :-** बोला , बोला
**श्री.महेश चौधरी :-** डॉ. अवधुत चौधरी यांचे सेवाभावी काम सर्वांनाच माहिती आहे.
**श्री.सुनिल महाजन,विरोधी पक्ष नेता :-** भाऊ मंजुर केले ना आता आपण
**श्री.महेश चौधरी :-** हो भाऊ मंजुर केला विषय पण मला माझा मुद्दा तर मांडु द्या. काय अडचण आहे तुम्हाला ,दोन मिनिंट लागतील भाऊ .
**श्री.सुनिल महाजन,विरोधी पक्ष नेता :-** भाऊ बोला बोला.
**श्री.महेश चौधरी :-** तर यांच सेवाभावी काम आहे. अवधुत डॉक्टरांच त्यांच्याकडे अस आहे की कोणताही सण असो. कोणाजवळ पैसे असो नसो तर ते दही हंडी असो, कुस्ती असो तर यामध्ये त्यांचे घोषित असत

दरवर्षी की याच्यामध्ये जर कोणी जखमी झाला म्हणजे कोणाचा हात मोडला किंवा पाय मोडला तर त्याला त्याची मोफत तिथे ट्रिटमेंट दिली जाते आणि अशा सेवाभावी व्यक्तीचा विषय समोर आला आहे तर तो मंजुर करण्यात यावा एवढीच आपल्याला विनंती आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं.१४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८५३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, अर्जदार यांची मिळकत प्रभाग समिती क्रं.०२ अंतर्गत सौ.अनिता अवधूत चौधरी या नावाने असुन सदर मिळकतीवर सन २००७-२००८ पासून पुरवणी सर्व्हेक्षणात आकारणी करण्यात आलेली आहे. सदर मिळकतधारक हे सदर मिळकतीत हाड वैदय म्हणून काम करीत असून शहरातील जुना भाग म्हणून जूने जळगांव हा भाग प्रसिध्द आहे. सदर भागातील शेतमजुर यांचा उपचार अल्प दरात तसेच म.न.पा.कर्मचारी, पोलिस कर्मचारी, आखाडयातील पहेलवान, कबड्डीपटू, दहीहंडीतील जखमी झालेले गोविंदा यांच्यावर ना नफा ना तोटा या तत्वावर उपचार करतात.

धर्मदाय संस्थाना मालमत्ता करात सुट देणेबाबत तरतुद आहे. सदर मिळकतीमध्ये सुरु असलेल्या दवाखान्यास धर्मदाय नोंदणी प्रमाणपत्र महा/क्र.१८५८५/जळगांव दि.०६/०८/२०१५ अन्वये नोंदणी करण्यात आलेली आहे त्या अनुषंगाने अधिनियमाचे कलम १३२- नुसार सुट देण्यात आलेली आहे परंतू सदर मिळकतीचे चटई क्षेत्र ८६.७० चौ.मिटर हे वाणिज्य वापराचे व ९६.६३ चौ.मिटर रहिवास वापराचे आहे.

महाराष्ट्र ईमारतीवरील कर (मोठया निवासी जागांयुक्त) अधिनियम १९७९ अन्वये ज्या निवासी जागांचे चटई क्षेत्र १५० चौ.मिटर पेक्षा जास्त आहे अशा इमारती करपात्र आहेत त्यामुळे सदर इमारतीचे रहिवासी (निवासी) क्षेत्र १५० चौ.मीटर पेक्षा जास्त नसल्याने चुकीने केलेली मोठया निवासी इमारतीवरील आकारणीची रक्कम रु.२९,८६५/- (ऐकोनतीस हजार आठशे पासष्ट मात्र) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १५२ अन्वये निर्लेखीत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६४**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १५ :-** जळगांव शहर महानगरपालिकेतील श्री.किशोर धोंडू चौधरी, रोजंदारी टेक्निकल सुपरवायझर पाणी पुरवठा विभाग यांना रोजंदारीचा दर रु.१६१०/- प्रतिदिन देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि याला वेतनवाढ जी आहे. ती १ एप्रिल २०२२ पासुन लागू करण्यात यावी.

**मा.महापौर :-** १ एप्रिल २०२२ पासुन ही वेतनवाढ श्री.चौधरी यांना लावण्यात यावी आणि त्या अनुषंगाने विषय क्रं. १५ हा सर्वानुमते मान्य करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८५४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सा.बां.विभागाच्या दि.६/८/२०२१ च्या शासन परिपत्रकानुसार स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत करण्यात येणारी बांधकामे, देखभाल दुरुस्ती कामासाठी लागणारी दरसुची प्रसिध्द केलेली आहे. त्यानुसार श्री.किशोर धोंडु चौधरी यांनी दि.१४/०३/२०२२ रोजी अर्ज दिलेला असून कनिष्ठ अभियंता पदाची सर्व सुविधा मिळणेबाबत किंवा क.अभियंता पदाचा कार्यभार काढून घेण्याबाबत व मला टेक्निकल सुपरवायझर पदाचे काम मला पेट्रोल अलौंन्स व पगारवाढ मिळत नाही तो पर्यंत मी नाईलाजाने पायी जावून युनिट कार्यालयात बसुन कामकाज करेल. मला वारंवार साईटवर जाता येणार नसलेने साईटवर होणाऱ्या कामाची माझी जबाबदारी राहणार नाही असे दि.१४/०३/२०२२ रोजीचे अर्जात नमुद केले आहे.

श्री.किशोर धोंडु चौधरी, रोजंदारी टेक्निकल सुपरवाझर पाणी पुरवठा विभाग यांना प्रतिदिन रु.२३४५/- या प्रमाणे रोजंदारी वेतन देणे बाबत शहर अभियंता यांची टिप्पणी प्राप्त झाल्याने श्री.चौधरी यांचे रोजंदारी दरात वाढ करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

श्री.किशोर चौधरी हे टेक्निकल सुपरवाझर या पदाची तांत्रिक शैक्षणीक पात्रता धारण करीत आहेत व पाणी पुरवठा विभागामध्ये सुमारे २० वर्षापासून रोजंदारीवर काम करीत असुन पाणी पुरवठा विभागात सर्व प्रकारची कामे पाहत आहेत तरी त्यांना रु.२३४५/- प्रतिदिवस प्रमाणे वेतन दयावे असा उप अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचा अभिप्राय आहे.

श्री.किशोर चौधरी हे रोजंदारी टेक्निकल सुपरवायझर या तांत्रिक पदावर न्यायालयीन कर्मचारी म्हणून कार्यरत असले तरी त्यांच्याकडे मागील १५ ते २० वर्षापासून पाणी पुरवठा युनिट चा कार्यभार देण्यात आला आहे. त्यांना D.S.R. नुसार तांत्रिक कर्मचारी वरिष्ठ अभियंता या पदाचा रोजंदारीचा पगार रु.२३४५/- प्रतिदिन देणेबाबत शहर अभियंता यांचे अभिप्राय प्राप्त आहेत.

जळगांव शहर महानगरपालिकेतील श्री.किशोर धोंडू चौधरी, रोजंदारी टेक्निकल सुपरवायझर (सध्या कार्यरत क.अभियंता) पाणी पुरवठा विभाग यांना रोजंदारीचा पगार रक्कम रु.२३४५/- ऐवजी दि.०६/०८/२०२१ सा.बां. विभागाच्या शासन परिपत्रकानुसार कनिष्ठ अभियंता पदासाठी रक्कम रु.१६१०/- प्रमाणे प्रतिदिन वेतन दि.०१/०४/२०२२ पासून लागू करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६४**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १६ :-** मनपा प्रशासकीय वाहन क्रं.एम एच १९ एम ७४७४ (स्विप्ट डिझायर) या वाहनाची दुरुस्ती करणे कामी येणारा रक्कम रु.२९,४२२/- मात्र चे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** हा विषय मान्य करण्यात यावा. परंतू या अनुषंगाने आपली एक गाडी आहे. आपली व्हॅक्युमची जी गाडी आहे ती ५ वर्षापासुन पडलेली आहे. तिच नव्वद हजार रूपये बिल आहे आणि त्याच्यावर ३ कर्मचारी आहेत. त्यांचे पगार ५०-५० हजार रूपये आहे कमीत कमी ते रिकामे आहेत तेव्हापासुन

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्यांना काम लावण्यात

**श्री.कैलास सोनवणे :-** तेव्हा आपण जर ९० हजार लावले असते तर ते ७.५० लाख गेले नसते आपले आणि नागरीकांना आपण ७०० रूपये आकारणी करतो. जळगांवचे जे दुसरे आहेत ते २५०० रूपये आकारणी करतात. आता ते तपासुन घ्या की याच्यामध्ये काय आहे ते बघुन घ्या. ते बिल तुम्ही घेवुन टाका त्याच्याकडुन

**ॲड. शुचिता हाडा :-** महापौरताई या सभागृहात नम्रतेने काहीच होत नाहीये. तर हे आवश्यक आहे मागणी असते खुप नागरीकांची कंम्पलेंट असते नागरीकांची तर चार प्रभाग समिती करीता या चार गाड्या असल्या पाहीजे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. १६ हा सर्वानुमते मान्य करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८५५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका प्रशासकीय वाहन क्रं.एम एच १९ एम ७४७४ (स्विप्ट डिझायर) हे वाहन आयुक्त कार्यालयाकडे कार्यरत असून सदर वाहनाचे खालीलप्रमाणे दुरुस्तीची कामे मजुरीसह करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| मनपा प्रशासकीय वाहन क्रं.एम एच १९ एम ७४७४ (स्विप्ट डिझायर) (उत्पादीत वर्ष-२०२१) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| १ | Bolt -01 Nos | 6 | Shaft Assy, Front Drive, LH -01 Nos |
| २ | O Ring -02 Nos | 7 | Gear Shifting Control Lever |
| ३ | Bracket, Injector Clamping - 01 Nos | 8 | Fuel Injector OR Injector Holder (All) |
| ४ | Seal, Diff Side Oil LH -01 Nos | 9 | Out Side |
| ५ | Lever Assy, Gear Shift Control -01 Nos | 10 | Front Drive Shaft Assy (One side) With Opposite Side |

वर नमुद वाहनाचे वरील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन पार्टस / मजुरीसह करणे कामी अधिकृत विक्रेते मे.मानराज मोटर्स, प्रा.लि.जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस दि.२१/०५/२०२२ प्रमाणे रक्कम रु.२९,४२२/- मात्र खर्च अपेक्षित असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत असल्याने सदर खर्चास तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता अधिकृत विक्रेते मे.मानराज मोटर्स,प्रा.लि.जळगांव यांना रक्कम रु.२९,४२२/- मात्रचा कार्यादेश देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६४**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १७ :-** मनपा मशिन क्रं.एम एच १९ एम ०६७२ (जे.सी.बी.) या मशिनची दुरुस्ती करणे कामी येणारा रक्कम रु.४६,९४०/- मात्र चे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा. पण प्रस्ताव मान्य झाल्यानंतर कार्यादेश देण्यात यावा. म्हणजे कार्योत्तर मान्यता घेवुन कार्यादेश देण्यात येवु नये अशातील भाग नाहीये.

**मा.आयुक्त :-** हो

**श्री.नितीन लढ्ढा :-** कारण काय आहे की पुढील महासभा साधारणत: महिन्या भरानंतर होते. त्याला विलंब लागतो तरी ते अस करा.

**श्री.प्रशांत पाटील,उपायुक्त :-** दरवेळेस आपण तस करतो आपण

**श्री.नितीन लढ्ढा :-** अस नाहीये की मान्यतेसाठी आपण महिना महिना थांबाल तर विलंब होतो त्याचा परिणाम कामांवर होतो. तर आपल्या स्तरावर ते निर्णय घेवुन घेत चला आणि

**मा.आयुक्त :-** हो नंतर कार्योत्तर मान्यता घेता येईल त्याला

**श्री.नितीन लढ्ढा :-** कार्योत्तर मान्यता घेवुन घेत चला.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. १७ हा सर्वानुमते मान्य करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८५६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका सार्व.बांधकाम विभागाकडील मशिन क्रं.एम एच १९ एम ०६७२ (जे.सी.बी.) हे दि.१५/०६/२०२२ पासुन बंद आहे. सदर जे.सी.बी पावसाळयाचे दिवस असल्याने त्वरित कार्यान्वित करणे आवश्यक आहे. सदर जे.सी.बी.चे खालील नमुद पार्टस नविन टाकणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे:-

| मनपा वाहन क्रं.एम एच १९ एम ०६७२ (जे.सी.बी.) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| १ | Annulus Ring -01 Nos | 9 | Thrust Pad -01 Nos |
| २ | Gear Planet -03 Nos | 10 | 3/4 BSPTAPER Plug -1 nos |
| ३ | Cylindrical Roller B - 03 Nos | 11 | O-Ring Seal -1 nos |
| ४ | Lshapedcorclip /CD2983 -06 Nos | 12 | Verbus Ripp Bolt -MI -8 nos |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | Circlip - External 40 MM -03 Nos | 13 | Rear Axle Work -1 nos |
| 6 | Sun Gear (Shot Peene) -01 Nos | 14 | Resilient Mount -2 nos |
| 7 | External Circlip -1 Nos | 15 | Belt 8PK 1866 MT610 -1 nos |
| 8 | Carrier Planetary Hub -1 nos | 16 | Filter Kit 3DX (1000 Hrs) -1 nos |

सबब Sale Quatation, Suyaan Infrastructure PVT LTD Jalgaon Quatation No-21040406 Date-20/06/2022, Estimate No-358 Date-20/06/2022 Quatation No-21040415 Date-22/06/2022 प्रमाणे एकूण खर्च रक्कम रु.४६,९४०/- मात्र अपेक्षित आहे.

एम एच १९ एम ०६७२ (जे.सी.बी.) दुरुस्ती / पार्टस् खरेदी कामी Suyaan Infrastructure PVT LTD Jalgaon यांच्या कडील Sale Quatation नुसार एकूण खर्च रक्कम रु.४६,९४०/- मात्रच्या खर्चास तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता Suyaan Infrastructure PVT LTD Jalgaon यांना रक्कम रु.४६,९४०/- मात्रचा कार्यादेश देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६४**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १८ :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.०९/०५/२०२२ ते दि.१३/०५/२०२२, दि.१७/०५/२०२२ ते दि.२०/०५/२०२२, दि.२३/०५/२०२२ ते दि.२७/०५/२०२२, दि.३०/०५/२०२२ ते दि.०३/०६/२०२२, दि.०६/०६/२०२२ ते दि.१०/०६/२०२२, दि.१३/०६/२०२२ ते दि.१७/०६/२०२२, व दि.२०/०६/२०२२ ते दि.२४/०६/२०२२ (एकूण - ०७ अहवाल) अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा मुख्य लेखापरिक्षक विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** साप्ताहीक अहवालाची माहिती घेण्यात आली.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. १८ हा सर्वानुमते मान्य करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८५७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.०९/०५/२०२२ ते दि.१३/०५/२०२२, दि.१७/०५/२०२२ ते दि.२०/०५/२०२२, दि.२३/०५/२०२२ ते दि.२७/०५/२०२२, दि.३०/०५/२०२२ ते दि.०३/०६/२०२२, दि.०६/०६/२०२२ ते दि.१०/०६/२०२२, दि.१३/०६/२०२२ ते दि.१७/०६/२०२२, व दि.२०/०६/२०२२ ते दि.२४/०६/२०२२ (एकूण - ०७ अहवाल) अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा मुख्य लेखापरिक्षक विभागाकडील अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६४**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १९ :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.**

**श्री.नितीन लढ्ढा :-** दोन्ही संविदांची माहिती घेण्यात आली.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. १९ हा सर्वानुमते मान्य करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८५८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१६ दि.२६/०५/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील वार्ड क्र.१२ मधील सर्वे नं.४८३ मेहरुण व सर्वे नं.१०५ पिंप्राळा म्युन्सिपल कॉलनी ला लागुन असणारा रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामी मक्तेदार श्री.डी.एच.पाटील, कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.८,५४,४५४/- मात्र खर्चाची संविदा. (मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१७ दि.२६/०५/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०८ मधील गट नं.९५/३/ब निमखेडी शिवार येथे गटारीचे बांधकाम करणे कामी मक्तेदार श्री.डी.एच.पाटील, कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,६५,८५४/- मात्र खर्चाची संविदा. (मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६४**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अन्वये सन्मा.सदस्यांकडुन आलेली प्रश्नउत्तरे. प्रश्न क्रमांक १ सन्मा.सदस्य श्री. रियाज अहमद अब्दुल करीम बागवान, प्रश्न क्रमांक २ सन्मा.सदस्य श्री.प्रशांत सुरेश नाईक, प्रश्न क्रमांक २,३ आणि ४ सन्मा.सदस्य श्री.प्रशांत सुरेश नाईक यांचे आहे. तद्नंतर प्रश्न क्र.५ सन्मा.सदस्य श्री.चेतन गणेश सनकत, श्री.मनीलाल हिरालाल डाबोरे.

**श्री.चेतन सनकत :-** माहिती मिळाली.

**नगरसचिव :-** प्रश्न क्र.६ सन्मा.सदस्य श्री.चेतन गणेश सनकत सुट्टी संदर्भात सन्मा.सदस्य चेतन गणेश सनकत जळगांव शहर महानगरपालिकेत कार्यरत असलेले कायम सफाई कामगारांना शासकीय सुट्टी संदर्भात कोणकोणत्या सुट्टया दिल्या जातात. याबाबत सविस्तर माहिती मिळावी. प्रशासनाकडुन माहिती देण्यात आलेली आहे.

**श्री.चेतन सनकत :-** सन्मा.सभागृह परिपत्रकाच्या अनुषंगाने सुट्टी देण्यात येते. संपुर्ण सभागृहाच्या मी लक्षात आणुन देत आहे. शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने सफाई कामगारांना सुट्टी देण्यात येत नाही. तुम्ही स्टडी करा. शासन परिपत्रक मला जवाब मध्ये प्रशासनाकडुनच दिले गेले आहे. शासन परिपत्रकात काय आहे ते ही वाटल्यास वाचुन सांगा तुम्ही. मला जास्त समजत नसेल तर तुम्ही समजवा. माझे अभ्यास कमी असेल तर ते दाखवा. दि.२७ सप्टेंबर २०१६ नगरविकास विभागाचे जी.आर. आहे. त्या जी.आर.च्या अनुषंगाने सफाई कामगारांना सुट्टी देणे बंधनकारक आहे. आपण सुट्टी देतो. फक्त रविवार आणि कॅलिन्डरवर जी सुट्टी असते ती देतो. आणि दुसरा विषय आपण समजा, शनिवारी त्यांना सुट्टी देत नाही. जी.आर.मध्ये स्पष्ट उल्लेख आहे. सर्व कर्मचाऱ्यांच्या संबंधीत ज्या सुट्टया असले, त्याप्रमाणे त्यांना सुट्टया देण्यात यावे. आणि एक विषय असा आहे, मागील महासभेमध्ये मी बोललो होतो. सफाई कामगारांना समजा आपण शासकीय सुट्टी दिली. तर त्याचा मोबदला देण्यासंदर्भात. आपण काम करुन घेतो सुट्टीच्या दिवशी, आज रोजी मला लेखी उत्तर पण प्रशासनाने दिलेले आहे. आणि त्या लोकांना सुट्टी भरुन आपण नंतर देतात. म्हणजे ५० कर्मचारी जर एका वार्डात आहे तर ४० कर्मचारी सुट्टीच्या दिवशी येणार आहे. मग त्या ४० कर्मचाऱ्यांना दुसऱ्या दिवशी १० तिसऱ्या दिवशी १० अशी सुट्टी प्रशासनाकडुन ॲडजेस्टमेंट करुन देतात. त्या कर्मचाऱ्यांची कमी संख्या असल्याने वार्डात सर्व नगरसेवकांच्या वार्डात जळगांव शहरामध्ये साफसफाईची बोमाबोम होते. त्याच्यामुळे अस प्रश्न चिन्ह निर्माण होत आहे की, सफाई कामगार कायम कर्मचारी जळगांव शहरामध्ये काम करत नाही. असा चित्र निर्माण होतो. तुम्ही ज्या दिवशी सुट्टी आहे कर्मचाऱ्यांना सरसकट सुट्टी द्या. दुसऱ्या दिवशी १००% कर्मचारी उपस्थित राहतील.दुसऱ्या दिवशी तो विषय राहणार नाही. आणि सुट्टीच्या दिवशी तुम्ही दुसरी पर्यायी व्यवस्था करा. मक्तेदाराकडुन कर्मचारी घ्या. किंवा किमान वेतन प्रमाणे त्याच कर्मचाऱ्यांना त्याचा मोबदला देऊन शासन परिपत्रकामध्ये आहे. त्या पध्दतीने ते जर कधी येत असतील त्यांना त्याचा लाभ देऊन मार्ग काढा. पण याचा मार्ग

काढा. आणि २०१६ पासुन ते २०२१ पर्यंत काम करुन घेतलेले आहे या कर्मचाऱ्यांकडुन त्यांना मोबदला दिला गेलेला नाही. त्यांच्याकडुन आपण काम करुन घेतलेले आहे. मी मागे हा विषय मांडलेला होता की, पाच दिवसामध्ये आपण पाच दिवसाच्या आठवडया संदर्भात डिसीजन घेतलेले आहे. आणि हा विषय आपण पाच वर्षात पण घेतला नव्हता.मागच्या वर्षी हा विषय मी मांडलेला होता. त्याच्यानंतर आपण त्यांना सुट्टी लागु केली. सुट्टी लागु केल्यानंतर आता एक ते दिड वर्ष झालेला आहे. मोबदला द्यावा आणि ज्या दिवशी त्यांना सुट्टी आहे. त्याच दिवशी सरसकट सुट्टी द्या. जेणे करुन १००% सर्व कर्मचारी हजर राहतील. आणि आमच्या वार्डामध्ये साफसफाईच्या कामाबाबत बोंब होणार नाही. आणि ज्या दिवशी सुट्टी आहे. त्या दिवशी पर्यायी व्यवस्था करा किंवा त्यांच्याकडुन मोबदला देऊन काम करुन घ्या.

**मा.आयुक्त :-** मागच्या वर्षी आम्ही स्वच्छता विभागात होतो, कुठे नाली चोकअप आहे. काही जनावर मरुन पडला, त्यामुळे आपल्याला सरसकट सुट्टी देता येत नाही. म्हणुन आपण ८०% ला सुट्टी देतो, २०% ला, काही लोकांना आपल्याला ठेवावेच लागतात. आपण हे करुच शकत नाही. सुट्टीच्या दिवशी सरसकट कर्मचारी आपण ॲपसेंट ठेवुच शकत नाही. दुसरा मुद्दा मोबदल्याच्या बाबतीत अजुन कोणत्याच नगरपालिकेने, महानगरपालिकेने अजुन हा निर्णय घेतलेला नाही. जर हा निर्णय सुरु झाला तर त्या अनुषंगाने आपणही मग निर्णय घेऊ. परंतु शासकीय सुट्टीच्या दिवशी १००% अनउपस्थिती आपण नाही करु शकत. आपण त्यांना सुट्टी देऊ पण अल्टरनेट डे देऊ.

**श्री.चेतन सनकत :-** बिल्कुल मॅडम, आपण अल्टरनेट प्रमाणे सुट्टया देत आहात. पण तो पुर्ण आठवडाभर गॅप पडत आहे कर्मचाऱ्यांचा, कामाचा तान पडत आहे. म्हणजे बदनामी कोणाची होईल, प्रशासन काम करत नाही. विषय काय होत आहे. कायम कर्मचारी नसतात.

**मा.आयुक्त :-** माझ्याकडे राईटींगमध्ये एकही तक्रार नाही की, कायम कर्मचारी काम करत नाही.

**श्री.चेतन सनकत :-** दर वेळेला मॅडम आपण मागच्या महासभेत पण सदस्यांची तक्रारी ऐकल्या असतील.सदस्य येथे ऑन रेकॉर्ड बोलतात. म्हणुन मला हा विषय मांडणे गरजेचे होते.

**मा.आयुक्त :-** पण आपण असे १००% सरसकट सुट्टी नाही देऊ शकत.

**श्री.चेतन सनकत :-** मग त्याच्यावर काही तरी उपाय काढा, पर्यायी व्यवस्था करा, शासनाकडुन मार्गदर्शन मागवा.

**मा.आयुक्त :-** त्याचे अल्टरनेट करतो आपण that is good enough.

**श्री.कैलास सोनवणे :-** मराठीत सांगा म्हणजे आम्हाला सगळयांना समजेल.

**मा.आयुक्त :-** आपण सर असे करतो, शक्यता सुट्टीच्या दिवशी सुट्टी देतो आणि काही कर्मचाऱ्यांना बोलवितो. तो निर्णय बरोबर आहे. पुन्हा काही शासनाचे मार्गदर्शन घेण्याची आवश्यकता नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** फार प्रामाणिक लोकं आहेत. प्रामाणिकपणे साफसफाई करतात ते. परंतु काही त्यांच्यामध्ये, तुम्ही सकाळी एकदा चक्कर मारा मॅडम, जसे मागे मारले होते तसे परत मारा. जे बदमाश आहे त्यांच्यामुळे या प्रामाणिकांना त्रास होतो. त्यांचा काम यांना करावा लागतो. काही काही ठिकाणी माणसे ठेवलेले आहे कामाला ते पण पहा ही पण विनंती आहे तुम्हाला.

**नगरसचिव :-** यांना प्रशासनामार्फत उत्तर देण्यात आलेल आहे. प्रश्न क्र.८ सन्मा.सदस्य श्री. सदाशिव गणपतराव ढेकळे यांना सुध्दा प्रशासनामार्फत प्रत देण्यात आलेली आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** कोर्टात गेले.

**नगरसचिव :-** प्रश्न क्र.९ सन्मा.सदस्य श्री. दिलीप बबनराव पोकळे साहेब,

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** अपुर्ण माहिती दिली.

**नगरसचिव :-** यांचा प्रश्न आहे. प्रमुख विधी सल्लागार श्री.आनंद मुजुमदार यांना नेमणुक देणे कायदेशीर आहे का? कोणत्या कायद्यान्वये व नियमानुसार आहे काय ? असल्याबद्दल ते प्रुव करा.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मला ज्या स्वरुपात माहिती दिली गेलेली आहे ती माहितीच्या अधिकाराखाली दिली गेलेली आहे. त्यांनी माहितीच्या अधिकाराचा अर्ज आणि प्रश्न-उत्तर कलम ४४ चा अर्ज दोघांना एकच स्वरुप दिला आहे. दिसुन येते, असा ठराव झालेला दिसुन येतो. असे झालेले दिसुन येते. ते तर मलाही समजते. मला

प्रश्नाचे उत्तर अपेक्षित आहे. अपुर्ण माहिती आहे. पुढील सभेत मला ती प्रश्नाच्या उत्तराप्रमाणे माहिती मिळावी. आणि उत्तर स्पष्ट पाहिजे.

**नगरसचिव :**- त्यानंतर प्रश्न क्र.१० आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** प्रश्न क्र.१० मध्ये बाकी समजले मला साहेबांच्या बोलण्यातुन फक्त अमृत योजनेची अंतीम मुदत, वाढीव मुदत मार्च २०२२ होती. त्याची परत मुदत वाढुन दिली का त्याचाही खुलासा मला सांगा, आता जे उत्तर दिले त्याच्यामध्ये अमृत योजना व भुयारी गटार योजना यांचा काम करण्याचा कालावधी किती. उत्तर असा आहे की, अमृत पाणी पुरवठा योजनेसाठी मार्च २०२२ पर्यंत वाढीव अंतिम कालावधी असुन भुयारी गटारी संदर्भात प्रलंबित आहे ते. परंतु अमृतचा त्यांनी मार्च २०२२ ही अंतिम वाढीव मुदत दिलेली आहे. त्याच्या पुढे वाढ दिलेली आहे काय दिलेली आहे त्याचा खुलासा याच्यामध्ये नाही.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** त्याला निविदा समितीने आतापर्यंत मुदतवाढ दिलेली नाही.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** कामाला अजुन मुदतवाढ नाही.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** मार्चनंतर अजुन मुदत नाही दिलेली आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** ते काम करत आहे की नाही.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** काम चालु ठेवण्यासाठी निर्देश दिलेले आहे. आणि मुदतवाढ ही प्रस्तावीत करतो आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** आता ते, मुदतवाढ नाही दिली तरी ही ते काम करत आहे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** नाही, मार्च २०२२ पर्यंत त्यांना मुदतवाढ दिलेली होती.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** अंतिम मुदतवाढ होती.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** परंतु शासनाने मार्च २०२२ पर्यंत मुदतवाढ दिल्यानंतर आपल्याला शासनाची मान्यता ही २६ मार्चला मिळाली. २६ मार्चला तांत्रिक मान्यता मिळाली.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** पुढच्या महासभेत याची डिटेल माहिती द्यावी.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** देतो, देतो, आपण जो प्रस्ताव पुढे देणार आहे. त्याच्या अनुषंगाने तुम्हाला माहिती देऊ.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** त्याच्यामध्ये ७६(ड) चा विषय प्रलंबीत आहे. चौकशी त्याचा आपण काय खुलासा दिला आहे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** बरं. ठिक आहे. मी देतो तुम्हाला.

**श्री.कैलास सोनवणे :-** संपले का प्रश्न, गोराणे साहेब, संपले का प्रश्न ?

**नगरसचिव :**- प्रश्न क्र.११, संपले प्रश्न. जळगांव महानगरपालिकेत प्रशासन शिक्षण अधिकारी मंडळात प्रशासन अधिकारी म्हणुन दिपाली विजयराव पाटील हे नियुक्त झालेले आहेत. प्रशासन अधिकारी म्हणुन आपले शिक्षण मंडळामध्ये दिपाली विजयराव पाटील हे आपल्या महानगरपालिकेत रुजु झालेले आहेत. कृपया त्यांनी त्यांचा परिचय द्यावा ही विनंती.

**दिपाली विजयराव पाटील, प्रशासन अधिकारी :-** महापौर मॅडम, उपमहापौर साहेब, आयुक्त मॅडम, येथे उपस्थित असलेले सर्व सन्मा.सदस्य, मी दि.०२ मार्च २०२२ रोजी महानगरपालिका शिक्षण मंडळ प्रशासन अधिकारीचा अतिरिक्त कार्यभार स्विकारलेला आहे. तीन साडेतीन महिन्यापासुन कामकाज बघणे चालु आहे. थोडेसे प्रशासकीय अनुभव कमी असल्यामुळे मी सगळयात पहिले प्रशासकीय कामकाज जाणुन घेण्याचा प्रयत्न करत आहे. आणि ज्या काही कामकाजात काही अडचणी येत आहे. तर मी वेळोवेळी तुमच्या मार्गदर्शनाखाली काम पुर्ण करेल.

**मा.**महापौर :- आतापर्यंत आपला ३-३.५ महिन्याचा पाहिले आणि मला खात्री आहे की, महापालिकेच्या ज्या शाळा आहे. त्यांची पटसंख्या कमी आहे. ती सुध्दा वाढविण्यासाठी आपण प्रयत्न करणार. मुख्याध्यापक किंवा शिक्षक यांना वैठीस धरुन किंवा त्यांना वेळोवेळी दिलेल्या नियमांचा पालन असेल किंवा पटसंख्या वाढविण्याच्या संदर्भातील जर काही असतील गोष्टी तर आपण वारंवार मिटींग घेऊन त्यांच्या निदर्शनात आणुन पटसंख्या कशी वाढेल. याच्यावर आपण निश्चित प्रयत्न कराल ही मी आपल्याकडुन अपेक्षा करेल.

**दिपाली विजयराव पाटील, प्रशासन अधिकारी :-** मॅडम, आता या महिन्यामध्ये माध्यमिक शिक्षण अधिकारी कार्यालयाचे काम असल्यामुळे आणि ऑदर कामकाजाची तुम्हाला कल्पना आहे. ॲडमिशन प्रोसेस चालु आहे. या महिन्याच्या ऐन्डींग पर्यंत बरच कमप्लीट होऊन जाईल. पुढच्या महिन्यापासुन आपली पटसंख्या वाढविण्याच्या

बाबतीत आणि शाळेच्या अभ्यासाच्या बाबतीत ज्या ज्या अडचणी असतील ते आम्ही शाळेच्या विद्यार्थ्यांना तुमच्या सोबत विजीट करुन मा.आयुक्त मॅडम सोबत विजीट करुन पुर्ण करण्याचा प्रयत्न करणार आहोत. थँक यु.

**नगरसचिव :-** पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया,

**मा.आयुक्त :-** पर्यावरण वाचविण्यासाठी आपण नो-व्हिकल डे करणेचे आपण आवाहन केलेले आहे. सर्व सन्मा.सदस्यांना आणि पत्रकारांना विनंती आहे की, आपण महिन्यातुन एक दिवस देऊ शकतो. सायकलींग केल्याने फ्रेश पण वाटते आणि तब्येतीसाठी पण खुप चांगले आहे. आणि माझी वसुंधरा कार्याक्रमा अंतर्गत आपल्याला तो कार्यक्रम करणे खुप आवश्यक आहे.

**मा.महापौर :-** विशेष म्हणजे आपल्याला खड्डयांची पण जाणिव होईल की, सायकल चालवत असतांना सायकल चालवितांना नागरीकांना कोणत्या अडचणी होत आहे.

**श्री.अनंत जोशी :-** मॅडम, साईकल प्रशासन पुरविणार आहे का ?

**मा.आयुक्त :-** स्वत:ची घ्यायची, मनपाकडुन काही अपेक्षा करु नका. आणि दुसरे १५ ऑगस्ट पासुन आपले सर्व कर्मचाऱ्यांना ड्रेसकोड, युनिफॉर्म लागु करण्याचा विचार करत आहे. तर मा.महापौर मॅडम आणि सर्वांच्या विचाराने आपण एक ड्रेसकोड फाईनल करु या.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, मला बोलु तर द्या, मला तकलीफ आहे त्या वार्डामध्ये. एकही कर्मचारी परवा माझ्या वार्डात नव्हता. आता त्या लोकांना, पाऊस पडला होता त्यादिवशी. पुर्ण गटारी फुल झाल्या होत्या. एकही कर्मचारी नव्हता. आम्ही नगरसेवक आहात म्हणुन या परिस्थितीमध्ये आमच्या दारावर लोकं आले होते की, कायमचा आहे हा विषय, त्यांना रजा देतात.तुम्ही फक्त एस.आय. लोकं सह्या करुन देऊन देतात. जे मेडीकल रजेवर आहे त्यांना सिव्हील हॉस्पीटलचा सर्टीफिकेट मागवा ना. कसे काय रजा देता तुम्ही त्यांना. एक कर्मचारी नसतो तेथे. गटारी मध्ये कुत्रा मेलेला असतो माणसे नसतात उचलायला. एस.आय.ला सांगितले तर, सांगतो करतो. तो एकटा तेथे फावडा घेऊन जाणार आहे का ? त्याच्यावर काय उत्तर आहे.

**मा.आयुक्त :-** कायम कर्मचाऱ्यांच्या अनउपस्थितीच्या बाबतीत मी जानेवारी पासुन ते मे पर्यंत जे दहा दिवसापेक्षा जास्त विना परवानगी गैरहजर आहे अश्या कर्मचाऱ्यांचे आपण नावे काढले. त्यांना नोटीस देऊन आपण प्रशासकीय कार्यवाही करत आहोत. या व्यतिरिक्त असे एक विचार आहे की, ज्या ठिकाणी कर्मचारी कमी पडतात ते वॉटरग्रेसकडुन घेता येतील का ? मग तसा टेक्नीकल मुद्दा आम्ही बघत आहोत चेक करत आहोत. त्यासाठी आपल्याला ऑडिटचा काही प्रॉब्लेम नाही यायला. त्या अनुषंगाने काही पर्यायी व्यवस्था करता येईल का ?ते मी आपल्याला एकावर्षीत करुन देईल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** या लोकांना एकाच ठिकाणी सात सात आठ आठ वर्ष झालेले आहे. हे हलगर्जीपणा त्यांची हिम्मत वाढुन गेलेली आहे. वरच्या अधिकाऱ्यांना चुतिया बनवुन फावडा ठेवुन चालले जातात सह्या करुन जम्बो बदल्या करा यांच्या. दुसरा विषय असा, घरकुलचा आहे शिवाजी नगरचा. जे घरे दिलेले आहे त्यांची घरपट्टी बाकी आहे त्या लोकांची. १७ ते १८ कोटी रुपये बाकी आहे त्या लोकांचे. आता ते कोणत्या बेसवर वसुली करणार आहे.

**मा.आयुक्त :-** घरकुलचे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** वसुली संदर्भात मागे पण तुम्हाला सांगितले होते. आता त्या लोकांना वसुली, म्हणजे त्यांना टप्पे बांधुन देणे पडतील. ते सगळे लोकं टप्प्याने देतील. आता जे लोकं आहे रहिवासी, करारनामे करुन लोकांनी घरे विकलेले आहे. त्याच्यावर तुम्ही काय कार्यवाही करणार आहे. बरं जे आहे त्यांना ताबा पावती देऊन मागचे थकबाकी भरुन तुम्ही काही त्याच्यावर उपाययोजना करा. ते तसेच राहुन जातील. ते १८ कोटी भरत नाही ते थकबाकी दिसते. मग वसुल कुठुन करणार आहे. याच्यावर तुम्ही उत्तर द्या काय उत्तर आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नंतर प्रश्न-उत्तरासाठी एक स्वतंत्र महासभा ठेवावी लागेल आपल्याला.

**श्री.प्रशांत पाटील, उपायुक्त :-** मा.महापौरताई, याच्यासाठी आपण प्रयत्नही करत होते. साधारणता १५०० नोटीस आपण वाटप केल्या. आणि आमची वसुलीही सुरु झालेली आहे. गेल्या महिन्याभरामध्ये आम्ही ३-३.५ लाख रुपयाची वसुली झालेली आहे. आणि एकंदरीत सगळया प्रश्नांच्या बाबतीत आपण काय मार्ग काढावा.तसे ते

धोरणच निश्चित करावे लागणार आहे. नितीनभाऊंशीही याच्या बाबतीत चर्चा झालेली आहे. तरी सर्व समावेशक आपण करुन आणु.

**श्री.अनंत जोशी :-** याला सगळयात उत्कृष्ट सोल्युशन तेच आहे. तुम्ही मालकी हक्काने त्यांना विकुन टाका. तुम्ही हे कधीच वसुली करु शकणार नाही. मालकी हक्काने विकुन टाका. निर्णय घ्या. मी अनेक वेळा बोललेलो आहे हा विषय.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मालकी हक्काने जर दिले तर ते परत प्रशासनाला बोलतील. त्याच्यावर काही तरी रस्ता काढायचेच आहे. अशीच दिसेल ती दिवसानुदिवस थकबाकी, पण ते घेतले पाहिजे ना त्या लोकांनी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** काय आहे की, रेव्हेनिव्ह परत येईल. या लोकांनाही निश्चिती होऊन जाईल.तर अश्या दृष्टीकोणातुन काही फ्रुटफुल प्रपोजल तयार करा.

**श्री.अनंत जोशी :-** उताऱ्यावर त्यांचा नाव लागेल ना तर ते लोकं घेतील. आणि ती काही फार मोठी अमाऊंट येणार नाही. त्यांना शक्य असेल तसेच अमाऊंट देतील त्या. आणि ते देतील. जेव्हा स्वत:चा घर होईल. स्वत:चे नांवावर होईल ना, ते देतील करतील. मी याच्या आधी पण इतर अधिकाऱ्यांशी बोललेलो आहे. भाऊंची आणि आपली पण खुप वेळा चर्चा होते. याच्या बाबत एक निर्णय घ्या.तेच योग्य राहील. आपण वसुली कधीच करु शकणार नाही. तुमचे कर्मचारी जातात का तेथे वसुलीला. विचारा बरं तुमचे कर्मचारी जातील का तेथे वसुलीला.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ते तर अनुभव आहेच. नांवावर आहे का नगरपालिकेचे, उताऱ्यावर नांव आहे का ? हे चेक करा पहिले. काबरं घरकुल घोटाळा झाला.हे चेक करा कसे काय मालकी हक्काने देणार तुम्ही.

**श्री.सुनिल महाजन :-** आहे ना उताऱ्यावर नांव आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** नाही ना भाऊ.

**श्री.सुनिल महाजन :-** आहे ना आहे, महापालिकेचे नांव आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तिसरा प्रश्न असा, एक वर्षामध्ये नाले स्केलेटरच्या संदर्भात ठराव केलेले होते. ते अजुनपर्यंत झाले नाही.

**मा.आयुक्त :-** त्याची प्रक्रिया चालु आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** लहान गटारी काढता येत नाही. त्याच्यासाठी नाले स्केलेटर लागणार.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता प्रशासनाची गती वाढविण्याच्या संदर्भामध्ये सगळेच विषय समाविष्ट करुन घ्या.

**मा.महापौर :-** नगरसचिवांनी राष्ट्रगीताला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांनी राष्ट्रगीतसाठी उभे राहावे ही विनंती.

**सही/-**
**(महाजन जयश्री सुनिल)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**